वर्ष : तेरावे
जाने-जून १९९२
अंक : पहिला-दुसरा

# हाकारा



# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

**स्फूर्तिस्थान / प्रेरणा : कै. गं. बा. सरदार**

## * कार्यकारी मंडळ *

| | | |
|---|---|---|
| **अध्यक्ष** | : | जनार्दन पोहऱ्या वळवी |
| **उपाध्यक्ष** | : | शरद कुलकर्णी |
| **सचिव** | : | रा. के. मुटाटकर |
| **सहसचिव** | : | सुधीर जोग |
| **खजिनदार** | : | वि. श्री. कुलकर्णी |
| **सदस्य** | : | श्रीमती मीराबाई तडवी |
| | : | श. गो. देवगावकर |
| | : | विजय साठे |
| | : | मिलींद बोकील |
| | : | जॉन गायकवाड |
| | : | पदमाकर वळवी |

कष्टकरी जनता, भूषण भारता, वंदन करितो पददलिता।
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे त्रैमासिक

# हाकारा

## अनुक्रमणिका

१) संपादकीय ....................३
२) जनार्दन महाराज – एक निष्ठावंत सेवाभावी जीवन : डी. एस. इंगळे ....................४
३) बिनचेहऱ्याचं एक गाव – 'वडफळी' : डॉ. हेमंत आपटे ....................१३
४) भुजंग मेश्राम यांचे अध्यक्षीय भाषण ....................१६
५) आदिवासी बोलीभाषा प्रकल्प : मोहन धनकर ....................२३
६) बंगाली साहित्यात आदिवासींचे चित्रण : दिलीप होता ....................२५
७) आदिवासी विकास – राखीव सरकारी कुरण : प्रतापराव शिंदे ....................२७
८) शासकीय पडजमिनी आणि गायराने : शरद कुलकर्णी ....................३१
९) केंद्र सरकार उदासीन आणि निरुत्साही : रा. वि. भुस्कुटे ....................३५
१०) सातपुड्यातील आदिवासींच्या आर्थिक मागासपणाची मीमांसा : एस. पी. गिरासे ....................३९
११) शासकीय योजना राबविण्यात आदिवासींच्या 'अंधश्रध्दा' अडसर : डी. एस. इंगळे ....................४२
१२) आदिवासी एकता परिषद का व कशासाठी : विरसिंग पाडवी ....................४६
१३) झिपरी (कथा) : चुडाराम बल्हारपुरे ....................४९
१४) पुस्तक परीक्षण – उन्हातलं झाड : सौ. मीना कराडकर ....................५५
१५) इंग्रजी ग्रंथ परिचय – आदिवासी दृष्टी : सुषमा सोनक ....................५७
१६) कविता ....................६०

वर्ष तेरावे : अंक पहिला - दुसरा
जानेवारी-जून १९९२

**संपादक :**
रामचंद्र मुटाटकर
**कार्यकारी संपादक :**
ग. शां. पंडित

मूल्य रु. २०/-

**पत्रव्यवहाराचा पत्ता :**
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औंध,
पुणे ४११ ००७
फोन : ३३७२१९

**प्रकाशक :**
रा. के. मुटाटकर,
सचिव,
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
यांचेसाठी,
मे. इंप्रेशन्स्
३३६०/४, लिंगराज कॉलेज समोर,
गोंधळी गल्ली क्रॉस रोड,
बेळगाव - ५९० ००२
फोन : २१३०९
येथे छापून प्रसिध्द केले.

"हाकारा'स महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, भारतीय सामाजिक शास्त्र अनुसंधान परिषद, पश्चिम विभागीय केंद्र व ॲन्थ्रोपॉलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया, यांजकडून अनुदान प्राप्त झाले आहे.

## (फॉर्म ४, नियम ८ नुसार निवेदन)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | *प्रकाशन स्थळ* | : | ६४, आनंद पार्क, औंध, पुणे - ४११ ००७. |
| २. | *प्रकाशन काळ* | : | त्रैमासिक |
| ३. | *मुद्रक, प्रकाशक* | | |
| | *व संपादक* | : | रामचंद्र केशव मुटाटकर |
| | *राष्ट्रीयत्व* | : | भारतीय |
| | *पत्ता* | : | ६४, आनंद पार्क, औंध, पुणे - ७. |
| ४. | *स्वामित्व* | : | महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद<br>६४, आनंद पार्क, औंध, पुणे - ४११ ००७. |

मी, रा. के. मुटाटकर जाहीर करतो की, वरील तपशील माझ्या माहितीनुसार व समजुतीनुसार खरा आहे.

*३१ जानेवारी १९९२* *रा. के. मुटाटकर*

**— प्रकाशक**

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने या नियतकालिकास अनुदान दिले असले तरी, नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्य शासन सहमत असेलच असे नाही. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

**— वर्गणीदारांस सूचना —**

ज्यांची वर्गणीची मुदत संपली आहे, त्यांनी पुढील वर्षासाठीची वार्षिक वर्गणी रु. ३०/- फक्त त्वरित पाठवावी, ही विनंती.

**— संपादक**

**— लेखकांसाठी —**

'हाकारा' हे आदिवासी प्रश्नांना वाहिलेले एकमेव मराठी नियतकालिक आहे. यातून आदिवासी जीवन, संस्कृती, साहित्य, सण, उत्सव, कला, तसेच आदिवासी कार्यकर्ते व आदिवासींमध्ये काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचे अनुभव, काही सेवाभावी व्यक्तींची व्यक्तीचित्रणे याशिवाय आदिवासींसंबंधीच्या कथा, कविता इत्यादी सर्वप्रकारच्या लेखनांस प्रसिध्दी दिली जाईल. आपण आपले साहित्य नियमित पाठवीत जावे.

**— संपादक**

# संपादकीय

'साधी राहणी, महान कर्तृत्व व उच्च विचारसरणी' या उक्तीला साजेशा व्यक्ती अलीकडे अगदी अभावानेच आढळतील. त्यातलेच एक आमचे महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे अध्यक्ष श्री. जनार्दन महाराज वळवी. म. गांधींच्या विचारांनी भारावून स्वातंत्र्यासाठी झगडणाऱ्या जनार्दन महाराजांनी स्वातंत्र्यप्राप्तीनंतरही लोकसेवेचे व्रत चालूच ठेवले. लोकांनीही त्यांना आपले प्रतिनिधित्व करण्याची संधी देऊन आमदार बनविले. परंतु सत्ता किंवा पैशाची लालसा त्यांनी कधीच केली नाही. उलट राजकारणाचा त्याग करून त्यांनी आपले सर्व जीवन आपल्या आदिवासी बांधवांच्या सेवेसाठी, त्यांच्या शिक्षणासाठी वाहून घेतले. जनार्दन महाराजांच्या कार्याची व त्यांच्या निस्वार्थी, एकनिष्ठ सेवेची महती थोडक्यात सांगणे कठीण आहे. त्यांचा शांत, निगर्वी स्वभाव, समाजकार्याची तळमळ व दांडगा उत्साह पाहूनच प्रा. गं. बा. सरदारांनी परिषदेच्या अध्यक्षपदातून स्वेच्छानिवृत्ती स्वीकारल्यानंतर त्या पदावर जनार्दन महाराजांची निवड केली. परिषदेच्या दृष्टीनेही अशा योग्य व्यक्तीची निवड होणे गौरवाची गोष्ट आहे. 'हाकारा'च्या या अंकात महाराजांच्या ६९व्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या व्यक्तिगत जीवनाविषयी व त्यांच्या कार्याचा थोडक्यात परिचय करून देणारा लेख देत आहोत. या लेखाद्वारेच आम्ही त्यांचे अभिष्टचिंतन करीत आहोत.


या अंकात श्री. भुजंग मेश्राम यांचे अध्यक्षीय भाषण प्रसिध्द करण्याचा योग आला. जळगांव जिल्हा दलित साहित्य मेळाव्याच्या अध्यक्षपदी त्यांची निवड झाली व याचवर्षी त्यांच्या 'उलगुलान' या काव्यसंग्रहास 'विशाखा पुरस्कार' मिळाला. या दोन्ही घटना म्हणजे श्री. मेश्राम यांचेसाठी अभिनंदनीय व कौतुकास्पद आहेत. श्री. मेश्राम हे चिंतनशील व अभ्यासू आदिवासी साहित्यिक. त्यांचा दलित साहित्याचा अभ्यास व व्यासंगही दांडगा आहे. त्यामुळे साहित्यक्षेत्रात त्यांना सन्मानाचे स्थान मिळणे स्वाभाविक आहे. आदिवासी साहित्य चळवळीत अग्रभागी असणाऱ्यापैकीच ते एक. ही चळवळ सुरू झाली तेव्हा परिषदेने तिला सक्रीय पाठींबा दिला. आदिवासी साहित्याला व साहित्यिकांना हाकारातून प्रसिध्दी मिळवून दिली, त्यांचे प्रश्न लोकांपुढे मांडले. एवढेच नाही तर त्यांच्या विचारांना, साहित्याला योग्य दिशा मिळावी, मार्गदर्शन व्हावे यासाठी परिषदेच्यावतीने प्रा. सरदारांच्या मार्गदर्शनाखाली आदिवासी साहित्यिक व कार्यकर्त्यांचे मेळावे, शिबिरे व प्रशिक्षण या सारखे उपक्रम घडवून आणले. आदिवासी साहित्यिकांना हाकाराने घडविले असे म्हणता येणार नाही, परंतु आज साहित्यिक म्हणून त्यांना जी समाजमान्यता मिळाली किंवा मिळत आहे, या त्यांच्या उभारणीत, घडणीत परिषद व हाकाराने बहुमोल कार्य केले आहे. याचे स्मरण या साहित्यिकांनाही आहे, यात शंका नाही.

**— संपादक**

# जनार्दन महाराज – एक निष्ठावंत सेवाभावी जीवन

**– श्री. डी.एस्. इंगळे, गुरुजी**

या परिसरातील विविध चालीरीती सणसमारंभ, शेती, शिक्षण यांचा अभ्यास करीत असतानाच रामपूर येथे बदलून आलो. तेव्हा रामपूर गावातील प्रतिष्ठित व सन्माननीय अशा व्यक्तीशी ओळख झाली, त्यांच्या परिचयाअंतर्गत त्यांनी केलेल्या कार्याने



व त्यांच्या राहणीमानाने वागणुकीने मी आपोआपच आकर्षिला जावून त्यांच्या कार्याची ओळख करून घेण्याची साहजिकच मनात एक जिज्ञासा निर्माण झाली व ह्या जिज्ञासा अंतर्गत त्यांनी केलेल्या कार्याचा व विविध पदावर कार्य केल्याचा माझा सुरुवातीस विश्वास बसेना! कारण आजकाल अशी परिस्थिती सर्वसाधारणपणे आढळते. ती म्हणजे साधा सरपंच, पं.स. सदस्य, किंवा अन्य छोट्या-मोठ्या पदावर जरी व्यक्ती पोहोचला तरी त्याचे राहणीमान, आर्थिक परिस्थितीत साहजिकच बदल झालेला आढळतो. व नंतर पदावर असतानाची स्थिती व पदापूर्वीची स्थिती यातजमीन-अस्मानचे अंतर आढळते. व अशी कित्येक उदा. जगापुढे आजही आहेत. अशा वेळी कवी यशवंतांच्या कवितेच्या ओळी आठवतात–

"काल होते हे कोण
आज आहेत कोण
तुटकी खाट नव्हती ज्यांचेघरी
आज लागलेत फोन!"

अशी स्थिती आजच्या जमान्यात असताना संबंधित व्यक्तीचे घरदार, राहणीमान यावरून जरी अंदाज केला तर खरोखर ह्या व्यक्तीने एवढे कार्य करून विविध पदे भूषवून आदिवासी विकासात सिंहाचा वाटा उचललेला आहे. असे सांगूनही कुणास पटणार नाही, पण ते खरोखरच सत्य असून आदिवासींसाठी संपूर्ण जीवन नोकरी न करता हाल-अपेष्टा सहन करून आज त्यांनी एक शैक्षणिक संस्था रूपाने मोठा विश्वास वृक्ष उभा करून आजही ते ६९ वर्षाचे वयोवृद्ध असूनही गंभीरपणे कार्य करीत आहेत. अशा ह्या आदरणीय व्यक्तीचे नाव आहे "जनार्दन महाराज."

महाराजांचे पूर्ण नांव श्री जनार्दन पोहऱ्या वळवी असून त्यांचा जन्म सातपुड्याच्या घनदाट अरण्यात वसलेल्या मुंदलवड खेड्यात सोळा जानेवारी एकोणीशे चोवीस (१६-१-१९२४) साली, एका अडाणी व गरीब अशा भिल्ल कुटुंबात झाला. त्यांच्या जन्मापूर्वी त्यांच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अतिशय हलाखीची

असल्याने त्यांच्या कुटुंबात त्यांच्यापेक्षा मोठे असलेल्या सहा भावांपैकी कोणीच शिकू शकले नव्हते. त्यांच्या कुटुंबात आई, वडिल, सातभाऊ व एक बहीण असे त्यांचे दहा जणांचे कुटुंब होते. त्यापैकी आठ भावंडात त्यांच्यापेक्षा सहाही भाऊ मोठे असून ते सातवे. व त्यांच्यापेक्षा लहान एक बहीण. त्यांच्या कुटुंबाप्रमाणेच त्याकाळी त्यांच्या पूर्ण गावात कोणीच शिकलेले नव्हते, परंतु अशा वेळी सुद्धा लहान असतानाच त्यांना शिकण्याची इच्छा होती, पण करणार काय? होता-होता अकरा वर्षाचे झाले; तरी इच्छा असूनही शिक्षण घेता येईना. एकदा एक शिक्षक त्यांना भेटले व त्यांनी महाराजांना शिक्षणाची प्रेरणा व मार्गदर्शन दिले. त्या प्रेरणेत स्वत:च्या इच्छेची भर घालून त्यांनी इ. १ लीला वयाच्या ११ व्या वर्षी मिशन शाळेत प्रवेश घेतला. अशाप्रकारे मुंदलवड गावातील आदिवासी लोकांना व आदिवासी समाज बांधवांना भविष्य काळात सुवास देणाऱ्या फुला-रोपट्याची लागवड १९३५ साली झाली.

त्याकाळी संपूर्ण अक्राणी तालुक्यात शाळाही नव्हत्या. धडगाव सोडून इतर ठिकाणी शाळा पं. खानदेश भिल्ल सेवा मंडळाच्या होत्या पण त्या शाळेतील शिक्षकांना केवळ ७ ते ८ रु. पगार असल्याने परवडत नाही अशा सदराखाली सर्व शिक्षकांनी राजीनामे दिले. परिणामी त्या सर्व शाळा बंद पडल्या. त्यामुळे अक्राणी तालुक्यातील जनतेची दुष्काळात तेरावा महिन्यासारखी परिस्थिती निर्माण झाली व शिक्षणाची खूपच गैरसोय झाली. त्यामुळे मुंदलवड येथे इ. ३ री पर्यंत शिक्षण घेवून इ. ४ थी चे शिक्षण धडगांव येथे पूर्ण करून महाराजांना पुढील शिक्षणासाठी तळोदा येथे जावे लागले. त्याकाळी वाहनांची सोय नव्हती. मुंदलवडहून सर्व सातपुडा पहाड पायाखाली घालून घनदाट जंगलातून तळोद्याला यावे लागत असे. त्या ठिकाणी बोर्डींगमध्ये राहून ६ वी पर्यंत शिक्षण पूर्ण केले. ६ वी पर्यंतच्या शिक्षणात व ७ वी च्या सहामाहीच्या परीक्षेपर्यंत एक अत्यंत हुशार, होतकरू व प्रामाणिक विद्यार्थी असा लौकिक त्यांचा होता. ते सतत वर्गात प्रथम क्रमाकांने पास होत असत. त्यांना गणित विषयाची अत्यंत आवड होती. एकदा सातवीच्या सहामाहीच्या परीक्षेच्या वेळी गणित विषयाच्या परीक्षेस एका गणिताचे त्यांचे एकट्याचे उत्तर वेगळे व इतर सर्व विद्यार्थ्यांचे उत्तर एकसारखे आले. त्यामुळे अवघड असे गणित असल्याने शिक्षकांनाही त्याचे उत्तर न समजल्याने त्यांनी दुसऱ्या विद्यार्थ्यांचे गणिताचे उत्तर बरोबर देवून त्या गणिताचे सर्व मार्क दिले आणि यांचे चूक आहे म्हणून मार्क दिले नाहीत. जेव्हा पेपर तपासून आले तेव्हा महाराजांनी पेपर तपासून पाहिला असता त्या एका गणिताला बरोबर असून चूक दिलेले त्यांना आढळले. व इतरांचे तेच गणित चूक असून त्या सर्वांना मात्र बरोबर देऊन त्यांना त्या गणिताचे पूर्ण मार्क दिलेले त्यांना आढळले. हे त्यांच्या शोधक व स्वाभिमानी वृत्तीला पटले नाही. लगेच ते गुरुजींकडे गेले व त्यांना त्या गणिताची समस्या सांगून गुरुजींना ते गणित पुन्हा जसेच्या तसे सोडवून दिले व आपल्या गणिताचे उत्तर कसे बरोबर आहे हे व्यवस्थित पटवून दिले. गुरुजींनाही ते पटल्याने व आपली चूक लक्षात आल्याने त्यांना शाबासकी दिली व त्यांना गणित विषयात पूर्ण १०० पैकी १०० गुण मिळाले व बाकीच्या इतर सर्व मुलांचे त्या गणिताचे मार्क वजा झाले हे सांगावयास नको! असा त्यावेळी त्यांची हुशारी व त्यांच्या बुद्धीचा लौकिक होता. एवढे असूनही त्यांना पुढे त्याच वर्गात वार्षिक परीक्षेत नापास व्हावे लागले होते!

त्याला खूप मोठे कारण घडले. त्याकाळी म्हणजे १९४२ साली संपूर्ण देशात स्वातंत्र्याचे वारे वाहत होते. गांधीजींच्या 'चलेजाव' लढ्याचा आवाज खेड्या-पाड्यात डोंगरदऱ्याखोऱ्यात पसरलेला होता अशाच प्रकारे तो तळोद्याच्या शाळेत व बोर्डींगमध्येही पोहोचला होता. साहजिकच त्यावेळच्या तरुणाला प्रेरणा मिळून जो तो स्वातंत्र्य लढ्यात समर्पण करण्यास मागेपुढे पहात नसे. अशाच काहीशा देशभक्तीच्या प्रेरणेने जनार्दन महाराज व त्यांचे सहकारी प्रभावित झालेले होते व त्या परिसरातील श्री. नथूसिंग किसनसिंग परदेशी, गुलाबसिंग परदेशी, भगवान शेंडे, माळी हे त्या काळात त्या भागातील स्वातंत्र्य लढ्याला वाहून घेतलेले असे प्रमुख कार्यकर्ते होते. बोर्डींग मधल्या मित्रमंडळींनीही स्वातंत्र्य लढ्यात उडी घेण्याचा निर्णय संबंधित नेत्यांना गुप्तपणे सांगितला त्यामुळे त्या कार्यकर्त्यांच्या ज्या गुप्त अशा बैठका होत त्या बैठकात जनार्दन महाराजांना ते बोलवित असत व इंग्रज सरकारविरुद्ध क्रांतीकारी योजना आखत असत.

त्याकाळी भारतीयांची असहकार आंदोलन, फोडा व झोडा, 'चलेजाव' या चळवळी, अंतर्गत दंगे, जाळ-पोळ, मोर्चे, इंग्रज सरकारची मालमत्ता, कचेऱ्या, पोस्ट ऑफिसे, जाळण्याचे प्रकार होत असत व त्या बातम्या संपूर्ण देशाच्या कानाकोपऱ्यात पसरत असत. साहजिकच त्यावेळच्या तरुणांचे मन पेटून निघत असे व ते कोणत्याही प्रकारच्या प्राणांची पर्वा न करता साहसांना सामोरे जात असत. अशा बातम्या कानावर येत असतानाच महाराजांनाही वाटे की आपणही काहीतरी क्रांतीकारी योजना आखून इंग्रज सरकारला आपल्या परीने धडा शिकवला पाहिजे. असा विचार मनात आल्यानंतर ते डिस्टीलरी फॅक्टरीच जर जाळून टाकली तर—एकदम मनात विचारचक्र फिरले लगेच ताबडतोब त्यांनी चमाऱ्या नावाच्या मित्रास व इतर मित्रमंडळींना या योजनेचा सविस्तर तपशील सांगितला व कोण-कोण यात सामील होतो ते प्रत्येकाकडून काढून घेतले. सगळयांच्या मनात स्वातंत्र्य प्रेम बिंबल्यामुळे सगळयांनी आनंदाने होकार दिला. व त्यांनी हा बेत आटपून संबंधित कार्यकर्त्यांना भेटून सांगितले की, धडगाव येथे इंग्रजांची मोठी डिस्टीलरी फॅक्टरी असून तेथे देशी दारू तयार होत असते व त्यापासून इंग्रज सरकारला बरेच उत्पन्न मिळून अधिकाऱ्यांना भरपूर दारू प्यायला मिळते. व त्या दारूमुळे उन्मत्त होवून ते जनतेवर खूप अन्याय करतात. अशी ही फॅक्टरीच पेटवून देण्याची योजना आखलेली आहे. त्या योजनेचा तपशील ऐकून त्यांनीही आनंदाने मान्यता देवून सर्व प्रकारचे मार्गदर्शन केले. दिवसही ठरविला गेला. व त्यानुसार कार्यवाही सुरू होवून जय्यत तयारी केली व नियोजनाप्रमाणे दिवसही उजाडला पण दैवाने अचानक घात केला! त्यादिवशी बोर्डींग सुपरिटेंडेंटला कसा सुगावा लागला कोणास ठावूक? त्याला ह्या योजनेचा सुगावा लागताच तो घाबरला व पुढे काहीतरी भीषण प्रसंग निर्माण होवून प्रसंगी आपली नोकरी जावून जेलमध्ये जाण्याची पाळी येईल ह्या भीतीने त्याने त्या दिवशी रात्रभर स्वत: जागे राहून सगळ्या विद्यार्थ्यांवर पाळत ठेवली व दरवाज्यातच ठाण मांडून राहिला. रात्री बरेच प्रयत्न सगळयांनी करून पाहिले पण व्यर्थ. शेवटी त्यावेळी ते विद्यार्थीच पडले म्हणून त्यांचा पूर्ण नाइलाज होवून त्यांच्या ह्या अतिशय धाडसी योजनेवर पाणी फिरले. तरीदेखील त्यांनी कार्यकर्त्यांच्या बैठकीस हजर राहून अप्रत्यक्षरित्या हातभार लावला होता. त्या बैठकांना त्यांचा मित्र चमाऱ्याही उपस्थित रहावयाचा. त्यांचे वारंवार कार्यकर्त्यांच्या

बैठकीला जाणे, त्यांच्या व भूमीगत कार्याला मदत करणे, त्यांनी सांगितलेली कामे गुपचूप पूर्ण करणे अशा ह्या कामांमुळे साहजिकच अभ्यासाकडे पूर्ण दुर्लक्ष झाले व परिणाम व्हायचा तोच झाला. शेवटी ७ वी पर्यंत प्रथम येणारे जनार्दन महाराज ७ वी फायनलच्या परीक्षेस चक्क नापास झाले. तरीही त्यांना मनातून स्वातंत्र्याकरिता हे अपयश आले यामुळे वाईट न वाटता उलट आपण लढ्याच्या कणभर का असेना कामी आलो म्हणून खूप समाधान वाटले. त्यांचा मित्र चमाऱ्याही नापास झाला. पुढे तो कुठेच परीक्षेला न बसता सरळ घरीच निघून गेला. यांनी मात्र धीर न सोडता व त्या अपयशाने खचून न जाता १९४३ साली पुन्हा ७ वीची परीक्षा दिली व चांगला अभ्यास करून ७ वी फायनलच्या परीक्षेत चांगल्या मार्कांनी उत्तीर्ण झाले.

फायनलनंतर पुढील शिक्षणाचा प्रश्न निर्माण झाला. कारण पुढे शिक्षण घेण्याइतकी त्यांची ऐपत नव्हती. शेवटी त्यांनी आपल्या राजकीय नेत्यांच्या संपर्कात रहायचे ठरविले व त्यावेळचे एक प्रभावी आदिवासी नेते नरशी छोटू पाडवी, नळगव्हाण यांच्या संपर्कात काम केले. त्यांची हुशारी व परिस्थिती लक्षात घेवून त्यांनी स्वत: असे प्रयत्न करून शेतकी शाळा धुळे येथे २ वर्षांच्या ट्रेनींगसाठी निवड करून दिली. तसेच खर्च, प्रवेश फी साठी पं. खान्देश भिल्ल सेवा मंडळ या संस्थेकडून आर्थिक मदत मिळवून दिली, अशा प्रकारे शेतकी शाळेचा दोन वर्षाचा यशस्वी कोर्स पुरा केल्यानंतर त्यांना लगेच फिल्ड कामगार म्हणून सरकारी नोकरीची ऑर्डर आली, पण देशप्रेमामुळे ती नोकरी न पत्करता पं. खान्देश भिल्ल सेवा मंडळातच १० रुपये मानधन घेवून कार्यकर्ता म्हणून कार्य करायचे ठरविले व सुरू केले. एकदा स्वत: १९४५ मध्ये धडगांव येथे भरलेल्या प्रचंड जाहीर सभेत त्यावेळचे भिल्ल सेवा मंडळाचे मान्यवर नेते श्री. शंकर विनायक ठकार यांच्या प्रेरणेने त्यांच्याच अध्यक्षतेखाली भरलेल्या सभेत आदिवासी समाजात आदिवासी विभागात कार्य करण्याचा निर्धार करून सभेतच जाहीर संकल्प केला. सामाजिक विकासाच्या क्षेत्रात शिक्षणात पं. खान्देश भिल्ल सेवा मंडळात सेवा करण्याचे ठरवून अत्यंत डोंगराळ व मागासलेल्या अक्राणीमहाल, मोलगी या भागात कार्यास सुरुवात केली व ह्या क्षेत्रात राहून आदिवासी समाजावर होणारे अन्याय दूर करण्याचा प्रयत्न केला. तसेच तेथील अधिक मुले शिक्षण घ्यावीत ह्या बाबतीत सतत प्रयत्न करीत राहिले. शैक्षणिक प्रगती झाल्याशिवाय समाजातील दारिद्र्य अंधश्रद्धा दूर होणार नाही व माणूस म्हणून जगण्याची क्षमता येणार नाही हे मर्म त्यांनी बरोबर जाणून शैक्षणिक प्रगतीकडे अधिक लक्ष वेधले.

त्या भागात जागृती व्हावी म्हणून संघटना होणे आवश्यक होते. हे बरोबर ओळखून त्यांनी तरुणांची एक संघटना स्थापन केली व त्या संघटनेचा कॉंग्रेस पक्षात समावेश करून घेतला. कारण महात्मा गांधीसारख्या महान नेत्यांच्या विचाराचा पगडा त्यांच्या मनावर पक्का ठसलेला असल्यामुळे त्यांनी ती संघटना कॉंग्रेस पक्षात विलीन केली. ह्या कॉंग्रेस पक्षाच्या लोकलबोर्डाचा सदस्य म्हणून बिनविरोध निवडून आले. त्यांनी त्यावेळी स्वातंत्र्य मिळाल्यानंतर मुंबई राज्याचे प्रथम मुख्यमंत्री असलेले बाळासाहेब खेर यांचे पार्लमेंट सेक्रेटरी डी.एन. वांद्रेकर यांचा दौरा आयोजित करून या भागातील आदिवासी समाज दारिद्र्याच्या विळख्यात सापडलेला असून शिक्षणाची पुरेशी सोय नाही वगैरे सर्व परिस्थिती त्यांना प्रत्यक्ष दाखवून दिली. त्यामुळे या भागाकडे शासनाचे चांगले लक्ष वेधले जाऊन काही सुधारणा

तात्काळ घडून आल्या व त्या भागात काँग्रेस पक्षाची चांगलीच संघटना उभारली गेली. लोकांमध्ये एक जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्याकाळी बेठबिगार पद्धती अंमलात होती. व संबंधित फॉरेस्टर अधिकाऱ्यांना चारा, तूप, सर्पण, कमोद, तांदूळ डाळी वगैरे सर्व फुकट पुरवावे लागे, शिवाय संबंधित खात्याचे कर्मचारी, त्यांचे नातेवाईक, बाया यांना डोलीत बसवून चार जणांनी ती डोली खांद्यावर घेवून तळोद्यापर्यंत पोहोचवावे लागत असे. रस्त्याच्या दुरूस्तीसाठी लागणारी दारू तयार करण्यासाठी जे सर्पण लागावयाचे तेही जबरदस्तीने फुकट लाकूडतोड करून घ्यावी लागे. अशा ह्या अन्यायकारक पद्धती होत्या. ह्या पद्धतींना पायबंद घालण्याचा सतत प्रयत्न करून काही प्रमाणात यशही मिळवून त्या प्रथा बंद करण्याचा प्रयत्न जनार्दन महाराजांनी केला. या कामासाठी त्यांना नाझरथ रेंजर व व्ही.के. खारकर ह्या मुख्य कारकूनाचे चांगले सहकार्य मिळाले.

वेठबिगार पद्धतीप्रमाणे त्याकाळी धर्मांतराचे सावट आदिवासी समाजावर आले होते. कारण एक मसुद नावाचे सरकारी ऑफिसर आदिवासींना सक्तीने मुसलमान बनविण्याच्या प्रयत्नात होते, पण त्यांच्या ह्या प्रयत्नाला शंकर विनायक ठकार व नरेंद्र बी. आर्य महाराज यांनी अडथळा आणून धर्मांतर होण्याचे आदिवासी समाजावरील भीषण संकट दूर केले. त्या कामासाठीही महाराजांनी श्री. ठकार व आर्य यांना बहुमोल सहकार्य दिले.

सन. १९४८ मध्ये लोकल बोर्ड निवडणुकीत बिनविरोध निवडून आले. त्याच काळात युग संदेश या दैनिकाचे वार्ताहर म्हणून काम करीत असताना आदिवासींच्या व्यथा वेदना या लेखरूपाने जगापुढे मांडून त्याबद्दल न्याय मिळवून देण्याचा प्रामाणिक प्रयत्न त्यांनी केला. हे संपूर्ण लोकोपयोगी कार्य केल्याची पावती म्हणून त्यांना १९५२ मध्ये काँग्रेस पक्षाने विधानसभेचे तिकीट दिले व त्या निवडणुकीस त्यांनी प्रचंड बहुमताने विजय प्राप्त केला. ती जी निवडणूक होती ती लोकशाही तत्वावरची पहिलीच निवडणूक असल्याने विशेष असे महत्त्व येवून त्यावेळी काँग्रेस पक्षाचे सरकार स्थापन केले. १९५२ ते १९५७ अशी आमदार पदाची धुरा महाराजांनी समर्थपणे सांभाळून आदिवासींचे प्रश्न विधानसभेत हाताळून न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. १९५७ साली पुन्हा त्यांना काँग्रेस पक्षाने तिकीट देऊन त्यांच्या लोकोपयोगी कार्याची उपयुक्तता सिद्ध केली. पण त्याकाळी उकाई धरण, मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा परिणाम लोकमतावर होवून त्यांना व पक्षांना अपयश पत्करावे लागले.

आमदार असताना पं. खान्देश भिल्ल सेवा मंडळाचे तत्कालीन अध्यक्ष जयंत गणपत नटावदकर यांच्या सहकार्याने व दोघांच्या प्रयत्नाने बिकट अशा परिसरात आदिवासींना शिक्षणाची सोय व्हावी म्हणून माध्यमिक विद्यालये, छात्रालये, आश्रमशाळा सुरू केल्या. तसेच सातपुड्यासारख्या अतिदुर्गम भागात विकासाची कामे घेण्यास शासनाचे लक्ष वेधले. सातपुड्यात मोलगी येथे मंडळातर्फे प्रथमच आश्रमशाळा सुरू केली. धडगांव सारखे तालुक्याचे ठिकाण असूनसुद्धा दळणवळणाचे साधन नव्हते. त्याकरिता केंद्रीय मंत्री बी. एन्. दातार यांना मोलगी पर्यंत नेऊन तेथील सत्य परिस्थितीकडे लक्ष वेधले. विविध विकास योजनेची कामे सुरू केली. असे अनेक प्रकारचे कार्य त्यांनी पं. खान्देश भिल्ल सेवा मंडळात राहून १९६२ पर्यंत केले. १९६३ साली त्यांनी स्वतंत्र आदिवासी सातपुडा शिक्षण प्रसारक मंडळ धडगांव, नावाची स्वतंत्र शैक्षणिक संस्था

स्थापन केली व स्वतंत्र असे शैक्षणिक विकासाचे कार्य हाती घेतले. या शैक्षणिक कार्याचे क्षेत्र तळोदे, अक्कलकुवा, शहादा, अक्राणीमहाल तालुक्यातील आदिवासी परिसर अशा ह्या क्षेत्रात आतापर्यंत हायस्कूल, आश्रमशाळा, वसतीगृहे, बालवाड्या ठिकठिकाणी उघडून शिक्षणाची गंगा आदिवासींच्या दारापर्यंत पोहोचविण्याचा प्रामाणिक प्रयत्न त्यांनी केलेला आहे.

तसेच जंगल कामगार सह. सोसायट्या स्थापन करून त्या सोसायटीचे चेअरमन म्हणून काम पाहिले व त्या सोसायट्यामधील नफा स्वतंत्र वसतीगृह काढून मुलांच्या शिक्षणाची सोय केली. याचेच फळ म्हणून या प्रयत्नामुळे असली सारख्या उंच शिखरावरील गावातील के.सी. पाडवी वकील, दुसरा एक मुलगा इंजिनिअर व दुसरी दोन-तीन मुले मोठ्या अधिकारावर पोहोचली आहेत, अशा पैशांचा योग्यतो उपयोग दूरदृष्टी ठेवून केला. त्यामुळेच त्या पैशाचे व नफ्यांचे फळ म्हणून आदिवासीतील मुले अधिकारी झालेत. तसेच राज्यपातळीवरच्या जंगल कामगार सहकारी संस्थाचा संघ महाराष्ट्र राज्य पुणे याचे आजतागायत संचालक (सदस्य) म्हणून आहेत. अक्राणी व मोलगी या अतिशय दुर्गम भागात त्याकाळी मध्यवर्ती सह. बँक अथवा विविध कार्यकारी सोसायटी नव्हती. त्याकरिता त्यांनी मुंदलवड व मोलगी दोन विविध विकास सोसायट्या रजिस्टर करून कार्यान्वित केल्या. व रोज जमिनी नवीन शर्तीची असल्याने सारण ठेवता येत नव्हते. त्यास शासनाचे धोरण अंमलात आणण्यास भाग पाडले. भिल्ल सेवा मंडळाच्या कार्यातून मुक्त झाल्यानंतर मुंदलवड गावी रहायला आल्यानंतर तेथील भावकऱ्यांनी सरपंच पदाची धुरा त्यांच्यावर सोपविली. त्या गावातील विकासाची कामे करून तेथील मिशन शाळेत आदिवासी मुलांना शिक्षणासाठी प्रवृत्त करून जी एक शिक्षकी शाळा होती ती बहु शिक्षकी केली. तसेच त्याच गावात बाहेरगावाच्या मुलांची शिक्षणाची सोय उपलब्ध व्हावी त्या हेतूने एक वसतीगृह सुरू केले. असली, अस्तंबा या सारख्या अतिदुर्गम भागातील अनेक खेड्यातील मुलांना रहावयाची सोय होवून त्या वसतीगृहाचा लाभ घेता आला. त्या वसतीगृहास चांगली चालना मिळावी व प्रोत्साहन म्हणून एक हजार रुपये देणगी म्हणून दिले. सामुदायिक विहीरी, बांधबांधिस्ती, बंधारा अशा अनेक योजना त्यांच्या कारकिर्दीत यशस्वी करून जमाना ते धडगाव रस्ता व्हाया मुंदलवड सुरवाणी असा जिल्हा परिषदेस घेण्यास भाग पाडले. अक्राणी महाल पंचायत समितीच्या उपसभापतीचा कार्यभार १९६४ ते १९६७ पर्यंत यशस्वी रीतीने सांभाळून त्यांनी अनेक समाजोपयोगी कार्य केले.

त्यांच्या ह्या लोकोपयोगी कार्याचा व समाजातील विकासयोजना शासनापर्यंत प्रभावीपणे मांडून व त्यांचा वापर प्रत्यक्ष अंमलात आणून सातपुड्याच्या पर्वतरांगामध्ये व इतर आदिवासी परिसरात जो शैक्षणिक प्रगतीचा पक्का पाया रोवून निस्वार्थीपणे कार्य केले, त्यांच्या या संपूर्ण केलेल्या कार्यांचा गौरव म्हणून त्यांना महाराष्ट्र शासनाने १९७१ साली 'दलित-मित्र' हा पुरस्कार बहाल केला. व तो एक हजार रुपये रोख, शाल श्रीफळ व मानपत्र अशा स्वरूपात राज्यपालांच्या हस्ते पुणे येथे देण्यात आला. त्या काळच्या दलित, व्यथित दरिद्री व मागास लोकांच्या विकासासाठी झटणाऱ्या व्यक्तींना पुरस्कार देण्याचा प्रथम पायंडा १९७१ सालीच महाराष्ट्र शासनाने सुरू केला होता व त्या 'दलित-मित्र' पुरस्काराच्या पहिल्याच पंक्तीस बसण्याचा मान जनार्दन महाराजांना मिळाला हा पुरस्कार मिळून हुरळून

न जाता उलट केलेल्या कार्याचे प्रतीक म्हणून तो पुरस्कार त्यांच्या चांगलाच लक्षात राहून म्हातारपण जवळ येत असताना सुद्धा दुप्पट जोमाने व विशेष म्हणजे शैक्षणिक विकासाकडे त्यांनी लक्ष वेधले. व त्यांनी स्वत: सातपुडा शिक्षण प्रसारक मंडळ धडगांव हे शिक्षणाच्या विकासरूपी जे रोपटे लावले होते. त्या रोपट्याचा मोठा वृक्ष होवून त्या विस्तारांच्या फांद्या सातपुड्यातील घनदाट जंगलात व काना कोपऱ्यात पोहोचलेल्या आहेत त्या म्हणजेच– (१) एस्.व्ही. ठकार माध्यमिक विद्यालय धडगाव. (२) दिगंबरराव पाडवी माध्यमिक विद्यालय कन्साई. (३) पोस्ट बेसीक आश्रमशाळा राजबर्डी. (४) पोस्ट बेसीक आश्रमशाळा रायसिंगपूर (५) नरेंद्र छात्रालय वडफळी. (६) कै. बाळासाहेब खेर छात्रालय मुंदलवड. (७) आदिवासी छात्रालय सिसा. (८) कस्तुरबा कन्या छात्रालय वडफळी. (९) आदिवासी छात्रालय मुंगबारी. (१०) कै. दयाराम पटेल आदिवासी छात्रालय कन्साई. (११) इंदिरा गांधी बालविकास मंदीर कहाटूळ. (१२) बालविकास मंदीर चाँदसेली. (१३) आश्रमशाळा बिलगांव. (१४) आश्रमशाळा डनेल या अनेक शाळांतून विद्यार्थी शिक्षण घेत असून कर्मचारी शिक्षक, कामाठी, स्वयंपाकी, शिपाईसह आज कार्यरत आहेत. इतर शैक्षणिक संस्थांच्या मानाने ही संस्था छोटी असेल पण आदिवासी परिसरातील व डोंगराळ भागातील लोकांना ही संस्था एक वरदान ठरली असून ती संस्था चालवित असताना महाराजांना कठोर परिश्रम घ्यावे लागले. अनेक वेळा संस्थेची स्थिती इतकी नाजूक होती, पण तरीही त्या संस्थेला महाराजांसारखे कुशल नेतृत्व लाभल्याने त्यांनी अनेक वेळा त्या नाजूक परिस्थितीवर मात करून ती संस्था टिकून आजही ती मोठ्या दिमाखाने सातपुड्याच्या कानाकोपऱ्यात की ज्या ठिकाणी माणूस पोहोचू शकत नाही व शासनाच्या प्राथमिक शाळा ही कार्य करू शकल्या नाहीत, अशा ठिकाणी ज्ञानार्जनाचे काम सातपुडा शिक्षण प्रसारक मंडळ, धडगांव ही संस्था महाराजांच्या नेतृत्वाखाली करीत आहे. व चंद्राच्या कला जशा दिवसेंदिवस वाढत जातात तशा ह्या संस्थेचा विस्तार हळूहळू का होईना पण वाढत आहे. आता दोन वर्षापासून धडगांव येथे तालुक्याच्या गावी एकमेव त्यांचेच माध्यमिक विद्यालयात उच्च माध्यमिक शिक्षणाची सोय झाली. तालुक्यातील विद्यार्थ्यांना दुसऱ्या तालुक्यात उच्चमाध्यमिक शिक्षणासाठी जावे लागत होते. पण आता त्यांची ही मोठी बिकट समस्या दूर होवून स्थानिक तालुक्यातच त्या शिक्षणाची सोय झालेली आहे. व पुढे महाविद्यालय काढण्याचा मानस असून ते त्याकरिता प्रयत्नशील असून पुणे विद्यापीठाकडे तसे प्रकरण पाठविले आहे. व लवकरच त्यांना महाविद्यालयाची परवानगी मिळवण्यात यश येईल असा अंदाज आहे.

शिक्षणासारखे महान कार्य करून आणि तेही अशा भागात की ज्या ठिकाणी लोकसंपर्क अजिबात नाही. अतिशय दुर्गम पहाडात की जिथे वाहन सुद्धा जावू शकत नाही. अशा डनेल, बिलगांव सारख्या भागात सुद्धा शाळा काढून खरोखरच खूप कष्ट घेतले. स्वत: वयोवृद्ध असूनही प्रसंगी पायी प्रवास करतात. ज्ञानाचा हा दिवा जंगलातील गावात प्रखरपणे तेवत ठेवून महान असे कार्य केले व आजही ६५ वर्षे वय होवून सुद्धा अविश्रांतपणे सतत कार्य करीत आहेत. त्यांच्या ४० ते ४५ वर्षाच्या कारकीर्दीत विविध अशा पदावर गौरवास्पद असे कार्य केलेले आहे. त्यांनी भूषविलेल्या पदांचे कदाचित आपणास नवल ही वाटेल. (१) आमदार, महाराष्ट्र राज्य विधानसभा. (२) जिल्हा परिषद सदस्य, (३)

उपसभापती पंचायत समिती अक्राणीमहाल. (४) विशेष दंडाधिकारी. (५) चेअरमन जंगल कामगार सोसायटी. (६) अध्यक्ष, जंगल कामगार सह. संस्था संघ जि. धुळे. (७) उपाध्यक्ष, जंगल कामगार सह. संस्था महाराष्ट्र राज्य पुणे. (८) उपाध्यक्ष, जिल्हा काँग्रेस कमिटी. (९) सदस्य अभ्यासू समिती आश्रमशाळा महाराष्ट्र राज्य. (१०) सदस्य होस्टेल कमिटी महाराष्ट्र राज्य. (११) संचालक सातपुडा तापी-परिसर सह. साखर कारखाना प्रशासक मंडळ पुरुषोत्तम नगर लि. शहादा. (१२) उपाध्यक्ष, पश्चिम खान्देश भिल्ल सेवा मंडळ, नंदुरबार. (१३) अध्यक्ष, सातपुडा सर्वोदय मंडळ धडगांव. (१४) सदस्य ग्रामविकास महामंडळ महाराष्ट्र राज्य. (१५) चेअरमन ग्राम स्वराज्य सोसायटी मुंदलवड. (१६) व्हा. चेअरमन खरेदी-विक्री संघ-धडगांव. (१७) अध्यक्ष, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद पुणे. (आजतागायत) (१८) चेअरमन देवगंगा दूध उत्पादक सह. सोसायटी रामपूर (आजतागायत) (१९) सरपंच ग्रामपंचायत मुंदलवड ता. अक्राणी. (२०) संस्थापक अध्यक्ष, आदिवासी सातपुडा शिक्षण प्रसारक मंडळ, धडगांव.

अशा सरपंचापासून तर उपसभापती, चेअरमन, अध्यक्ष व आमदारापर्यंत विविध पदे सांभाळून त्यांनी विविध क्षेत्रात कार्य केलेले आहे व विशेष म्हणजे शिक्षणासारखे महान कार्य दुर्गम भागात करून आदिवासी विकासाच्या पहिल्याच प्रयत्नात त्यांनी खूप मोठा वाटा उचललेला आहे. वाहनाची सोय नसलेल्या ठिकाणी म्हातारपण येवूनही त्यांना लाभलेल्या कणखर काटक गुणांमुळे आजही ते पहाडातील गावी वेळप्रसंगी पायी प्रवास करून विकासाचा प्रयत्न करताना आढळतात. लोकांच्या कल्याणासाठी झटताना त्यांनी लोकांना सुशिक्षित करून अनेक तरुणांना अधिकाऱ्यांच्या पदापर्यंत पोहोचविले. मात्र स्वत:ची दोनच मुले असूनही त्यांच्या स्वत:च्या मुलांकडे व त्यांच्या शिक्षणाकडे सुद्धा फुर्सत न घेता दुसऱ्याकरिताच फक्त झटत राहिल्याने त्यांचा एक मुलगा पुढे जास्त शिक्षण न घेता शेतकरीच झाला. वा लहान जेमतेम ग्रॅज्यूएट होवून फक्त शिक्षक होवू शकला. अशा तऱ्हेने आयुष्यभर ते समाजाच्या विकासाकरिता झटले व आजही झटत आहेत.

वर उल्लेख केलेल्या कवी यशवंतांच्या कवितेला अपवाद म्हणून की काय त्यांच्या घरी फोन तर नाहीच पण जुनी तुटकीखाट मात्र आजही आहे. आज कालच्या परिस्थितीत आपण पहातो की प्रत्येक छोटे पद धारण करणाऱ्या व्यक्तीकडे त्यांची पूर्वीची स्थिती बदलून बागायती शेती, गाडी, बंगला व भरपूर स्थावर मालमत्ता आढळते. तशीच काही किंवा थोड्या प्रमाणावर महाराजांकडे असावी असे आपल्या मनाला साहजिकच वाटेल कारण त्यांनी धारण केलेल्या पदांच्या सूचीवरून तसा भ्रम होणे साहजिकच आहे. पण वस्तुस्थिती मात्र तशी नाही. एवढ्या ग्रामपातळी वरून पं. समिती जि. परिषदापासून तर राज्य पातळीवरील आमदारापर्यंत त्यांनी धुरा सांभाळूनही त्यांचे घर मात्र कौलारू छप्पराचेच असून त्यातच संस्थेचे छोटे ऑफीस असून फोनच काय पण चांगले फर्निचर सुद्धा आढळणार नाही. गांधीवादी विचारसरणीप्रमाणेच अगदी साधी राहणी खाकीचा नेहरु शर्ट, धोतर, टोपी असा पोषाख. बारीकशी, सडपातळ अंगकाठी व पावणे सहाफुटी उंची, शरीरयष्टी. आता तर ६६ व्या वर्षात पदार्पण करूनही आजही ते एस्.टी.ची वाट न बघता रामपूरहून, ५ कि.मी. असलेल्या कन्साई गावात पायी जाताना मी अनेकवेळा प्रत्यक्ष पाहिले आहे. अशा ह्या

लोकप्रिय आदिवासी नेत्यास त्यांच्या कार्याचा पुन्हा शासनाने गौरव करून १९८५-८६ साली "आदिवासी सेवक" पुरस्कार माननीय मुख्यमंत्र्याच्या हस्ते पुणे येथे प्रदान केला.

एवढी सेवा करूनही पाहिजे तसा आदिवासींचा विकास न झाल्याने त्यांचे मन व्यथित होताना आढळते. त्यांच्या मते आजच्या प्रसंगी भिल्ल समाज आदिवासी विकासाच्या प्रवाहात इतर आदिवासींच्या मानाने खूपच मागे राहिलेला असून तो जास्त रसातळाला जात आहे. नांवे १८ एकर जमीनधारक भिल्ल हा अजूनही सालदारी करतो किंवा पूर्वीच्या भिल्लांच्या जमिनी व आजच्या जमिनी त्यात बऱ्याच प्रमाणात कटती आढळून येईल. पावरा व इतर सातपुड्यातील आदिवासी समाजाच्या जमिनी वाढून ते खूपच प्रगतीपथावर जाताना आढळतील. त्यांच्याबरोबर पोहोचण्याकरिता शासनाने सहकारी शेती शिक्षण या सर्व क्षेत्रात अजून चांगले पाऊल उचलून खरोखर गरीब असलेल्या गरजू व्यक्तीपर्यंत पोहोचविल्या पाहिजेत. अक्राणी तालुक्यात भुईमूग, कापूस भरपूर पिकत असल्याने तेथील व्यापारी तो माल अल्पभावाने खरेदी करून प्रचंड नफा मिळवतात. अशा या प्रसंगाला आळा घालण्याकरिता तेथे शेंग तेलाची ऑईल मिल, कापसाची सूतगिरणी सह. तत्वावर अथवा शासकीय योजनेद्वारे उभारल्या गेल्या तर शेतकऱ्यांना न्याय मिळून अनेक बेरोजगारांना कायमस्वरूपी रोजगार उपलब्ध होईल. व तेलासारखी वस्तू शुद्ध व अल्पदराने प्राप्त होवू शकेल. त्यामुळे शासनाने अशा काही योजनेकडे जातीने लक्ष देवून अंमलबजावणी होण्याकरिता ताबडतोब पावले उचलावयास हवीत.

तसेच आजच्या प्रसंगी राजकारणात असलेले आदिवासींचे राजकीय नेते की ज्यांना महाराजांनी स्वत:च प्रेरणा दिलेली होती असे नेते त्यांच्या शैक्षणिक प्रवाहापासून दूर जाताना आढळतात. त्याबद्दल त्यांना थोडा खेद वाटतो. एका प्रसंगी वक्तव्य करताना ते म्हणतात की, बाळासाहेब मधुकरराव चौधरी सारखे थोर अशी शिक्षण मंत्र्याच्या हुद्यावरची माणसे मला स्वत:हून भेटावयास आली. व ह्या कार्याचे सविस्तर महत्व त्यांना पटून अनेक वेळा त्यांनी ह्या कार्यासाठी सहकार्य दिले. बाळासाहेब चौधरी सारख्या मोठ्या व्यक्ती माझ्या समस्या जाणून घेवू शकतात तर समाज बांधवांच्या विकासाच्या समस्या आजचे नेते का जाणून घेवू शकत नाहीत? त्यांनीही येवून ह्या कार्याची चौकशी करून सहकार्य देवून कार्य वाढवून समाज विकासातील शिक्षणाचा विकास होणेसाठी हातभार लावला तर आपलेच समाज बांधव पुढे येतील. डनेलच्या पुढे महाराष्ट्र गुजराथ, मध्यप्रदेश या तिन्ही राज्याच्या सरहद्दीच्या महाराष्ट्राच्या सीमेतील १० ते २५ खेडी आजही पूर्णत: निरक्षर आहेत. तेथे जर शासकीय अथवा संस्थांनी आश्रमशाळा सुरू केल्या तर तेथील लोकांनाही पुढे भावी काळात माणूस म्हणून जगण्याची प्रेरणा निर्माण होईल. अशा अनेक बाबींमुळे त्यांचे मन आजही व्यथित होताना आढळते.

अशा ह्या आदिवासींच्या सेवेकरिता वाहून घेतलेल्या व ग्रामपातळीपासून ते राज्यपातळीपर्यंत आदिवासींचे प्रतिनिधित्व करून गांधीवादी विचारसरणीने राहून निस्वार्थी जीवन जगून अगदी डोंगराळ प्रदेशातील आदिवासींच्या शिक्षणकार्यात अहोरात्र झटणाऱ्या व डोंगरातील डोंगरी माणसास माणूस म्हणून जगण्याची प्रेरणा देणाऱ्या जनार्दन महाराज रूपी थोर मानवास शतश: प्रणाम करून "सातपुड्यातील गांधी" संबोधून ते वावगे न ठरता गांधींजीच्या विचारसरणीस एक चांगली श्रद्धांजली ठरावी!

● ● ●

# बिनचेहऱ्याचं एक गाव – 'वडफळी'

– डॉ. हेमंत आपटे

उत्तरेला सागांच्या जंगलांनी वेढलेल्या टेकड्या आणि उरलेल्या तिन्ही दिशा कवळून चंद्रहारासारखी रुळणारी देवगंगा नदी, ह्यांच्यामध्ये जेमतेम शंभर सव्वाशे झोपड्या असलेलं बिनचेहऱ्याचं एक गाव —वडफळी. धुळे जिल्ह्यातल्या अक्कलकुवा तालुक्यातलं, महाराष्ट्र आणि गुजराथच्या सीमारेषेवर उभं असलेलं. नदीचा ऐलतीर महाराष्ट्रात तर पैलतीर गुजराथेत. आजूबाजूला अशीच लहानसहान गावं, दक्षिणेला डुमखल, दक्षिण आणि पूर्वेच्यामध्ये कुठेतरी देवरा, पूर्वेला मोवाण, उत्तरपूर्वेला पांढरा माती आणि पश्चिमेला चापडी, ह्याही गावांची सूरत वडफळीसारखीच. गावाला स्वत:चा बाजार नाही. प्राथमिक आरोग्य केंद्र नाही किंवा प्राथमिक शाळाही नाही. गावचे सगळे लोक आदिवासी. हे सगळे भिल्लांपैकीच परंतु आपण मूळचे रजपूत असं मानणारे. वडफळी गावात असे पाच उपजमातींचे लोक रहातात. तडवी, पडवी, वळवी, वसावे आणि गोवारा. परंतु मुख्य वस्ती तडवी अणि वसाव्यांची. एक पडवी कुटुंब, एक वळवी कुटुंब आणि गावाबाहेर गोवाऱ्यांचं एक घर. चहुबाजूंनी डोंगर उतारांवर सागाची आणि बांबूंची जंगलं वाढली आहेत. ह्या जमातींच्या उगमाची एक छान गोष्ट ऐकायला मिळाली, ती अशी. पठाराची वाट चालूलागले. ज्या लोकांनी डोंगरात रहाणं सोडलं नाही ते पूर्वीच्या काळी हे सगळे लोक डोंगरात जंगलात वस्ती करून रहायचे. कालांतराने काहींना डोंगरात रहायचा कंटाळा आला आणि ते झाले 'पहाडवीर' किंवा 'पडवी.' जे लोक पठाराकडे वळले ते 'वळवी.' ज्या लोकांनी पायथ्याशी वस्ती केली ते 'वसावे' आणि जे लोक शेवटी नदीच्या तडापर्यंत पोहोचले ते 'तडवी.' ह्या सगळ्यांची गाईगुरं राखणारे 'गोवारा.'

शहरातून किंवा खेड्यातून, जसा जातीजातींमधून उच्चनीच असा भेदभाव आढळतो तसा ह्या गटांमधूनही आढळतो. ह्या लोकांशी बोलताना हा फरक प्रकर्षाने जाणवला. तडवी सगळ्यात वरचे तर वसावे सर्वात खालचे. तडव्यांची लग्नं लावायला ब्राह्मणच लागतो तर वसाव्यांची लग्नं तडवी भगत किंवा इतर कोणी लावतो. तडव्यांचं जाणं येणं तडव्यांच्यातच. स्वत:ला सोडून इतरांचा उल्लेख, आदिवासी असा करतात. वसाव्यांना हलकं मानण्याचं कारण विचारलं तर 'ते लोक मेलेली गुरं किंवा गाईचं मांस खातात म्हणून,' असं सांगण्यात आलं. तडवी लोकांवर हिंदू तत्वज्ञानाचा प्रचंड प्रभाव पदोपदी जाणवला. घराघरात शंकर, मारुती, देवी इत्यादींचे फोटो आढळले परंतु वसाव्यांच्या घरात मात्र कोणाही देवदेवतांचे फोटो किंवा मूर्ती आढळल्या नाहीत. तडव्यांची गुरं बांधायला घराशेजारी गोठा बांधलेला आढळला; परंतु वसाव्यांची गुरं मात्र घरातच बांधलेली असतात.

ह्या सगळ्या गटांचे परस्पर संबंध आर्थिक किंवा राजकीय बाबींपुरतेच मर्यादित आहेत. परंतु इतर म्हणजे सामाजिक बाबींमध्ये अजिबात संबंध नाहीत. रोटी-बेटी व्यवहार नाहीत. शेतावर मजुरी द्यायची असेल तर ती कोणालाही देतात तेव्हा मात्र जात पाहिली जात नाही. अर्थात् मजुरांतल्या तडवी मजुरांना आणि इतर मजुरांना दिल्या जाणाऱ्या कामात जातीचा विचार होतो. जास्त कष्टाची कामं इतरांना आणि कमी कष्टाची

स्वजातीयांना. कर्ज देताना किंवा घेताना जात पाहिली जात नाही. गावचा सरपंच तडवी आणि पाटील वसाव्यांच्यातला.

ह्या लोकांत विधवा विवाह सर्वमान्य आहेत. त्यामुळे गावात एकही विधवा स्त्री सापडली नाही. विधवेचा शोध घेण्यासाठी शेजारच्या चापडी गावात जावं लागलं. विधवा विवाह समाजमान्य असल्यामुळे विधवेचे केशवपन करणे किंवा पांढरे वस्त्र नेसवणे, अलंकार घालू न देणे असा प्रकार आढळला नाही. आम्हाला भेटलेल्या विधवेने फक्त कुंकू पुसलेले होते. काळ्या पोतीसह इतर सर्व अलंकार अंगावर होते. सुंदर पोत आणि काठपदराची लाल साडी होती आणि ह्या विधवेचं वय जेमतेम २० वर्षे. अर्थात् तिने पुनर्विवाह का केला नाही ह्याचं उत्तर मिळालं नाही.

हे लोक बोलतात त्या भाषेला भिलोरी बोली म्हणतात. परंतु तडवी आणि वसाव्यांची भाषा वेगळी आहे. मराठी, हिंदी अणि गुजराथी भाषेचं मिश्रण असावं अशी ती भाषा वाटते. बरेचदा 'स'चा उच्चार 'ह' असा करतात. आपण जिला 'सुईण' म्हणतो तिला ते लोक 'होयाणी' म्हणतात.

तडवी लोकांच्यात 'तीर' किंवा 'बाण' ह्याला विशिष्ट महत्व आहे. मूल जन्माला आलं की नाव ठेवायच्या वेळेला एक तीर कपाळावर आडवा लावतात. लग्नाच्यावेळी नववधू घरात येण्यापूर्वी उंबरठ्यावर तिच्या कपाळावर दोन तीर उभे लावतात आणि मेल्यानंतर एक तीर हवेत सोडतात, एक तीर प्रेताबरोबर जाळतात आणि एक तीर घरी आणून पूजेत ठेवतात.

वसावे स्त्रियांच्यात दागिने वापरण्याचं प्रमाण तडवी स्त्रियांपेक्षा खूप जास्त आहे. दागिन्यांचे जवळजवळ चाळीस वेगवेगळे प्रकार आढळले. सध्या लहान मुली शहरातल्या मुलींसारखे प्लॅस्टिकचे दागिने वापरताना दिसतात, परंतु लग्न झालेल्या बहुसंख्य स्त्रिया शुद्ध चांदीचे दागिने वापरतात. दागिन्यांकडे रोकड पैसा ह्या दृष्टिकोनातून पाहिलं जातं. वेळ पडली तर पटकन दागिने गहाण टाकून पैसे उभे करता येतात.

देढियापाडा या तालुक्याच्या ठिकाणी या संदर्भात सराफाशी बातचीत करताना बरीच माहिती समजली. शेतीचा हंगाम सुरू होण्यापूर्वी बी-बियाण्यांसाठी, खतासाठी, अवजारांसाठी पैशाची गरज भासते त्यावेळी दागिने गहाण टाकून हे लोक आपली गरज भागवतात आणि ज्यावेळी पिके तयार होतात त्यावेळी धान्य विकून दागिने सोडवून आणतात. त्यामुळे दिवाळीपासून पुढे स्त्रियांच्या अंगावर दागिने दिसू लागतात. ह्या लोकांचे मोठे सण म्हणजे दिवाळी आणि होळी. बरोबर सणांच्या वेळी दागिने अंगावर असतात. आवर्जून लक्षात रहाण्यासारखा दागिना म्हणजे मूंदी. ही एक प्रकारची अंगठी. करंगळी आणि शेजारचं बोट ह्यात घालण्यासाठी त्यावर घुंगुर लावलेले असतात. घरात जात्यावर दळायला बसताना ही मूंदी बोटात घालायची म्हणजे जात्याचा खुंटा बोटांना लागत नाही, शिवाय दळतेवेळी जात्याचा आणि घुंगरांचा एकात एक मिसळून कानांना गोड वाटेल असा आवाज होतो.

हे लोक शेतात चार पाच प्रकारची पिकं घेतात. त्यात मोर, बंटी, - ज्वारी, (गावरान आणि हायब्रिड) तूर, तांदूळ आणि मका ही महत्त्वाची. लग्न झालेल्या स्त्रियांना खळ्यात जायला मनाई असते. आंघोळ केल्याशिवाय पुरुषमंडळीही खळ्यात जात नाहीत. खळ्यात जाण्यापूर्वी पायातले जोडे काढून मग खळ्यात जातात.

मोहाच्या फुलांपासून 'महुवा' नावाची दारू स्वतःच तयार करतात. नदीवर मासे पकडतात. स्वतःच्या परसबागेत जरूरीपुरता तंबाखू आणि गांजा पिकवतात. स्वतःच्या विड्या स्वतःच वळतात. टोपल्या बनवतात, दोर बनवतात. धनुष्यबाण तयार करतात. स्वतःची घरं स्वतःच बांधतात. ह्या सगळ्याला आवश्यक आहे सुदृढ

शरीर. जर एखाद्या नवजात बालकात शारीरिक व्यंग असेल तर त्या बालकाची आई, त्याचं दूध तोडून टाकते आणि त्या बालकाचा अंत करते! हे क्रौर्य की व्यवहार्य? किंमत भावनांना द्यायची की व्यवहाराला. अर्थात् व्यवहार्यतेचं पारडं जड होतं कारण जिथे सगळ्याच गोष्टी जेमतेम जगायला पुरेश्या तिथे 'सोशल लीझर'चा विचार होणंच शक्य नाही. सबंध गावात एकही राखणीचं कुत्रं नाही. कारण जिथे प्रॉपर्टी नाही तिथे राखायचं काय? आणि राखायचं काय हा प्रश्न असेल तर कुत्री हवीत कशाला?

गावात एक अंगणवाडी आहे. तिथे सुकडी वाटतात तेव्हा मुलं शाळेत जातात. काही कारणानी सुकडीचा पुरवठा झाला नाही तर मुलं शाळेत यायची बंद होतात. गावात गेली दोन वर्षे आश्रमशाळा सुरू झाली आहे. मुलं तिथेच रहातात. त्यांना पुस्तक, गणवेश, जेवण, सगळं तिथेच मिळतं.

गावातली रमिला ही सर्वात जास्त शिकलेली मुलगी आहे. ती नववी पास झालेली आहे. शेजारच्या कुठल्यातरी गावात अंगणवाडी शिक्षिका म्हणून शिकवायला जाते.

साधारण पंधरा वर्षापर्यंत मुलींची लग्नं होतात आणि अठरा वर्षापर्यंत मुलांची. मुलगी मिळवण्यासाठी साधारण १५०० ते ५००० रुपयांपर्यंत हुंडा द्यावा लागतो. जर पैसे एकरकमी नसतील तर हप्त्यानी दिले तरी चालतात किंवा सासऱ्याकडे काम करून पैसे फेडले तरी चालतात. ज्या मुलीचे केस लांब आहेत आणि हातापायावर केस नाहीत अशी मुलगी सुंदर मानतात. वधू निवडते वेळी ती कामाला कशी आहे हे पाहिलं जातं. ह्या उलट पुरुषांच्या बाबतीतही सौंदर्याच्या काही ठराविक खुणा पाहिल्या जातात. मिशा नसलेल्या किंवा मिशा काढलेल्या पुरुषाला बायल्या म्हणतात. पुरुषाने एक दोन तडाखे मारणं हे विशेष मानत नाहीत, परंतु अकारण मारहाण होत असेल तर तक्रार घेऊन बाई पंचायतीसमोर जाऊ शकते. मुलगा आणि मुलगी ह्या दोघांना मान्य असेल तरच विवाह होतो. जबरदस्ती केली जात नाही.

सगळ्या लोकांचा जादूटोण्यावर प्रचंड विश्वास आहे. बहुतांशी स्त्रिया नजर लावतात असा समज आहे. आजारी पडलेल्या माणसाचे उपचार भगताकरवी केले जातात. बकरा किंवा कोंबडीचा बळी देण्याची पद्धत आहे. गावात एक नर्स आहे परंतु सहसा तिच्याकडे कोणी उपचार करून घेण्यासाठी जात नाही, अगदी शेवटी तिच्याकडे जातात. एखाद्याने नजर लावली आहे किंवा करणी केली आहे असं पंचायती समोर सिद्ध झालंतर त्या व्यक्तीला दंड करतात. परंतु वारंवार त्या व्यक्तीकडून असे वर्तन घडले तर गावातून बाहेर काढतात किंवा वेळप्रसंगी मारून टाकतात.

गावात आता वीज आलेली आहे. लिफ्ट इरिगेशनची स्कीम झालेली आहे. लोकांकडे ट्रॅन्झिस्टर आहेत, घड्याळं आहेत. परंतु असं असूनही म्हणावी तितकी प्रगती झालेली नाही. बदलायला लोक तयार आहेतही आणि नाहीतही. आपण एकविसाव्या शतकाची आतुरतेनं वाट पहात आहोत परंतु आपल्या बरोबर कितीजण आहेत? जिथे काळ गोठून थांबला आहे अशी किती आदिवासी खेडी किमान सुधारणांसाठी वाट पहात थांबली आहेत?

नाही! हे खरं नाही. जिथे सर्वच गोष्टी आपल्या हातांनी तयार होतात, बाहेरच्या जगावर फारसं अवलंबून रहायला लागत नाही अशी वडफळी सारखी कित्येक आदिवासी गावं, आपल्याला वाटतं त्यापेक्षा जास्त सुखात आहेत.

# भुजंग मेश्राम यांचे अध्यक्षीय भाषण

## जळगांव जिल्हा दलित साहित्य मेळावा, वरणगांव

***माझ्या सहकारी मित्रांनो,***

जळगांव जिल्हा दलित साहित्य मेळावा हा वरणगांव या महाराष्ट्राच्या सीमेवरील गांवात संपन्न होतो आहे. या गांवी शस्त्रनिर्मितीचा सहकारी कारखाना आहे. दलित साहित्याच्या निर्मितीमध्ये आणि वरील निर्मितीमध्ये एक प्रकारचा सुसंगतपणा आहे. वरणगांव सारख्या अनेक गांवांमधून दलित साहित्याचा दारूगोळा तयार होतो आहे. हा दारूगोळा सांस्कृतिक आहे. आणि दलित चळवळीसाठी ते गरजेचे आहे.

दुसरे म्हणजे, हे गांव सीमेवरचे आहे. आणि दलित साहित्याने तर प्रदेशाच्या, सीमा ओलांडल्या आहेत. संयोजकानी वरील दोन्ही बाबींचा संयोग घडवून आणलेला दिसतो. त्याबद्दल त्यांचे आभार मानतो. आणि आणखी एक बाब चांगली ती म्हणजे, कार्यक्रमासाठी जळगांव, भुसावळ सारख्या मोठ्या शहरांचा मोह टाळून त्यांनी या ठिकाणी मेळावा घेण्याचे जाणिवपूर्वक ठरवून अंमलात आणलेले आहे, नाहीतरी दलित साहित्यावरचीसुद्धा आजकाल चर्चा औद्योगिक पद्धती सारखी पुणे, मुंबई, औरंगाबाद, नागपूर व इतर मोठ्या शहरांमध्येच घडताना दिसते. खेड्यात पुष्कळ दलित लेखक, कलावंत असल्याने, वरील चर्चेचे व निर्णय प्रक्रियेचे विकेंद्रीकरण अशा मेळाव्यांनी साध्य होणार असल्याने, मला मोकळेपणे व परखडपणे आजकालच्या दलित साहित्याबद्दल बोलणे आवश्यक वाटत आहे.

दलित साहित्याची चळवळ सुरू होऊन आता ब्रीच वर्षे होऊन गेलेली आहेत. या साहित्याची नोंद काळालाही घ्यावीच लागली आहे. या साहित्याने सर्वकष परिवर्तनाविषयी आणि वाङ्मयीन मूल्यांविषयी नवे प्रश्न उभे केले आहेत. दलित साहित्याचे जनकत्व आणि प्रेरणा ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहे, याबद्दलही आता कुणाची शंका उरलेली नाही. एवढेच नव्हे तर बाबासाहेबांच्या व दलित साहित्याच्या प्रभावामुळे सुरू झालेल्या आदिवासी साहित्य चळवळीची व दलित-आदिवासी-ग्रामिण संयुक्त साहित्य चळवळीची प्रेरणाही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचीच आहे. त्याबद्दल अधिक मी पुढे सांगणारच आहे.

तात्पर्य असं की, दलित साहित्याचा प्रवाह हा मोठा सागर होत चालला आहे. तरीही 'दलित साहित्याची व्याख्या आणि वास्तव यामध्ये असलेले अंतर काही कमी होऊ शकले नाही,' असा आक्षेप घेतला जातो. दलित म्हणजे सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिकदृष्ट्या जो पीडित व उपेक्षित आहे तो यामध्ये तथाकथित तळागाळातल्या जाती-जमाती, भटक्या व विमुक्त जाती अशांचा समावेश होतो. या सर्वांचे दलित साहित्य प्रतिनिधित्व करते, अशी पहिल्याच इंद्रीत दलित साहित्याच्या पहिल्या पिढीने घोषणा केली. घोषणा बरोबर होती. या सर्वसमावेशक संकल्पनेला बाबासाहेबांच्या विचारांचा पाया होता. परंतु दलित साहित्यात प्रारंभी बौद्धेतर पीडित समूहांचे प्रतिबिंब साहित्यात पडलेले दिसत नाही. यावर काही मित्र असे म्हणतील की, 'बौद्धेतर पीडित समूहांनी दलित

साहित्याच्या मुख्य प्रवाहात सामिल व्हायला पाहिजे होते. त्यांच्यामधून लेखक निर्माण होण्याऐवजी, आमच्याकडून त्यांच्यावरील लेखनाची अपेक्षा कशी धरता येईल ?' ठीक आहे. परंतु आपण तर बाबासाहेबांचे विचार सर्वदूर पोचवण्यास कटीबद्ध आहोत, असे आहे तर बौद्धेतर समूहांची संस्कृती, त्यांचे प्रश्न आपण समजून घ्यायला हवेत. नाहीतरी या देशातील आदिवासी व भटक्या विमुक्तांना भाजीपाल्यांसारखे सर्वांनी वाटून घेतले आहे. त्यांच्यात विश्व हिंदू परिषदेपासून ते नक्षलवाद्यापर्यंतची मंडळी पक्ष संघटना आपापले काम करतांना दिसतात. त्यांच्यावर लेखन करणाऱ्यांच्या व त्यांच्या प्रचार करणाऱ्यांच्या प्रेरणा तपासल्या तर, त्या 'आपल्या पूर्वजांच्या पापांचे प्रायश्चित घेणे,' 'त्यांचे बळेबळेच अथवा विश्वासात घेऊन हिंदूकरण करणे,' व 'दलित चळवळीपासून त्यांना जाणिवपूर्वक दूर ठेवणे,' 'त्यांच्यावर आपल्या मानववंशशास्त्रीय संशोधनाचे प्रयोग करणे,' 'एखादी पी.एचडी अथवा एखादा पुरस्कार मिळवून घेणे,' ह्या आहेत. या प्रेरणा वरील मानवसमूहांत किती उपयोगी आहेत ? त्यांना बाबासाहेबांच्या विचारमार्गाशिवाय पर्याय नाही. परंतु त्यांचेपर्यंत पोचवणार कोण ? दलित लेखक व कार्यकर्त्यांनी याचा विचार करून त्यांचेच काम सुरू केले, त्यांच्यावर लेखन केले तरच "दलित" या शब्दाची व्याख्या व वास्तव यांच्यातले अंतर कमी होईल.

दुसरा मुद्दा, आज मोठ्या संख्येने आपले लेखक लेखन करीत आहेत. चांगली गोष्ट आहे. सध्या दलित साहित्याची तिसरी पिढी लिहिते आहे, असे म्हटले जाते. परंतु या विपुल लेखनाला गुणात्मकतेची योग्य प्रमाणात संगत आहे का ? आपल्या लेखकांची पिढी ठरवण्याचा प्रश्न वादग्रस्त आहे. कारण त्यांच्या मोजपट्ट्या वेगवेगळ्या आहेत. पहिल्या लेखक पिढीत लेखन करणाऱ्यांमध्ये समीक्षकांनी बंधुमाधव, शंकरराव खरात, अण्णाभाऊ साठे, गंगाधर पानतावणे, केशव मेश्राम, दया पवार, बाबुराव बागुल, वामन कर्डक, नामदेव ढसाळ ही नावे मांडली आहेत. बरोबर आहे. ही यादी आणखी थोडी वाढू शकेल. परंतु पहिल्या पिढीचे एक बरे होते. की, त्याचे मोठ्या प्रमाणात स्वागत झाले व जवळपास सर्वच लेखकांची नोंद घेतली गेली. अपवाद पहिल्या दलित साहित्य सेवक परिषदेचे अध्यक्ष : बि.सी. कांबळे यांचा ! आपला मुद्दा आहे वरील विपुल लेखनाचा गुणात्मकतेशी संबंध आहे किंवा कसे ? तर समीक्षकांच्या वर्गीकृत तिसऱ्या पिढीत, म्हणजे तुमच्या आमच्या पिढीत ही गुणवत्ता मोठ्या प्रमाणात आहे. परंतु त्याची दखल कोण घेतो ? काही प्रमाणात हरिश खंडेराव यांच्या समीक्षेचा अपवाद वगळता, नव्या दलित लेखकांकडे सर्वांचे दुर्लक्ष झाले आहे असे माझे स्पष्ट मत आहे. दलित कवितेची समीक्षा करायची म्हटली तर समीक्षक नामदेव ढसाळांच्या पुढे जायलाच तयार नाहीत. ही गंभीर बाब आहे. नव्या अस्सल लेखकांकडे दुर्लक्ष होण्याची पार्श्वभूमी जरा विचित्र आहे. पहिल्या-दुसऱ्या पिढीचे दलित लेखकांच्या वाङ्मयीन गरजा पूर्ण झाल्याने, त्यांच्यापुरता संघर्ष संपत चालला आहे. मराठी साहित्य संमेलनातून त्यांचा सत्कार होतो आहे, हा लेखक दिवाळी अंकांसाठी मोठ्या प्रमाणात लेखन करतो आहे. व्याख्याने देतो आहे. पहिल्या दुसऱ्या पिढीच्या दलित लेखकांची थोडी गोची झाली आहे. मराठी साहित्याने आपल्याला व दलित साहित्याला मान्यता दिली असल्याने, आता साहित्यात संघर्षाऐवजी त्यांना समन्वय आवश्यक वाटू लागला आहे. सम्मिलिकरणाची भाषाही सुरू

झाली आहे. हे लेखक आता आमच्या नव्या लेखकांच्या पुस्तकांना प्रस्तावना लिहून आशीर्वाद देत आहेत. परंतु त्यात तरी चोखंदळपणा आहे का? तर अभिप्रायातील उदात्तिकरणामुळे आमच्या नव्या लेखकांचे नुकसान होत आहे. धुमिलच्या कवितेत या ओळी आहेत–

"वो थोकते हैं हमारी पीठ
तो टूट जाती है हड्डियाँ –"

हे आमचे पाठ थोपटून इतके कौतुक करतात की, त्यामुळे आमच्या बरगड्या पार खिळखिळया होताहेत. संस्कृतीकरणामुळे असे होणारच. आमच्या जेष्ठ दलित लेखकांचे कौतुकही धुमिलच्या वरील ओळींसारखे आहे की काय, इतपत शंका येते. इथे डॉ. गंगाधर पानतावणे सरांबाबत अपवाद करता येईल. त्यांनी आमच्या तिन्ही पिढ्या तयार केल्या आहेत. मात्र त्यांना आता विनंती कराविशी वाटते की, अस्मितादर्श मधील त्यांनी 'दलित कवी प्रोत्साहनपर योजना,' आता बंद करून, जे अस्सल आहे, त्याचीच नोंद घ्यावी. त्यामुळे जे नवे लेखक कुठल्याही मोठ्या लेखकांच्या कंपूमध्ये नाहीत, ते अस्सल लिहितात, त्यांना न्याय मिळू शकेल. कारण प्रत्येक मोठ्या दलित लेखकांच्या चांगल्या नव्या लेखकांच्या याद्या वेगवेगळया आहेत. निकष वेगळे आहेत. मी इथे ज्येष्ठ लेखकांबद्दल आकसाने नाही बोलत. परंतु नव्या दलित लेखकांवर निःपक्षपातीपणे संस्कार करून त्यांना विकसित करायला आमच्या पहिल्या पिढीला कुठे वेळ आहे? पहिल्या पिढीतील काही लेखकांबद्दल आपल्या पिढीची ही प्रतिक्रिया आहे. ज्येष्ठ दलित लेखकांनी ती समजून घेतली पाहिजे, तर ही साहित्य चळवळ पुढे जाणार आहे.

आज दलित साहित्य चळवळीचे उदात्तिकरण जास्त होत आहे. आपल्या हितशत्रूंना हे हवेच आहे. हे टाळणे आवश्यक असल्याने या भाषणात मी आत्मटीकेवर अधिक भर दिला आहे. तिसरा मुद्दा आहे नावाचा. "दलित साहित्य" हा शब्द कालबाह्य व गुळगुळीत झाला असल्याने, "आंबेडकरी साहित्य" ह्या नावाने ही चळवळ आता उभारली पाहिजे, असे आग्रही प्रतिपादन आमच्या पिढीचे समीक्षक हरिश खंडेराव यांनी केले आहे. त्याला डॉ. गंगाधर पानतावणे यांनी दुजोरा दिला आहे. वास्तविक १० वर्षापूर्वीपासून अस्मितादर्शच्या अंकात, "आम्हास हवे आंबेडकरी साहित्य, आम्हास नको मुखवट्यांचे साहित्य" अशी जाहिरात यायची. मध्यंतरी विजय सोनवणे यांनी "दलित साहित्य का नको?" हे पुस्तक लिहिले. भाऊसाहेब अडसुळांनी बौद्ध साहित्याचा आग्रह धरला. या पार्श्वभूमीवर या आग्रही प्रतिपादनाबद्दल व वर्तमानातल्या वास्तवाबद्दल बोलले पाहिजे.

खरं म्हणजे बऱ्याच पिढीत समूहांची जातनामे इतरांनी ठेवलेली आहेत असे दिसते. प्रत्येक जाती-जमातीने आपले नाव संबोधनापुरते ठेवले परंतु इतरांनी त्यांना दिलेल्या नावानेच ते ओळखले जातात. उदा. लोक लमाण समाजाला बंजारा म्हणतात ते स्वतःला गोरमाटी म्हणतात. मातंग स्वतःला आंबुजवाय, गोंड स्वतःला कोया म्हणतात. अशी यादी लांबवता येईल. मुद्दा असा की, दलित साहित्य हे नाव सुद्धा इतरांनी दिलेले आहे. व्यवहारात तेच नाव आज रूढ आहे. आपण मात्र आपल्या साहित्याचे नाव स्थळ, काळ परत्वे 'बौद्ध साहित्य,' 'आंबेडकरी किंवा आंबेडकरवादी साहित्य,' अशी नावे देण्याचा प्रघात सुरू करतो आहोत. दलित साहित्य चळवळीचे व लेखकांचे निरीक्षण करू जाता, खालील निरीक्षणे आढळतात.

(१) दलित साहित्य परिषद अशी केंद्रस्थानी असलेली कुठली संस्था नाही.

(२) मात्र अशा २-३ दलित साहित्य परिषदा आहेत.

(३) दलित लेखकाचे लिहिण्यामधले व आचरणामधले अंतर सर्वसाधारपणे वाढते आहे.

(४) दलित साहित्य चळवळीत सवतासुभा व यादवीचा धोका निर्माण होतो आहे.

(५) बरेच दलित लेखक हे दिवाळी अंकांमधून लिहितात, तर बरीच मंडळी आंबेडकरी असल्याचा दावा करीत दरवर्षी अंक काढतात.

(६) काही प्रस्थापित दलित मठाधिपती झाले आहेत. त्यामुळे दलित लेखकांमध्ये कंपूशाही वाढते आहे.

(७) साहित्यबाह्य व असामाजिक निकष व मानदंडांना महत्व प्राप्त झाले आहे.

(८) प्रस्थापित दलित लेखकांचे व नव्या पिढीतील अस्सल लिहिणाऱ्या दलित लेखकांचे प्रकाशक वेगवेगळे आहेत. नवा लेखक कर्ज काढून पुस्तक काढतो., तर जुना लेखक पुण्या-मुंबईच्या प्रकाशक वलयांमध्ये वावरतो आहे, अलिप्त आहे.

(९) कादंबरी, कथा आणि कविताही मोठ्या प्रमाणावर, बाबासाहेबांचे नाव घेत-घेत आत्मचरित्रात्मक स्वरूपात लिहिली जाऊ लागली.

(१०) दलित साहित्याने आदिवासी साहित्याची दखल घेतली नसून इतर समदु:खी साहित्य चळवळींसोबत समन्वय नाही.

(११) स्पर्धांसाठी लिहिले जाणारे साहित्य दलित साहित्यात येऊ लागले.

(१२) दूरदर्शन व आकाशवाणी यावरील दलित साहित्याच्या बद्दलचे कार्यक्रम सुमार होत आहेत, त्यामुळे आपल्या साहित्याची काहीशी बदनामी होत आहे.

(१३) दलित कवी संमेलने, विनोदी कवी संमेलनांसाठी इन्स्टंट टाळया घेण्याच्या उद्देशाने गाजू लागली, त्यातील गंभीरपणा नाहीसा होत चाललाय.

वरील निरीक्षण ही सर्वसाधारणपणे असून कटू अशी आहेत.

मग वरील पार्श्वभूमीवर आंबेडकरी लेखक आणि आंबेडकरी साहित्य कशास म्हणायचे? ज्याच्या प्रत्येक दहा ओळींत बाबासाहेबांचे नाव असते त्याला आंबेडकरी साहित्य म्हणायचे का? जे साहित्य अजूनही १९५६ च्या पूर्वकालखंडात घुटमळते त्याला आंबेडकरी साहित्य म्हणायचे काय? जो लेखक आंबेडकरी विचारासोबत सेक्स किंवा लैंगिक अभिनिवेश तोंडी लावायला घेतो, तो आंबेडकरी लेखक का? आंबेडकरी विचारांची पथ्ये आहेत, ती सोपी, सुटसुटीत आहेत. समाजाभिमुख राहणे, आचरण. मात्र सोईनुसार आंबेडकरी म्हणवणाऱ्यांना ही पथ्ये पाळणे अवघड आहे. कारण परंपरेला व हिंदू संस्कृतीला नकार देणे सोपे आहे. परंतु त्याला समांतर असा कृती कार्यक्रम राबवणे कठीण आहे. याची कारणे--

(१) प्रकाशन व्यवसाय प्रस्थापित मराठी प्रकाशकांच्या ताब्यात आहे. दलित साहित्य चळवळीत प्रकाशन व्यवसाय फुटकळ व परावलंबी आहे.

(२) एकलव्यासारखे प्रस्थापित मराठी लेखकांच्या मान्यतेची, आशीर्वादाची आमच्या दलित लेखकांना निकड वाटू लागली आहे.

(३) दिवाळी अंक या प्रकाराला दलित लेखकांनी पर्याय दिलेला नाही.

(४) प्रस्थापितांना तेथे जाऊन धक्के देण्याच्या सबबीखाली आमच्या लेखकांना अ.भा. मराठी साहित्य संमेलनात जाणे संस्कृती करणाचा रेटा वाढवणे गरजेचे वाटते.

(५) मराठी साहित्य हे हिंदू संस्कृतीसारखे, दलित साहित्याला स्वत:मध्ये सामावून घेण्यात

यशस्वी होत आहे. बि.सी. सेल सारखी अवस्था दलित साहित्याला अनुदान म्हणून मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. दलित साहित्य हा मराठी साहित्याचा एक घटक झाला की, दलित साहित्याची लढाई संपेल का?

(गौतम बुद्धाला दशावतारात सामावून घेतले होते, त्याची इथे नकळत आठवण होते.)

(६) लोकांपर्यंत लवकर पोचण्याच्या घाईपाईत आमच्या लेखकांना दूरदर्शन व आकाशवाणीच्या "मागणी तसा पुरवठा," या तत्वावर मोह निर्माण झाला आहे.

(७) बहुभाषिक लेखन ही दलित साहित्याची गरज असूनही केवळ ग्रांथिक मराठीत जास्त दलित साहित्य लिहिले जातेय. बोली भाषांबद्दल न्यूनगंड व पुणेरी मराठीची आटापिटा दलित साहित्याला किती न्याय देणार?

(८) पारंपारिक मराठी साहित्याशी आपल्या साहित्याने संघर्ष जाहीर केला असून, मात्र संघर्षासाठी प्रस्थापितांशी वाईटपणा घेण्यास कुठलाही दलित लेखक तयार नाही.

(९) आमच्या प्रस्थापित दलित लेखकांचा वर्ग बदलला की काय याची शंका येते.

एस.टी. मध्ये घुसेपर्यंत, 'पुढे सरका, जागा भरपूर आहे. दार उघडा," म्हणणारा प्रवासी, "आता दार बंद करा, कुणाला आत घेऊ नका," जागाच नाही! असे एस.टी.त चढल्यावर बोलतो. तसेच आमचे प्रस्थापित दलित लेखक वाटतात. त्यांना आदरपूर्वक पण निश्चयाने जाब विचारणे आवश्यक आहे. नाहीतर आपल्या पुढची पिढी आपल्याला माफ करणार नाही.

आज मोठ्या प्रमाणावर बौद्धेतर लेखक आंबेडकरी विचारांची प्रेरणा घेऊन लिहितो आहे. त्यांचेवर आपण "आंबेडकरवादी म्हणून जाहीर करा, मगतरच बोला," असे गनपॉईंटवर बोलणार आहोत का? कारण हे बौद्धेतर तरुण लेखक कार्यकर्ते आपापल्या समाजात व आपल्या कुवतीनुसार, लोकांना पचनी पाडत, त्या त्या समाजाची मानसिकता बघून बाबासाहेबांचे विचार रुजवत आहेत. याचे भान "आंबेडकरी साहित्य" या संकल्पनेत असणे आवश्यक. याबाबत घाईगर्दीने निर्णय न घेता त्यावर लोकमत घ्यावे. हरिश खंडेरावांनी "आंबेडकरी साहित्य" या संकल्पनेची मांडणी मोघमपणे केली आहे. व आंबेडकरी लेखक म्हणून जी यादी दिली आहे, ती वादग्रस्त आहे. "आंबेडकरवादी साहित्यिकांची बांधिलकी," व "आंबेडकरवाद आणि मराठीतील विद्रोही कविता" ही प्रकरणे कसरत करीत केशव मेश्राम हे यशवंत मनोहर पेक्षा कसे श्रेष्ठ कवी हे सांगण्यातच खर्ची पडली आहेत. हे विषयांतर झाले आहे. मनोहर-मेश्राम यांचेतील श्रेष्ठ कोण याबाबतचे त्यांनी निकष सांगितले असते तरी पुरे होते. मागे सांगितलेल्या निरीक्षणाच्या पार्श्वभूमीवर किती लेखक कसोटीला उतरतील?

माझ्या मते माझ्या समकालीनांपैकी सुधाकर गायकवाड, मिना गजभिये, सुरेखा भगत, वाहरू सोनवणे, लोकनाथ यशवंत, विनायक तुमराम, धर्मराज निमसरकर, राम दुतोंडे, रविचंद्र हडसनकर, गौतम शिंदे हे आंबेडकरी विचारांना न्याय देऊ शकतील असा माझा विश्वास आहे. नावे मुद्दाम निवडक व नि:पक्षपातीपणे सांगितली आहेत. आत्मटीकाही केली आहे. आत्मपरीक्षणाशिवाय आत्मसन्मानाला धार येत नाही. तात्पर्य, दलित साहित्य मराठी साहित्याच्या दावणीला बांधले जाण्याच्या शक्यता बळावल्याने, दलित साहित्याचे नामांतर घिसडघाईने करू नये असे वाटते. तथापि, हरिश खंडेरावांनी एका महत्वाच्या मूल्याचा प्रश्न उपस्थित केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करतो.

दलित कवितांच्या प्रकाशनांमध्ये अलीकडे, अलीकडेच प्रकाशित कवितांचे संपादन करण्याची पद्धत सुरू झाली आहे. यामध्ये "विद्रोही कविता," "दलित प्रेमकविता," "नामांतर कविता," "माय," "पाइजन्ड ब्रेड," हे संग्रह चाळले असता, सर्वच संपादक सर्वसमावेशकपणाचा दावा करतात. परंतु वस्तुस्थिती काय आहे? "विद्रोही कविता" संग्रहातील काही कवी अनावश्यक वाटतात., तर या संग्रहात सुधाकर गायकवाड, वाहरु सोनवणे, लोकनाथ यशवंत यांची गैरहजेरी प्रकर्षाने जाणवते.

अर्जुन डांगळे यांनी "पॉइजन्ड ब्रेड" हा दलित साहित्यावरील ग्रंथ इंग्रजीत संपादित करताना राजा ढाले सारख्या मातब्बर विचारवंताला वगळले आहे. बाकीच्या संपादित संग्रहाबद्दलही असेच म्हणता येईल. अलीकडे मराठीत व दलित साहित्यात येणाऱ्या संपादित कवितासंग्रहांची नावे व संख्या पाहिली की ते केवळ विद्यापीठीय अभ्यासक्रमात लावण्यासाठीच घिसाडघाईने काढले जातात की काय अशी शंका आहे. याबाबतीत काळ्या कवितांचा 'मॉडर्न आफ्रीका पोएट्री' हा संपादित संग्रह वाचला असता, त्यांनी कसदार कवितांचीच निवड केल्याचे आढळून आले आहे. निग्रो कविता ही दलित कवितेसारखी अल्पसंतुष्ट व आत्मसंतुष्ट झालेली नाही. उदाहरण म्हणून ही कविता बघा. दलित कवीनाही ही मात्रा लागू आहे.

कवीचे नाव ॲटोंनि जॅकीन्टो, कवितेचे नाव आहे--

***--पोयम ऑफ अलायनेशन--***

धिस इज नॉट येट माय पोयम
दि पोयम ऑफ सोल ॲण्ड ऑफ माय ब्लड
नो
आय स्टिल लॅक नॉलेज ॲण्ड पॉवर टू राईट
माय पोयम
द ग्रेट पोयम आय फिल ॲलरेडी टर्नींग इन मी
माय पोयम वंडर्स ॲमलेसली
इन दी बुश ऑर इन दी सिटी
इन दी व्हाईस ऑफ दी वावींड
इन दी सर्च ऑफ दी सि
इन दी ॲस्पेक्ट ॲण्ड दी बिईंग

बट माय पोयम इज नॉट फॅटालिस्ट
माय पोयम इज अ पोयम दॅट ॲलरेडी वॉटस
ॲण्ड ऑलरेडी नोज
माय पोयम इज आय – व्हाईट
माऊंटेड ऑन मी ब्लॅक
राईडींग थ्रू लाईफ

दलित साहित्याची नाळ वैश्विक पातळीवर निग्रो साहित्याशी जोडली पाहिजे. अशी नेहमी अपेक्षा व्यक्त होते. परंतु आपण मंडळी इतकी स्वयंकेंद्री आहोत की, निग्रो सोडाच, परंतु इथे विखुरलेल्या पीडितांशीही आपल्याला नाळ जोडता आली नाही.

निग्रो साहित्याशी नाळ जोडायला आपल्याला कुणी रोखलं? आपल्या पिढीच्या लेखकांनी हे साहित्य समजून घ्यावं. कवी हा एक प्रकारे संशोधक असतो, त्यामुळे त्याने मानववंशशास्त्र, इतिहास, समीक्षा, सौंदर्यशास्त्र पचवून घेतलं पाहिजे. इतरांचंही वाचलं पाहिजे.

काही वर्षापूर्वी जळगांव येथे भरलेल्या अस्मितादर्श लेखक मेळाव्यातील परिसंवादात मी "दलित साहित्यात बाल साहित्य अत्यंत गरजेचे आहे." असे आग्रही मत मांडले होते. त्यावेळी त्या मताची चेष्टा झाली. "आपल्या घरात तथागत व बाबासाहेबमय वातावरण असल्याने वेगळ्या बाल वाङ्मयाची गरज काय?" असाही चेष्टेचा सूर निघाला.

परंतु मी गंभीरपणे आपल्या सर्वांना विनंती करतो की, या प्रश्नाकडे आपण दुर्लक्ष करू नये कारण--

(१) आपल्या लहान मुलांसाठी आपल्याकडे प्रभावी संस्कार केंद्रे नाहीत.

(२) आपल्या वारसांचे हितशत्रू पंचतंत्र, इसापनिती, विविध पुस्तकांद्वारे मुलांचे विश्व प्रदूषित करतात असे दिसते.

(३) धर्मांतरानंतरही आजही आपल्याकडे जुने अवशेष सापडतात. पर्यायी जीवनमार्गाचा अंमल अवघड झाला आहे.

(४) आपल्या मुलांना आपली नवी परंपरा, आपल्या पूर्वजांच्या चांगल्या गोष्टी सांगणे आवश्यक.

(५) आपल्या मुलांसाठी वेगळी नियतकालिके नाहीत.

वरील बाबींचा विचार केल्यावर, कथा, कविता, बडबडगीते आपल्या लेखकांना लिहिता येतील.

दलित साहित्य हे माझे, तुमचे व्यासपीठ आहे. या व्यासपीठाचा गुण असा की, वर्षानुवर्षे गप्प असलेला माणूस बोलू लागतो. कारण कालपर्यंत मला अधिकार नव्हता, माझे स्टेज नव्हते. वाहरु सोनवणे आपल्या कवितेत म्हणतात की,

"आम्ही स्टेजवर गेलोच नाही
आणि आम्हाला बोलावलंही नाही,
बोटांच्या इशाऱ्यांनी
आमची पायरी आम्हाला दाखवून दिली
आम्ही तिथेच बसलो
आम्हाला शाबासकी मिळाली
आणि ते स्टेजवर उभे राहून
आमचे दु:ख आम्हालाच सांगत राहिले
आमचे दु:ख आमचेंच राहिले
कधीच त्यांचे झाले नाही."

आज मी माझ्या स्टेजवर आहे. दलित साहित्याच्या प्रेमापोटी, हितापोटी बोलतो आहे, आत्मटीका करतो आहे. मी माझ्या पिढीच्या लेखक, कवी, कलावंतांना जे लेखकांचे व साहित्याचे प्रश्न सांगितले त्याची चर्चा मोकळेपणे व्हावीच, तथापि हे प्रश्न आपल्यालाच सोडवावे लागणार असल्याने माझ्या खालील सूचनांचा गंभीरपणे विचार व्हावा.

(१) नव्या दलित लेखकांनी सहकारी तत्वावर प्रकाशन संस्था व नियतकालिके काढून दलित साहित्य स्वयंपूर्ण करावे व ग्रंथ वितरणाबाबत नियोजन करावे.

(२) दलित साहित्याचे मराठी साहित्यासोबत संबंध असल्यास ते कसे असावे याबाबत दूरगामी व निश्चित धोरण आखून घेतले पाहिजे.

(३) दलित लेखकाने समाजाशी अलिप्तपणे न वागता कार्यकर्त्यांशी समन्वय ठेवला पाहिजे.

(४) दलित साहित्यात संशोधनात्मक लेखनाची पोकळी भरून काढण्यासाठी, संशोधनात्मक लेखन केले पाहिजे. व कवितेचा अतिरेक करण्याऐवजी एकांकिका व नाटक हा वाङ्मय प्रकार विकसित करणे आवश्यक आहे.

(५) दलित साहित्य चळवळीत घुसडलेले काही अनिष्ट पायंडे काढून टाकून नवीन नितिमान मानदंड निर्माण केले पाहिजेत.

(६) शिक्षणात गळतीचे प्रमाण जसे जास्त आहे, तसे दलित लेखकांतही गळतीचे प्रमाण बरेच आहे. म्हणजे लेखन सात्यताचा काहीसा अभाव व काही काळानंतर लेखन ठप्प होणे थांबले पाहिजे.

(७) नव्या दलित लेखकांच्या कार्यशाळा व प्रबोधन शिबिरे सातत्याने भरवली पाहिजेत.

(८) गांव तेथे वाचनालय हा उपक्रम दलित लेखकांनी कार्यकर्त्यांच्या मदतीने राबवला पाहिजे.

(९) दलित साहित्य संशोधन संस्थेची निर्मिती होणे आवश्यक.

(१०) दलित लेखकांच्या तिन्ही पिढ्यामध्ये सुसंवाद होणे आवश्यक आहे.

● ● ●

# आदिवासी बोली भाषा प्रकल्प

**— मोहन धनकर**

***शैक्षणिक उन्नयन***

आदिवासी क्षेत्रात आदिवासी समाजाची बोलीभाषा व शाळेत माध्यम म्हणून वापरली जाणारी प्रादेशिक भाषा यातील अंतर हा त्या क्षेत्रातील मुलांच्या शिक्षणात मोठा अडसर आहे. हा अडसर दूर व्हावा म्हणून आदिवासी मुलांना त्यांच्या मातृभाषेद्वारे प्रादेशिक भाषेकडे सहज वळता यावे म्हणून आदिवासींसाठी बोलीभाषेतून शैक्षणिक साहित्य तयार करण्याचा प्रकल्प हाती घेण्यात आला.

पुणे येथील शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेकडे हे काम देण्यात आले. त्यानुसार आदिभारती व बालवाडी या सारखी पुस्तके तयार करण्यात आली. या पुस्तकांना चांगला प्रतिसादही मिळाला. प्रस्तुत प्रकल्पास आदिवासी विभागाचे अर्थसहाय्य असून त्यासाठी तज्ज्ञांचे संचालक मंडळ आहे. प्रकल्पाची अंमलबजावणी शिक्षण खात्याकडे आहे. परंतु प्रस्तुत प्रकल्पाशी संबंधित खात्यात समन्वय नसल्यामुळे प्रकल्पाचे काम बंद होण्याच्या मार्गावर आहे असे कळते.

प्रकल्पावर काम करणाऱ्या सहयोगी भाषा तज्ज्ञांची गेली १५ वर्षे सतत उपेक्षा झाल्यामुळे प्रकल्पाचा बोजवारा उडण्याची भीती निर्माण झाली आहे. प्रकल्पात काम करणाऱ्या तज्ज्ञांना वेतन व भत्ते मिळून दरमहा ८०० रु. मिळतात. त्यांच्या हाताखाली काम करणारे कारकून शिपाई यांना जादा पगार असून रजा आदी सवलती आहेत. याबाबत आपली उपेक्षा होत असल्याची भावना बळावल्यामुळे बरेच तज्ज्ञ सोडून निघून गेले आहेत.

प्रस्तुत प्रकल्पान्तर्गत चंद्रपूर, गडचिरोलीसारख्या दुर्गम आदिवासी क्षेत्रात अनेक दिवस स्वखर्चाने राहून, आदिवासी स्त्री-पुरुषात व कुटुंबात मिसळून तज्ज्ञांनी गोंडी व माडिया यासारख्या भाषा हस्त केल्या. त्या आधारावर पुस्तके तयार केली. आपल्या होणाऱ्या उपेक्षेबद्दल प्रकल्पातील भाषातज्ज्ञांनी शासन व राज्यपाल यांच्याकडे अनेकदा लिहिले परंतु त्यांच्या म्हणण्याकडे लक्ष देण्यात आले नाही अशी तक्रार आहे.

आदिवासी क्षेत्रात दळणवळणाची साधने नसल्यामुळे आणि आर्थिक व सामाजिक मागासलेपणा असल्यामुळे शिक्षण प्रसाराचे काम कठीण होते. श्री. वामनराव गड्डमवार चंद्रपूर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष असताना आदिवासी विभागात शिक्षक नेमताना त्यांनी काही अटी शिथिल करून घेतल्या. त्यात स्थानिक बोली जाणणाऱ्या व्यक्तीस प्राधान्य देण्यात आले. आवश्यक व शैक्षणिक प्रशिक्षण पात्रतेऐवजी स्थानिक बोलींच्या ज्ञानास प्राथमिकता देऊन शिक्षक नेमण्याचा प्रयत्न केला व त्याचे अनुकूल परिणाम प्राप्त झालेत.

आदिवासींच्या प्रगतीत अज्ञान ही सर्वात मोठी अडचण आहे. आदिवासी साक्षर व शिक्षित झाला तर स्वत:ची रोजीरोटी मिळविण्याचा प्रयत्न तो विद्यमान सामाजिक व

आर्थिक वातावरणाचे कवच फोडून केल्याशिवाय राहणार नाही. शिक्षण प्रसार हे या क्षेत्रातील जिकिरीचे कार्य असून दीर्घ परिश्रमातून साकार होणारे आहे.

आदिवासींच्या सांस्कृतिक जीवनातील उदात्त संदर्भ व कलाकौशल्य यांचे जतन करायचे असेल तर त्यांचे भावविश्व जपले पाहिजे. या भावविश्वासाठी त्यांच्या बोलींचे जतन व संवर्धन आवश्यक आहे. आदिवासी विभागात नक्षलवादी सक्रीय आहेत. शासन आदिवासींशी संपर्क ठेवण्यासाठी प्रयत्नशील असताना संपर्काचे हे प्रभावी माध्यम उपेक्षेची शिकार व्हावे हे दुर्दैव आहे.

शासन एकीकडे आश्रम शाळा सुरू करते. विद्यमान शाळेतील मुलांची उपस्थिती वाढावी यासाठी प्रयत्न करते. उपस्थिती व इतर अटीबाबत सहानुभूतीचे धोरण स्वीकारते. अशा पार्श्वभूमीवर आदिवासी बोलीभाषा प्रकल्पाची परवड अनाकलनीय आहे. आदिवासी कल्याण हे शासनाचे महत्त्वाचे उद्दिष्ट. प्रस्तुत प्रकल्प सुरू असण्यात आदिवासींचे निश्चित कल्याण आहे.

आदिवासी कल्याणाबरोबरच भाषा, साहित्य संशोधन, संस्कृती, व कलाजीवन यांचा अभ्यास करणारे सारेच इकडे उदासीन होऊन चालणार नाही. या प्रकल्पाकडे सर्व संबंधित व्यक्ती आणि संस्था यांनी लक्ष घालून त्यांच्या अंमलबजावणीचा मार्ग सुकर करावा असे आम्हाला वाटते. आदिवासी कल्याणच नव्हे तर एकूण संस्कृती संवर्धनाचे दृष्टीने हे मोलाचे आहे. शैक्षणिक उन्नयनासाठी त्याची गरज आहे.

*(सौजन्य : साप्ताहिक हरिवंश चंद्रपूर)*

---

## सातपुडा

हजारो साल से है खडा
बलवान हमारा सातपुडा
उसकी गोदमें रहते आदिवासी
वही तो सच्चे भारतवासी
रहते तडवी भिल्ल पावरा
खुशी में दिखते सांज सबेरा

लोगों ने करी उनसे नफरत
बेचारे करते पहाड में कसरत
मोर बरटी चावल खाते
राम भरोसे शानसे जीते
जब होंगी उनकी तरक्की
तब मिटेगी धक्का बुक्की !

**-- सुभाष पी. जाधव**

# बंगाली साहित्यात आदिवासींचे चित्रण

**— मूळ लेखक : दिलीप होता**

झारखंड आंदोलन सुरू झाल्यापासून मिद्नापूर, बांकुडा व पुरुलिया हे आदिवासी जिल्हे प्रस्तावित झारखंड राज्यात समाविष्ट आहेत. संथाळी विद्रोहाचे केंद्र विरभूम हा आदिवासींचा प्रदेश होता. बंगाली भाषेचा वरील पार्श्वभूमीवर विचार केला तर, भाषावैज्ञानिकांच्या मते, बंगालीमधील ४०% शब्द मुंडारी भाषेतून आले आहेत. दुसऱ्या बाजूने बंगालची आणखी एक ऐतिहासिक सांस्कृतिक विशेषता आहे. भौगोलिक विवक्षितता आणि बंगाली समाजरचनेत तौलनिकदृष्ट्या कमी विभाजन राहिल्यामुळे ब्राह्मणवाद उशीरा आला, आणि आला तरी मध्य भारतामधील प्रभावी स्वरूपासारखा नाही. असे सांगितले जाते की, सेन राजाच्या काळात कनौजवरून पाच ब्राह्मणाना आणले होते. परंतु स्थानिक लोक संस्कृती इतकी सशक्त होती की, परंपरा विसरून ब्राह्मणलोक बंगाली संस्कृतीत मिसळून गेले. त्यानंतर आलेल्या कर्मठ ब्राह्मणांनी या वंशांना 'अकुलीन' असा दर्जा दिला.

बंगालमधील तांत्रिकता, वैष्णव पंथ तथा 'बाऊल', किंवा 'सहजिया'सारख्या तात्कालीन व रहस्यवादी धार्मिक प्रवृतींचा प्रसार हा बंगालच्या पारंपारिक ब्राह्मणवाद विरोधी लोक-सांस्कृतिक धार्मिक भावनांचे केवळ प्राबल्यच दर्शवीत नाहीतर ब्राह्मणवादांचे पितळ उघडे करतो. या पार्श्वभूमीवर, बंगालमध्ये रामायण धर्मग्रंथ नाही, केवळ विलक्षण मिथक कथा या स्वरूपात ओळखला जातो, ही आश्चर्याची गोष्ट नाही. बंगाली काव्यशास्त्रातील 'कालकेत्तूर उपाख्यान'मधील नायक नायिका, शबर आदिवासी पती-पत्नी कालकेतू आणि फुलरा आहेत, ही सुद्धा आश्चर्याची बाब नाही. तरीही, महत्वपूर्ण बाब अशी आहे की, या काव्यामध्ये कालकेतू फुल्लराच्या जे प्रेम संबंधाचे वर्णन आहे, त्या वर्णनात आदिवासी संस्कृतीची सावलीसुद्धा नाही. ते दोघेही आदर्श हिंदू बंगाली दांपत्य म्हणून समोर येतात. 'कालकेतूर उपाख्यान' पासून मधुसूदन दत्तच्या 'मेघनाथ वध, काव्यापर्यंतच्या बंगाली साहित्यात आदिवासींच्या कुठल्याही जीवन अंगाचा सर्वव्यापीविषय चित्रित झाला नाही. गंमत अशी की, 'मेघनाथवध काव्य' या मधुसूदन दत्तच्या ग्रंथाची प्रेरणा ग्रिक एपिक ट्रॅजेडी ही आहे, तरीही त्यांनी राक्षसांची उदारता, नीती-परायणता, संस्कृती आणि प्रेम-प्रणयाचे चित्रण केले आहे, ज्यात विपरीत रामायण घडते, त्यात राम नव्हे तर रावण नायक आहे. हा नायक त्यांचा आदर्श आहे. या संदर्भात सत्यजित रॉय यांचे वडील व श्रेष्ठ बंगाली लेखक सुकुमार रॉय याचे 'लक्षपेर शक्तीथेल' हे विनोदी नाटक विसरता येत नाही, या नाटकात करुणरस व युद्धभूमीही आहे, ज्यात रामाचा विसंगत राज्यकारभार, हनुमान-रामाचा झगडा इ. वर्णन रामाची प्रतिमा पुसून काढतो.

ज्या शिक्षित मध्यमवर्गीय बंगाली संस्कृती व मानसिकतेतून 'मेघनाथ वध काव्य' किंवा 'लक्षपेर शक्तीथेल'ची निर्मिती झाली आहे, याच सांस्कृतिक आरशातून आदिवासी आणि त्यांची संस्कृती चित्रित होत आहेत.

बंगाली साहित्यात खऱ्या अर्थाने आदिवासी कोठेच ठळकपणे दिसत नाहीत. बंकीम चटोपाध्यायापासून ते १९६० पर्यंत एकदोन नाममात्र अपवाद सोडता, एकही कथा किंवा कादंबरी नाही, ज्यात आदिवासींचे अस्तित्व दिसेल.

'शांतीनिकेतन' जवळ काही संथाळांची गावे होतीच. योगायोग असा की रवींद्रबाबूंनी 'कृश्नांगी' तरुणींवर दोन तीन कविता लिहिल्या आहेत, त्यातही सौंदर्याच्या वर्णनाशिवाय फारसे काही नाही. तरीही रवींद्रबाबूंची एक ओळ लक्षात ठेवण्यासारखी आहे. 'वन्यरा बने सुंदर, शिशुरा मातृक्रोडे,' यात आदिवासींसाठी त्यांनी वन्य हा शब्द वापरला आहे. वन्यचा अर्थ जंगलात राहणारे असा नसून जंगली असा आहे. अद्यापी बंगलामध्ये 'जंगली' ही शिवीही आहे. मध्यमवर्गीयांमध्ये 'असभ्य' या द्वयर्थाने प्रियकराच्या प्रती तो वापरला जातो. शांतीनिकेतनचे चित्रकार अबनिंद्रनाथ ठाकूर यांचे शिष्य, व प्रसिद्ध शिल्पी रामकिंकर बेज यांच्या मूर्तीकलांमध्ये आदिवासी स्त्री पुरुषाची जीवंत रूपे सापडतात. परंतु त्यातली गती, जोश, स्फूर्ती Vigowr शरीरापर्यंतच सीमित राहते. विशेष करून त्यांच्या आदिवासी स्त्रीच्या मूर्तीत आदिम तारुण्य इतके ठासून भरलेले असते की, जणू आदिम तारुण्य हेच आदिवासी स्त्रियांचे लक्षण आहे. आदिवासी स्त्री व आदिम तारुण्य यांचे साचेबंद समीकरण आधुनिक बंगला साहित्यातील समरेशबोस, सुनिल गांगुली यांच्या कादंबरी व कथांमध्येही दिसते. समरेश बोस स्वत: मजूर होते, त्यांनी साहित्यात Sex विषयाला सुरवात केली आणि श्रीमंत बनले.

परंतु आदिम यौनता व आदिवासी स्त्री हे एकमेकांपासून वेगळे का केले जात नाहीत या प्रश्नाचे उत्तर मध्यमवर्गीय बंगाली संस्कृतीच्या उपरेपणात सापडेल.

समर सेन, समरेश बोस, व सुनिल गांगुली हे महानगरातील लेखक होत. आदिवासी समाजाबद्दल त्यांचे निरीक्षण नसल्यागत आहे.

परंतु विभूतीभूषण बंदोपाध्याय व बुद्धदेव गुहा हे आदिवासींमध्ये बराच काळ राहिले आहेत. (बन्दोपाध्यायांच्या 'पथेर पांचाली'वर सत्यजित रॉय यांनी चित्रपट बनवला.) आदिवासींच्या पार्श्वभूमीवर विभूतीभूषण यांची आरण्यक ही एकमेव कादंबरी आहे. ज्यात केवळ निसर्ग व अरण्य यांचेच वर्णन आहे, आदिवासी समाजाचे नाही.

त्यात एक आदिवासी पात्र आहे-- ज्या पात्राचे पूर्वज पूर्वी राजे होते, परंतु त्यांच्या वर्णनावरून ते पात्र बंगाली शेतकऱ्यांचे चित्रण वाटते.

बुद्धदेव गुहांच्या साहित्यात जंगलाचे रोमॅन्टिक वर्णन हा मुख्य विषय असतो.' या रोमॅंटिकतेच्या अनुकूल गरजांसाठी मग पात्रे निर्माण केली जातात. त्यातही जे इनमिन दोनचार आदिवासी पात्रे येतात, ती केवळ फॉरेस्ट रेस्ट हाऊसची चौकीदार, घरगडी की नोकर चाकरांच्या रूपात मांडली जातात. ही पात्रे विचित्र बंगाली भाषेत बोलत असतात. विशेष हे की, बंगाली साहित्यातील सर्व आदिवासी पात्रे बंगाली बाबूंना 'तुइ' म्हणून संबोधतात. परंतु बंगाली भाषेत 'तुई', 'तुम' 'आप' हे शब्दच नाहीत.

'तुई' हे संबोधन आपल्यापेक्षा लहान असलेल्यांना, किंवा खालच्या जातीच्या लोकांना वापरले जाते. आदिवासी 'बंगाली'कडून जे शब्द ऐकतात, त्याच शब्दांचा वापर ते करतात. बंगाली मानसिकतेतून बंगाली व आदिवासी यांच्या अभेद्य एकतेचे अतिरंजित दर्शन घडते.

***( स्वैर - अनुवादन - भुजंग मेश्राम )***

# आदिवासी विकास : राखीव सरकारी कुरण?

– प्रतापराव शिंदे

महाराष्ट्रातील आदिवासींची संख्या ५७.७२ लाख (१९८१) असून व्यापारी, सावकार यांच्या पिळवणुकीतून त्यांची सोडवणूक करण्यासाठी सहकारी संस्था, आदिवासी संचालनालय, विकास महामंडळ यासारख्या यंत्रणा उभ्या करण्यात आल्या. आदिवासी विकासासाठी अनेक आर्थिक कार्यक्रम सरकारने कार्यवाहीत आणले. ग्रामपातळीवर मूलभूत स्वरूपाचे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची उणीव असल्यामुळे सरकारी आर्थिक कार्यक्रम फलदायी ठरले नाहीत. त्यांच्या आर्थिक प्रश्नांना वाचा फोडणाऱ्या संघटना वा नेतेमंडळी या भागात दिसत नाहीत.

कर्जबाजारीपणा, वेठबिगारी, निरक्षरता यामुळे होणारे जमिनींचे हस्तांतर थांबले नाही. १०० वर्षांपूर्वी (१८९१) लाख एकर जमिनीची मालकी आदिवासींकडे होती. आज (१९८१) १३ लाख एकर जमिनीचे बेकायदा हस्तांतर झालेले आहे. १९७५ च्या हस्तांतरबंदी कायद्याची अंमलबजावणी करण्यात सरकारी नोकरशाहीने आजवर अडथळे आणले. भरपूर हातकमाई केली. पूर्वी सावकार, व्यापारी आदिवासींच्या जमिनीची लुबाडणूक करीत. आता महसूल अधिकारी कायद्यातील पळवाटा दाखवून जमिनीचे हस्तांतर करून आदिवासींना शेतमजूर करीत आहेत. हस्तांतरबंदी कायद्याच्या अंमलबजावणीला अधूनमधून स्थगिती देण्यासाठी गोपनीय आदेश काढण्याचे उत्तरदायित्व सरकार प्रामाणिकपणे पार पाडीत आहे ते निराळेच.

### *योजनेतील अपयश*

१९७५ पर्यंत जंगलाशी संबंधित असणाऱ्या योजनांद्वारेच आदिवासींचा आर्थिक विकास करण्यासाठी जंगल कामगार संस्था काढून त्यांना जंगलतोडीची कामे देण्यात आली. त्यानंतर बावा समितीच्या शिफारशीनुसार १२ हजार लोकसंख्येला एक याप्रमाणे प्राथमिक संस्थांची पुनर्रचना करण्यात आली. ६७५६ खेड्यातील ९८४ प्राथमिक संस्थांचे २७५ आदिवासी संस्थांतून पुनर्बांधणी होऊन आदिवासींच्या आर्थिक उन्नतीचा नवा मार्ग पत्करण्यात आला. या संस्थांचे महामंडळ काढून त्यांना केंद्र व राज्य सरकारने प्रचंड निधी उपलब्ध केले. एकाधिकार शेतीमालाची खरेदी महामंडळाकडे सोपविण्यात आली. खावटी, स्वयंरोजगार, सार्वजनिक वितरण, आश्रमशाळा यासाठी कर्ज व अनुदान उपलब्ध झाले. खरेदी खर्चातील वाटा, व्यवस्थापनावरील खर्च आणि एकाधिकार योजनेतील तोटा भरून काढण्यासाठी कोट्यावधी रुपये विविध माध्यमातून घालण्यात आले. तथापि २५८ प्राथमिक संस्था, महामंडळ अकार्यक्षम ठरून आदिवासींचा आर्थिक विकास साधता आलेला नाही.

### *पुनर्रचना आवश्यक*

प्रत्येक संस्थेत २० कर्मचाऱ्यांना पगारावर दरवर्षी ७०,८०० रुपये मंजूर असून जून १९८७ अखेर वार्षिक पगार १.३८ कोटीचा झाला. दरवर्षी एवढा पगार खर्च करून या संस्थांचा कारभार अकार्यक्षम ठरला. १९८२ सालची पहिली कर्जमाफी झाल्यानंतर दुसऱ्या

कर्जमाफीपर्यंत (१९८९) ६ कोटीच्या पीककर्ज रकमेत फारसा बदल जाणवत नाही. याचा अर्थ १९८२ ला दिलेल्या पीककर्जाची वसूली तेव्हापासून शेतीमाल खरेदीतून झालेली नाही. कागदोपत्री पीक कर्ज दिल्यामुळे आदिवासींचा कर्जव्यवहार तसा दिसण्याचे कारण नाही. तसेच खावटी कर्जव्यवहार महामंडळामार्फत न होता प्राथमिक संस्थांमार्फत होणे आवश्यक आहे. नाशीक जिल्ह्यातील आदिवासी प्राथमिक संस्थामार्फत खावटीसह पीककर्जाची वसूली शेतीमालाच्या खरेदीतून करून साऱ्या संस्था नफ्यात ठेवण्याचा प्रयोग डॉ. धनंजयराव गाडगीळांनी राज्य सहकारी बँकेमार्फत यशस्वी करून दाखविला होता. आदिवासी विकास यंत्रणेच्या पुनर्रचनेचे काम सरकारने हाती घेण्याची वेळ आलेली आहे. पूर्वीप्रमाणे गाववार प्राथमिक संस्थांची पुनर्बांधणी झाल्यास १३४७ प्रा. संस्थांमार्फत एकाधिकार योजनेखाली शेतीमालाची खरेदी करणे सोपे जाईल. पीककर्जाची वसूली करणे सुलभ होईल. तालुका ख.वि. संघांनी शेतीमालाचे संघटन करावे. प्रक्रिया केंद्रे काढून शेतीमाल कृषि उत्पन्न बाजारपेठातून विक्रीस आणावा. आश्रमशाळांना देऊन शिल्लक अन्नधान्य शहरी सार्वजनिक वितरण संस्थांमार्फत विकले जावे. या पद्धतीवर फक्त नियंत्रण व देखरेख करण्याचे काम महामंडळाने करावे. महामंडळाचा व्यवस्थापकीय खर्च व व्यापारी तोट्याखातर दरवर्षी द्यावा लागणारा ७ कोटीचा सरकारी मलिदा बंद करणे शक्य आहे.

### *अकार्यक्षम उपयोजना*

३ कोटीचा फिरता निधी महामंडळाला खावटी कर्जासाठी दिलेला आहे. शेतीमालपैकी ७५ टक्के मालाची खरेदी आदिवासी शेतकऱ्यांकडून केल्याचा रूबाब महामंडळ करीत असताना मालविक्रीतून खावटी कर्जाची वसूली झालेली नाही. खावटी कर्जाची वसूली दरवर्षी न झाल्यामुळे २.५८ कोटीच्या थकबाकीत ३ कोटीचा फिरता निधी कायमचा अडकला. कर्जमाफी झाली तरी खावटी कर्जाचे मूळ उद्दिष्ट कार्यवाहीत येत नाही. शेतीमालाच्या विक्रीतून खावटी कर्जाची रक्कम जमा झाली नाही तर महामंडळाच्या कर्मचारी पगारातून येथून पुढे ती वसूल करावी.

### *सरकारी मलिद्यावर महामंडळ*

मुख्यालय, ४१ प्रादेशिक कार्यालये, ८९ प्राथमिक केंद्रे चालविण्यासाठी ११५० कर्मचारी या महामंडळात आहेत. शेवटच्या श्रेणीतील कर्मचाऱ्यांची संख्या १०८२ असून अधिकाऱ्यांचा ताफा ६८ जणांचा आहे. त्यांच्या पगारासाठी १९८८-८९ या एकाच वर्षात २.४७ कोटी, प्रवासी भत्ते ६६ लाख, भविष्य निर्वाहनिधी ६३ लाख, वैद्यकीय ४ लाख व इतर भत्ते २६ लाख धरून ४.०७ कोटीची रक्कम कर्मचाऱ्यांचा ताफा पोसण्यासाठी खर्च झालेली आहे. मुळात १३० कचेऱ्या चालविण्यासाठी ११५० कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे का? त्यांच्यावर खर्च झालेली ४.०७ कोटीची रक्कम खऱ्या अर्थाने खर्च झालेली आहे का? की सारी बनवाबनवी आहे? पगारापोटी प्रत्यक्ष खर्च झालेली रक्कम व सरकारने अनुदानाच्या रूपाने भरपाई केलेली रक्कम यामध्ये दुरावा का निर्माण झाला? यामागील लेखापरीक्षण प्रामाणिकपणे केले तर अनेक चमत्कार बाहेर पडतील.

### *व्यापारी उलाढालीचे फसवे स्वरूप*

नाममात्र सभासदांचे २६ हजार, २४१ आदिवासी संस्थांचे २७ हजार व सरकारी ७.२५ कोटी भागभांडवलावर महामंडळ खरेदीविक्रीचा व्यवहार करते. सरकारने सहकारी कायद्यासाठी चालविलेले हे व्यापारी महामंडळ

आहे. विविध योजनांद्वारे महामंडळाने केलेले व्यवहार तुटीचे असल्यामुळे स्वनिधीचा विस्तार होण्याची शक्यता नाही. कर्मचाऱ्यांचे पगार धरून व्यवस्थापनाच्या खर्चाचे प्रमाण व्यापारी विक्रीशी शेकडा २५ टक्के आहे. विक्रीच्या ३ टक्क्यापेक्षा अधिक खर्च व्यवस्थापनावर कोणीही शहाणा व्यापारी करणार नाही. सरकारने गेल्या ४ वर्षात अनुदानाच्या रूपाने भरून काढलेला तोटा ३१.६९ कोटीचा (प्रक्रिया अनुदान ६.४५, व्यापारी तोटा १४.४५, व्यवस्थापकीय अनुदान १०.७९ कोटी) आहे १९८८-८९ च्या ताळेबंदात संचित तोटा ५.८९ कोटी आहे. म्हणजे महामंडळाने गेल्या ४ वर्षात ८०.६९ कोटी किमतीच्या शेतीमालाच्या केलेल्या विक्रीत ३७.५८ कोटीचा तोटा आहे. महामंडळाच्या ५० टक्की व्यापारी तोट्याला, आदिवासी खात्याचे मंत्री व आयएएसची झूल पांघरलेले कार्यकारी संचालक जबाबदार आहेत. महामंडळाचा वापर त्यांनी खाजगी कुरण म्हणून केलेला आहे, हा त्याचा अर्थ.

वार्षिक ९ लाखाची खंडणी वसूल करणारा सरकारी लेखा परीक्षकांचा मोठा ताफा दिमतीला असताना व्यवस्थापकीय व व्यापारी तोटा धरून दरवर्षी ७ कोटीची भरपाई सरकारला करावी लागते. याचा अर्थ आदिवासी मंत्री व बड्या सरकारी बैलांचे हे महामंडळ एक खाजगी कुरण आहे, हे सिद्ध होते.

### *एकाधिकार खरेदी योजनेचा बोजवारा*

आदिवासींची संख्या मोठ्या प्रमाणात असलेल्या तालुक्यातून आधारभूत किमतीखाली शेतीमालाची एकाधिकार खरेदी करण्याचा अधिकार महामंडळाला आहे. त्यामुळे व्यापाऱ्यांकडून शेतकऱ्यांची होणारी पिळवणूक थांबली. एकूण खरेदीपैकी ६० टक्के खरेदी अन्नधान्याची आहे. राज्यातील ३८७ सरकारी आश्रमशाळांना जीवनावश्यक मालपुरवठा करण्याची जबाबदारी आदिवासी महामंडळावर आहे. १९८८-८९ साली विक्री केलेल्या २१.३२ कोटी किमतीच्या मालापैकी आश्रमशाळातून पुरवठा केलेल्या मालाची किमत ९.७२ कोटी म्हणजे निम्म्याने होती. सार्वजनिक वितरण करणाऱ्या ९ केंद्रातून त्या वर्षी झालेली विक्री ९ लाखाची होती. या साऱ्या उलाढालीत ६४ लाखाचा नफा नमूद झालेला आहे. म्हणजे राहिलेल्या निम्म्या मालाची विक्री बाजारी चढ-उतारामुळे फारशी फायदेशीर ठरलेली नाही, असा महामंडळाने केलेला कांगावा तसा दिशाभूल करणारा आहे.

तोटा होतो म्हणून एखादे महामंडळ कायमचे बंद करण्याची शिफारस करणे तसे सोपे असते. परंतु त्यामागील कारणमीमांसा शोधून काढण्याचे काम प्रथम सरकारने हाती घ्यावे. कोणतेही महामंडळ तोट्यात का गेले? विक्रीच्या ३ टक्क्यापर्यंत व्यवस्थापकीय खर्च करण्याइतपत दक्षता संबंधित अधिकाऱ्यांनी घेतली होती का? तसा आग्रह सरकारी लेखापरीक्षकाने कधी धरला होता का? अंदाजपत्रकाची तरतूद ताळेबंदाच्या शेवटी का केली जात नाही? मालविक्रीपोटी व्यापाऱ्यांकडील येणेबाकी दाखविली जाते? व्यापाऱ्यांची उधारविक्री करण्यास परवानगी कोणी दिली? कापूस एकाधिकारामुळे कापूस उत्पादकाला बोनस भाव मिळतात. आदिवासी शेतकऱ्याला बोनस का मिळत नाही?

### *निष्कर्ष व उपाययोजना*

१. १०० वर्षापूर्वी ५० लाख एकर जमीन आदिवासींकडे होती. आज १३ लाख एकर जमीन ४.०७ लाख आदिवासी शेतकऱ्यांकडे आहे. १९७५ च्या जमीन हस्तांतर बंदी कायद्याची अंमलबजावणी सरकारने कठोरपणे

करावी. या कायद्याला तात्पुरती स्थगिती देणारे आदेश सरकारने काढू नयेत.

२. नाशिक जिल्ह्यातील आदिवासी प्राथमिक संस्थांमार्फत खावटीसह पीककर्जाची वसूली शेतीमालाच्या खरेदीतून करून संस्था नफ्यात ठेवण्याचा यशस्वी प्रयोग डॉ. धनंजयराव गाडगीळ यांनी केला होता. सध्याच्या २७५ आदिवासी संस्थांची पुनर्रचना १३४७ प्रा. संस्थांतून करून खावटी-पीककर्जाचे वितरण करावे.

३. शेतीमालाची खरेदी तालुका ख.वि. संघामार्फत करावी. प्रक्रिया केंद्रे काढून माल कृषि उत्पन्न बाजारपेठेतून विक्रीस आणावा. आश्रमशाळांची गरज भागवून शिल्लक अन्नधान्य शहरी सार्वजनिक वितरण संस्थांमार्फत विकावे.

४. आदिवासी विकास महामंडळाने शेतीमालाची प्रत्यक्ष खरेदीविक्री न करता तालुका ख.वि. संघावर देखरेख व नियंत्रण करावे. महामंडळाचा व्यवस्थापकीय खर्च व तोट्याची भरपाई करण्यासाठी सरकारला दरवर्षी ७ कोटी द्यावा लागणारा निधी प्राथमिक संस्थांच्या व्यवस्थापनासाठी खर्च करावा. १३४७ आदिवासी प्रा. संस्थांची शिखर संस्था म्हणून महामंडळाला मान्यता द्यावी.

५. स्वयंरोजगार योजना खादी ग्रामोद्योग मंडळाकडे सोपवावी. पंपसेटस् पुरवठा भूविकास बँकेच्या शाखांकडे द्यावा. गवत एकाधिकार खरेदी तालुका ख.वि. संघांनी करावी. पुण्यातील आदिवासी संशोधन संस्था कायमची बंद करावी.

६. कार्यक्षेत्रातील प्रा. संस्थांतील साऱ्या सभासदांना (६.६८ लाख) महामंडळाचे सदस्यत्व बहाल करावे. संचालक मंडळ निवडीचा अधिकार सभासदांना उपलब्ध व्हावा.

*(सौजन्य : दै. लोकसत्ता, दि. १३-११-९१)*

# दऱ्या खोऱ्यात जन्मलो

*दऱ्या खोऱ्यात मी जन्मलो*
*म्हणून मी आदिवासी झालो.*
*काय खेळ म्हणावा नियतीचा*
*क्षणोक्षणी संग्राम झडे जीवन मरणाचा*
*एका काट्यानं तोललं ईश्वरानं*
*बाजूला सारून दिलं मानवानं*
*न्याय न्याय मी आक्रंदलो*
*दऱ्या खोऱ्यात मी जन्मलो*

*विनवितो देवा मी तुला*
*दूर कर या अंधाराला*
*उजाळा दे जीवनाला*
*नित्य सुखाने जगू दे मला*
*सुखाच्या ध्यासाने व्याकुळ झालो*
*दऱ्या खोऱ्यात मी जन्मलो*
*म्हणून मी आदिवासी झालो.*

**सुभाष पी. जाधव**

# "शासकीय पड-जमिनी आणि गायराने यांवरील अतिक्रमणे नियमानुकूल करण्याविषयीचा सरकारी आदेश"

**— शरद कुलकर्णी**

***प्रास्ताविक***

गायराने, जंगल जमिनी आणि सरकारी पड-जमिनी यांवर अतिक्रमण करून ती लागवडीखाली आणण्याचे प्रयत्न नेहमीच चालतात. या अतिक्रामकांना मधून-मधून दंड केला जातो. कधी कधी त्यांना तुरुंगातही घातले जाते. तर कधी कधी अतिक्रमण क्षेत्रातील उभी पिके नष्ट केली जातात. मात्र असे असूनही अतिक्रमणाची प्रक्रिया चालूच राहते. अनेकदा बक्षिसी घेऊन सरकारी कर्मचारी अशा अतिक्रमणांकडे दुर्लक्ष करतात. अशा प्रकारची लाच हे कर्मचाऱ्यांचे वरकड उत्पन्नाचे प्रमुख साधन आहे.

मधूनमधून शासन अतिक्रमणे रीतसर करण्याविषयीचे आदेश काढते. अनेकदा असे आदेश एखाद्या जिल्ह्यापुरते मर्यादित असतात.

महाराष्ट्रातील सर्व विभागांना लागू असणारा अतिक्रमणे रीतसर करण्याविषयीचा एक आदेश शासनाने २७ डिसेंबर १९७८ रोजी जारी केला. (महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. १०७८/३४८३/ग- एक, २७ डिसेंबर १९७८.) या आदेशात अनेक त्रुटी होत्या. त्यामुळे तो बदलावा यासाठी आदिवासी विभागात मोठ्या प्रमाणावर चळवळी झाल्या. त्यानंतर सरकारने त्यात सुधारणा करून १२ सप्टेंबर १९७९ रोजी एक नवा आदेश जारी केला. (महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. १०७९/१४८९/ग-१, २७ जुलै १९७९.) या आदेशाची अंमलबजावणी व्हावी म्हणून अनेक जनसंघटनांनी व सामाजिक कृतिगटांनी प्रयत्न केले. त्याप्रमाणे पाच हजाराहून अधिक अतिक्रमणे रीतसर झाली. शासकीय अधिकाऱ्यांनी वनजमिनींवरील अतिक्रमणे रीतसर करण्याच्या मार्गात अनेक अडचणी आणल्या. त्याविरुद्ध केलेल्या याचिका अजूनही सर्वोच्च न्यायालयात अनिर्णित आहेत. (या आदेशाच्या अधिक माहितीसाठी पुढील प्रकाशन पहावे. सरकारी पडीक जमिनी, जंगल जमिनी आणि गायराने यांवरील अतिक्रमणे रीतसर करण्याविषयी नवा आदेश, लेखक - शरद कुलकर्णी, प्रकाशक -ग्रामायण, पुणे.)

***नवा आदेश***

त्यानंतर सरकारने शासकीय पड व गायरान जमिनींवर शेतीसाठी झालेली अतिक्रमणे नियमानुकूल करण्याबाबत एक नवा आदेश २८ नोव्हेंबर १९९१ रोजी जारी केला आहे. सरकारी माहितीनुसार अशा प्रकारची अतिक्रमणे ८४,२३० व्यक्तींनी केली असून अतिक्रमणाखाली एकूण क्षेत्र १,०८, ९१५ हेक्टर इतके आहे. शासनाकडे या अतिक्रमणांची पूर्ण माहिती आहे असा शासनाचा दावा आहे. मात्र अतिक्रामकांच्या यादीत नाव समाविष्ट नसलेल्या अतिक्रामकाला आपला हक्क शाबित करता यावा याविषयीच्या काही तरतुदी आदेशात आहेत. ग्रामीण भागात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना या आदेशातील तरतुदींची पूर्ण माहिती असणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने अशी माहिती देण्याचा हा प्रयत्न आहे. त्याशिवाय मूळ आदेशाची प्रत परिशिष्टात दिली आहे.

***रीतसर होऊ शकतील अशी अतिक्रमणे***

१. अतिक्रमणे शासकीय पड जमिनी आणि गायरान जमिनी यांवर शेतीसाठी झालेली असली पाहिजेत.

२. अतिक्रमणे १ एप्रिल १९७८ ते १४ एप्रिल १९९० या कालावधीत झालेली व १४ एप्रिल १९९० रोजी अस्तित्वात असली पाहिजेत.

३. अतिक्रमण करणाऱ्या व्यक्तीचे नेहमीच्या वास्तव्याचे ठिकाण जमिनीपासूनच्या८ कि.मी.च्या परिसरात असले पाहिजे.

४. अतिक्रमण करणाऱ्या व्यक्तीने अतिक्रमण केलेली जमीन १ एप्रिल १९७८ ते १४ एप्रिल १९९० या कालावधीत किमान एक वर्षतरी कसली असली पाहिजे.

***रीतसर होईल एवढे क्षेत्र***

१. अतिक्रमण करणाऱ्या व्यक्तीचे जास्तीत जास्त २ हेक्टर जिरायत जमीन एवढेच अतिक्रमण नियमानुकूल करण्यात येईल.

२. अतिक्रामकाकडे त्याची काही जिरायत जमीन असल्यास ती धरून २ हेक्टर क्षेत्र पूर्ण होईल, एवढ्याच जमिनीवरील अतिक्रमण रीतसर केले जाईल. उदा. अतिक्रामकाकडे त्याच्या नावावर एक हेक्टर जमीन असेल तर अतिक्रमित जमीन कितीही असली तरी फक्त १ हेक्टर जिरायत जमिनीवरील अतिक्रमण रीतसर केले जाईल.

***रीतसर होणार नाहीत अशी अतिक्रमणे***

१. या आदेशात वनखात्याकडील जमिनींचा समावेश नसल्यामुळे वन जमिनीवरील अतिक्रमणे या आदेशातील तरतुदींप्रमाणे रीतसर होण्यास पात्र नाहीत.

२. दिनांक १४ एप्रिल १९९० नंतर झालेली अतिक्रमणे रीतसर होण्यास पात्र नाहीत.

३. इतर राज्यातील व्यक्तींनी महाराष्ट्र राज्याच्या सीमालगतच्या भागात शेतीसाठी केलेली अतिक्रमणे रीतसर होण्यास पात्र नाहीत. सीमेलगतच्या भागातील अतिक्रमण करणाऱ्या व्यक्तीचे नाव गेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या मतदार यादीत नसल्यास ती व्यक्ती इतर राज्यातील रहिवासी आहे असे मानले जाईल. मात्र अशा व्यक्तीस योग्य तो पुरावा देऊन ती महाराष्ट्र राज्यातील रहिवासी आहे, असे सिद्ध करून अतिक्रमित जमिनीवर हक्क सांगता येईल.

४. कोणत्याही महानगर प्रदेशातील कोणत्याही जमिनीवरील अतिक्रमणे राज्य शासनाच्या पूर्व मंजूरीशिवाय नियमानुकूल केली जाणार नाहीत.

***रीतसर होण्याविषयीच्या शर्ती***

१. अतिक्रामकास महसूल संहितेच्या कलम ५० अनुसार जिल्हाधिकारी अतिक्रमित जमीनधारकास महसूल आकारू शकतात व अशी जमीन शेतीसाठी वापरली असल्यास रु. ५ ते १,००० पर्यंत दंड करू शकतात. अशा प्रकारचा दंड आकारलेला असल्यास अतिक्रामकाने तो भरला पाहिजे.

२. अतिक्रामक मागासवर्गीय असेल तर त्यास जमीन आकारणीच्या ६ पट व मागावसर्गीय नसेल तर आकारणीच्या २४ पट इतकी रक्कम भरावी लागेल. ''मागासवर्गीय'' या विषयीचे स्पष्टीकरण महाराष्ट्र जमीन महसूल (सहकारी जमिनीची विल्हेवाट) नियम, १९७१ यात दिले आहे. मागावसर्गीयात अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नवबौद्ध, विमुक्त जाती, भटक्या जाती आणि इतर मागास जाती यांचा समावेश होतो.

३. अतिक्रमण करणाऱ्या व्यक्तीला सर्वसाधारण दराप्रमाणे जमीन महसूल भरावा

लागेल आणि १९७१ च्या सरकारी जमीन वाटपाबाबतच्या नियमानुसार--

अ. सरकार वेळोवेळी ठरवील त्याप्रमाणे जमीन महसूल भरावा लागेल.

ब. जिल्हा अधिकाऱ्याच्या पूर्व परवानगीशिवाय जमीन दिली आहे त्याशिवाय दुसऱ्या कारणासाठी वापरता येणार नाही.

क. अतिक्रामकाला विहीत नमुन्यात सरकारबरोबर करार करावा लागेल. हा विहीत नमुना नियमाच्या फॉर्म नं. १५ मध्ये दिलेला आहे.

***रीतसर करण्याची प्रक्रिया***

शासकीय निर्णयाप्रमाणे अतिक्रमणे नियमानुकूल करण्याबाबतची कार्यवाही ३१ मार्च १९९२ पर्यंत पुरी करावयाची आहे. जमीन महसूल संहितेप्रमाणे अशा प्रकारची जमीन प्रदान करण्याचे अधिकार जिल्हाअधिकाऱ्यांना आहेत. कार्यवाही लवकर व्हावी म्हणून हे अधिकार आता संबंधित तालुक्यातील तहसिलदारांना देण्याची अनुमती प्रस्तुतच्या आदेशात देण्यात आली आहे. मात्र हे अधिकार या आदेशाद्वारे अतिक्रमणे नियमानुकूल करावयाच्या प्रकरणांपुरतेच मर्यादित आहेत.

४. जमीन वाटपाच्या नियमांत निवृत्त सैनिकाचे वार्षिक उत्पन्न रु. ४५००/- व इतर व्यक्तींचे वार्षिक उत्पन्न रु. ३६००/- च्या वर असल्यास त्याला जमीन प्रदान करता येणार नाही. या आदेशातील अतिक्रमणांच्या बाबतीत ही मर्यादा शिथिल करण्यात आलेली आहे.

५. जमीन प्रदान करण्याविषयी खास कार्यपद्धती नियमांच्या १७ व्या कलमात दिलेली आहे. ही कार्यपद्धतीसुद्धा या आदेशाच्या कार्यवाहीत येणाऱ्या अतिक्रमणांबाबत शिथिल करण्यात आली आहे.

६. या आदेशाचे एक वैशिष्ट्य म्हणजे अतिक्रमित जमिनीचे पट्टे विवाहित व्यक्तींच्या बाबतीत पती व पत्नी या दोहोंच्या नावाने देण्यात येतील.

***गायरान जमिनी***

ग्रामपंचायत कायद्यान्वये अनेक गायरान जमिनी ग्रामपंचायतीकडे सुपूर्त केल्या आहेत. त्याच कायद्यातील कलमानुसार शासनाला त्या ग्रामपंचायतीकडून परत घेता येतात. प्रस्तुत आदेशात गायरान जमिनीवरील अतिक्रमणे नियमानुकूल करण्यापूर्वी अशा जमिनी ग्रामपंचायतीकडून औपचारिकपणे परत घ्याव्यात अशी सूचना दिली आहे.

यापुढे शासकीय पड आणि गायरान जमिनींवर अतिक्रमण होऊ न देण्याची जबाबदारी शासनाने ग्रामपंचायतींवर टाकली आहे. आणि अशा जमिनी वनीकरणासाठी, गावठाण विस्तार, इंदिरा आवास योजना, स्मशान/दफनभूमी, शैक्षणिक संस्थांचा वापर अशा सार्वजनिक कामांच्या वापरासाठी देण्यात याव्यात.

शासनाकडे अतिक्रमण केलेल्या व्यक्तींची संपूर्ण यादी आहे, असा दावा या आदेशात करण्यात आला आहे. एकूण ८४,२३० व्यक्तींनी १ एप्रिल १९७८ ते १४ एप्रिल १९९० या काळात अतिक्रमणे केली आहेत. त्यापैकी ५३,३७९ व्यक्ती मागासवर्गीय आहेत. अतिक्रमणाखालील एकूण क्षेत्र १,०८,९१५ हेक्टर आहे. त्यामुळे या यादीत नाव असणाऱ्यांचीच अतिक्रमणे नियमानुकूल केली जातील. मात्र या यादीत नाव नसलेल्या व्यक्तीने

एखाद्या अतिक्रमित जमिनीवर हक्क सांगितल्यास त्याची उपविभागीय अधिकाऱ्यांनी रीतसर चौकशी करावी आणि अतिक्रमण नियमानुकूल करण्यास योग्य असल्यास जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवून त्यांची मान्यता मिळाल्यानंतर प्रस्तुत आदेशातील पद्धतीनुसार नियमानुकूल करावे.

अतिक्रमणे नियमांनुकूल करावयाची कार्यपद्धती शासनाने शासकीय पड, गायरान आणि वन जमिनीवरील अतिक्रमणे रीतसर करण्याविषयीच्या २७ डिसेंबर १९७८ रोजी जारी केलेल्या आदेशात स्पष्ट केली होती. तशीच कार्यपद्धती प्रस्तुत आदेशातील अतिक्रमणे नियमानुकूल करण्यासाठी अनुसरावी असे या आदेशात म्हटले आहे.

अतिक्रामित जमिनीची आणि अतिक्रामकांविषयीची माहिती शासनाकडे आहे. महसूल खाते या जमिनीचे तुकडे पाडून अंतिम मोजणी सर्व्हेनंबर देणे आणि महसूल ठरविणे ही कामे करील.

***कार्यकर्त्यांसाठी सूचना***

अतिक्रमित जमिनी नियमानुकूल कराव्यात अशी मागणी सामाजिक कार्यकर्त्यांनी अनेकदा केली आहे. आता या आदेशाची अंमलबजावणी व्यवस्थित होईल हे पाहण्याचे आव्हान त्यांना आहे.

कार्यकर्त्यांना प्रथम त्यांच्या कार्यक्षेत्रातील, गावातील अतिक्रामकांच्या याद्या मिळवाव्या लागतील. आतापर्यंतच्या शासकीय कामाच्या अनुभवांवरून या याद्यात बरेच घोटाळे असण्याची शक्यता आहे. याद्या मिळाल्यानंतर त्या तपासून पाहाव्या लागतील. अतिक्रमण अस्तित्वात आहे, परंतु यादीत नाव नाही अशा व्यक्तींच्या बाबतीत त्यांचे अर्ज तहसिलदाराकडे दाखल करावे लागतील, अशा अर्जात जमिनीचा सर्व्हे नं., खाणाखुणा, अतिक्रमणाबाबतचा तपशील व त्याविषयीचा असलेला पुरावा या सर्वांचा उल्लेख करावा लागेल आणि अर्ज मिळाल्याची पोच तहसिलदार कार्यालयाकडून घ्यावी लागेल.

आदेशाची अंमलबजावणी जास्तीत जास्त गुप्तपणे करून आपल्याला पाहिजे असलेल्या व्यक्तींच्या नावे पट्टे करून देण्याचा प्रयत्न काही कर्मचारी करतील, तर काही जमिनी नियमानुकूल करून देण्यासाठी लहान मोठ्या रकमांची मागणी करतील, या गोष्टींना वाचा फोडण्याचे आणि प्रतिबंध करण्याचे काम कार्यकर्त्यांना करावे लागेल.

काही गावात या प्रश्नावरून शांतताभंग करण्याचा प्रयत्न होण्याचा संभव आहे, याची नोंद कायकर्त्यांनी घेतली पाहिजे.

शासनाने ठरवून दिलेल्या कालावधीत म्हणजे ३१ मार्च १९९२ पर्यंत या आदेशाची अंमलबजावणी होण्याची शक्यता नाही. आदेश जारी केल्यानंतरच्या काळात निवडणुका आल्या, अनेक ठिकाणी दुष्काळामुळे कामे वाढली, त्यामुळे अंमलबजावणी ठरविलेल्या वेळेत होणे असंभवनीय आहे. मात्र कार्यकर्त्यांनी या प्रकरणी त्वरित हालचाली सुरू करणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने वरील माहितीचा उपयोग होईल. त्याशिवाय शासनाचा मूळ आदेशही परिशिष्टात दिला आहे. कार्यकर्ते या संधीचा व माहितीचा पुरेपूर उपयोग करून घेतील, अशी अपेक्षा आहे.

● ● ●

# केंद्र सरकार उदासीन आणि निरुत्साही

**– रा. वि. भुस्कुटे**

अस्पृशता नष्ट करण्यामध्ये नागरी संरक्षण कायदे जेव्हा अयशस्वी ठरले तेव्हा अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा १९८९ अंमलात आला. अत्याचार का होतात त्या मागील मुलभूत कारणांचा शोध घेऊन त्यावर उपाययोजना न करता समाजातील दुर्बल घटकांवर होणारे अत्याचार हा कायदा कसा काय रोखू शकणार आहे?

कायद्याने सामाजिक न्याय प्रस्थापित करता येईल या भ्रमात आता कोणी राहिलेले नाही. स्वातंत्र्यानंतरच्या ४२ वर्षात कायद्याने आणि न्याय संस्थेने सामाजिक न्याय प्रस्थापनेमध्ये अगदीच थोडा हातभार लावला आहे.

हा कायदा म्हणजे "अविचार" आहे अशी टीका हितसंबंधी सवर्णांकडून होताना दिसते, तर समाज-परिवर्तनासाठी झगडणारे तो क्रांतिकारक असल्याचे सांगत आहेत. परंतु आणखी काही वर्षांनी यापेक्षाही कडक कायदा करावा लागणार नाही याची शाश्वती कोणी देऊ शकेल का?

मागासलेल्या दलितांमध्ये, आदिवासींमध्ये जाणीव जागृती निर्माण होऊन ते संघटीत झाल्याशिवाय कोणतेही परिवर्तन निव्वळ अशक्य आहे.

हा कायदा अंमलात येऊन दोन वर्षे झाली आहेत. परंतु असा कायदा झाल्याची माहिती जिल्हा पोलीस अधिक्षकांपासून फौजदारापर्यंत आणि जिल्हाधिकाऱ्यांपासून तहसिलदारांपर्यंत १९९० पर्यंत नव्हती ही वस्तुस्थिती आहे. अत्याचाराचे गुन्हे नोंदण्याची जेव्हा वेळ आली तेव्हा मानव हक्क अभियान, श्रमजीवी संघटना, श्रमिक मुक्ती संघटनेला पोलीस खात्याला, न्यायालयांना, जिल्हाधिकाऱ्यांना या कायद्याची माहिती द्यावी लागली. या कायद्याच्या प्रतीही पुरवाव्या लागल्या ही सत्य स्थिती आहे. एवढेच नाही तर अत्याचाराचा गुन्हा या कायद्याखाली नोंदवून घेण्यासाठी पोलीस अधिकाऱ्यांशी संघर्षही करावा लागला आहे.

हा कायदा कडक असला तरी तो परिपूर्ण नसल्याचे आपल्याला दिसून येते. कायद्यातील दोषांमुळे तो निष्प्रभ ठरतो. परिणाम शून्य होतो. शिवाय सामाजिक आणि राजकीय स्तरांवरील काही शक्तींचा पाठिंबा लाभला तरच या कायद्याचे अपेक्षित परिणाम दिसून येतील.

या सर्व गोष्टी ध्यानात घेऊन आलेल्या अनुभवांचा अभ्यास करून खालील सूचनांचा विचार होणे आवश्यक आहे असे वाटते.

सर्वात महत्वाची गोष्ट ही आहे की, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती म्हणजेच सर्व दलित आणि सर्व आदिवासी या कायद्याच्या कक्षेत समाविष्ट केले आहेत. हे असे पूर्वी कधी केलेले नव्हते.

दुसरे म्हणजे "अत्याचार" या शब्दाची व्याख्या खूपच व्यापक केली आहे. आर्थिक बाबी, जमीन आणि संपत्ती संबंधात होणारे अत्याचारही यात सामील केलेले आहेत.

तिसरे म्हणजे या कायद्याखाली होणारे गुन्हे जरी भारतीय दंड संहितेनुसारही असले तरी

त्यासाठी या कायद्याखाली नेमलेल्या शिक्षा खूपच कडक आहेत.

या कायद्यामध्ये अद्यापही काही चुका, कमतरता आणि पळवाटा आहेत. त्यामुळे या कायद्याची परिणाम-कारकता क्षीण होण्याचा संभव आहे.

१) या कायद्याचे क्लॉज ३ (३-१-१ ते ३-१-१५) मध्ये अत्याचाराचे स्वरूप स्पष्ट करणारे मुद्दे मांडण्यात आले आहेत. अत्याचार म्हणजे काय हे निश्चित केले आहे. खूपसे मुद्दे यात आले असले तरी देखील ही यादी परिपूर्ण नाही. उदाहरणार्थ खूपशा गावातून अस्पृशांना सामाजिकदृष्ट्या बहिष्कृत केलेले असते. गावाच्या कडेला ठराविक भागातच त्यांना रहावे लागते. गावातील रस्त्यावरून त्यांना जाता येत नाही. हा प्रकार समाजाच्या अगदी नसानसात भिनला आहे. हा उघड भेदभाव या यादीत नाही. ग्रामपंचायतीच्या निर्वाचित सदस्याला खुर्चीवरही बसू दिले जात नाही. किंवा अस्पृशांना सार्वजनिक विहीरीवर पाणी भरू दिले जात नाही. वरील यादीमध्ये या बाबींचा अंतर्भाव केलेला नाही. तेव्हा अशा आणि इतर वगळलेल्या बाबींसाठी या क्लॉजच्या शेवटी असा एक क्लॉज घालणे आवश्यक आहे की वर दर्शविलेल्या मुद्दयांव्यतिरिक्त ज्यामुळे एखादा व्यक्ती अस्पृश्य आहे, दलित आहे म्हणून केवळ भेदभावानी वागविण्यात येते असे कोणतेही भेदभावाचे कृत्य हे देखील अत्याचाराचे कृत्य आहे.

२) या कायद्यातील क्लॉज ४ हे अगदी वेगळे आणि वैशिष्ठ्यपूर्ण आहे. जे सरकारी नोकरी जाणून बुजून आपले कर्तव्य पार पाडणार नाहीत त्यांना या क्लॉजप्रमाणे गुन्हेगार ठरविण्यात आले आहे. परंतु अनुसूचित जातीचे आणि अनुसूचित जमातीचे अधिकारी कर्तव्यपालन करणार नाहीत त्यांना मात्र यातून वगळण्यात आले आहे.

३) अगदी अलिकडे काही थोडक्या दाव्यांमध्ये कर्तव्यात कसूर करणारे सरकारी नोकर आढळून आले पण ते मागासवर्गीयांपैकी होते. असेही होण्याची शक्यता आहे की मागासवर्गीयांमधून आलेल्या अधिकाऱ्यांनी कर्तव्यात कसूर केली असल्याचे कागदावर दाखविण्यात येईल. तेव्हा याचा विचार करून सर्व सरकारी नोकरांना याबाबत समान लेखण्यात यावे. आणि जो जो अधिकारी तो मागासवर्गीय आहे की कसे याचा विचार न करता कर्तव्यात कसूर करेल तो प्रत्येकजण गुन्हेगार ठरवून शिक्षा भोगण्यास पात्र ठरविण्यात यावा.

४) बहुतेक सर्व अत्याचारामागील मूळकारण जमीन, संपत्ती आणि आर्थिक उत्पन्नाची साधने असतात. आर्थिक विषमताही या कायद्याप्रमाणे अत्याचार म्हणून समजण्यात आली आहे. परंतु साधारणत: असे प्रश्न न्यायालयात नेले जातात. पण वर्षानुवर्षे उलटली तरी त्यातून काही निष्पन्न होत नाही. अशा परिस्थितीमध्ये काय करावे या बद्दल या कायद्यात काही सूचित केलेले नाही. या कायद्याची अंमलबजावणी ताबडतोब व्हावी म्हणून—

अ) अशा प्रकारचे दावे कोणत्याही एकाच न्यायालयात चालविण्यात यावेत.

ब) किंवा याला पर्याय म्हणून आदिवासीच्या जमीनीच्या समस्यांमध्ये दिवाणी न्यायालयाना ज्याप्रमाणे अधिकार ठेवलेला नाही त्याच धर्तीवर मागासर्गीयांच्या जमीन समस्यांबाबत दिवाणी न्यायालयाला अधिकार देण्यात येऊ नयेत.

५) नेहमी नेहमी गुन्हा करणाऱ्या व्यक्तीला या कायद्याच्या क्लॉज ५ अन्वये कडक शासन

होणार आहे. तसेच कोणत्याही व्यक्तीकडून पुन्हा गुन्हा होण्याचा संभव असेल तर क्लॉज १०(१) प्रमाणे त्या व्यक्तीला विशिष्ट विभागात प्रवेश करण्यास मनाई करता येते परंतु अशा व्यक्तीच्या गुन्ह्यांचे रेकॉर्ड स्वतंत्र रित्या ठेवणे अत्यावश्यक आहे. तेव्हा मग असे रेकॉर्ड सर्वसामान्य जनतेला पहायला मिळेल अशी तरतूद करावी लागेल. थोडक्यात गुन्हा करणाऱ्या सराईत गुन्हेगाराचे रेकॉर्ड सर्व सामान्य जनतेला विशेषत: अत्याचाराचे बळी पडलेल्यांना माहिती पडले तर अशा गुन्हेगारांना हद्दपार करण्याची मागणी त्यांना करता येईल.

६) या कायद्याच्या जलद आणि परिणामकारक अंमलबजावणीसाठी क्लॉज १४ प्रमाणे खास न्यायालयाची आणि क्लॉज १४ प्रमाणे खास सरकारी वकीलांची तरतूद केलेली आहे.

महाराष्ट्राच्या प्रत्येक जिल्ह्यासाठी या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी जिल्ह्याचे सेशन कोर्ट हे खास न्यायालय म्हणून जाहीर केलेले आहे. तसा जाहिरनामा विधि आणि न्यायखात्याकडून काढण्यात आला आहे. (जाहिरनामा क्रमांक सि.आर.पी. ५०९०/५४/(६) अकरा दि. ३० जाने. १९९०) जिल्हा कोर्टातील सरकारी वकिलांना खास सरकारी वकील म्हणून जाहीर करण्यात आले आहे. याबाबत विधि आणि न्याय खात्यांनी जाहिरनामा क्रमांक सि.आर.पी. ५०९०/५४(६ अकरा दि. ३१ जानेवारी १९९० काढण्यात आला आहे.

गुन्हा सिद्ध करून गुन्हेगारांना शिक्षा देण्यात आलेल्या यशस्वी दाव्याचे प्रमाण आपल्या देशात खूप कमी आहे. याचे एक प्रमुख कारण म्हणजे आरोपीचा वकील त्याची बाजू जोरदारपणे मांडतो आणि हा जोमदारपणा सरकारी वकिलांमध्ये अभावानेच आढळून येतो. तेव्हा खास सरकारी वकील नेमण्यामागे या दाव्यामध्ये खास लक्ष देण्यात यावे हा आहे. या व्यवस्थेचा फायदा महाराष्ट्र राज्यात आतापर्यंत तरी काही झाला असल्याचे आढळून आलेले नाही.

सरकारी वकील नेमावयाच्या नेहमीच्या व्यवस्थेमध्ये "खास" या शब्दानी काय विशेष फरक पडतो? क्षणभर आपण असा दावा मान्य केला की, ज्या राज्यात वर्षामध्ये हजार, किंवा त्यापेक्षा जास्त अत्याचाराचे गुन्हे घडतात तेथे ही खास सरकारी वकिलांची व्यवस्था राबवणे महाकर्मकठीण आहे. तरीही.

(अ) खून, जमावाकडून झालेली हिंसक कृत्ये, स्त्रियांवरील सर्व प्रकारच्या क्रूरतेचे गुन्हे यामधून तरी खास सरकारी वकिलांची नेमणूक केली गेली पाहिजे.

(ब) ज्या अन्याय पीडीतांना त्यांचा दावा चालविण्यासाठी स्वत:चा वकील नेमावयाचा आहे. त्यांच्या बाबतीत अशा पर्यायी व्यवस्थेची तरतूद केली पाहिजे.

७) व्यक्तींनी केलेल्या गुन्ह्यांचा विचार या कायद्यात केला आहे. परंतु संस्थानी केलेल्या गुन्ह्यांबद्दल सविस्तर खुलासा या कायद्यात नाही.

कायद्याच्या निव्वळ अस्तित्वाने सामाजिक न्याय दिला जाणार नाही. कायद्याची उद्दिष्टे गाठण्यासाठी सामाजिक आणि राजकीय दृष्टीने काही उपाय योजना करण्यात आल्यावरच हा कायदा परिणामकारक ठरणार आहे. तसेच खालील काही महत्त्वाच्या बाबींमध्ये तातडीने कार्यवाही करणे आवश्यक आहे.

**एक :- शस्त्रे:** अत्याचाराचे गुन्हे करताना प्राणघातक शस्त्रे वापरली जातात. ही नित्याची बाब बनली आहे. गरज नसतानाही खेडेगावातून आणि शहरातून शस्त्रांचे परवाने देण्यात येतात.

आणि परवानाधारक शस्त्रे बाळगून असतात. ज्या महिलांना समाज घराबाहेर पडू देत नाही त्या घराबाहेर पडल्याच तर त्यांना डोक्यावर, चेहऱ्यावर पदर घ्यावा लागतो. त्यांच्या नावावरही शस्त्राचे परवाने आहेत. तेव्हा

(अ) नेहमी नेहमी गुन्हे करणाऱ्यांचे शस्त्र परवाने रद्द केले पाहिजेत. आणि तसे करायचे नसेल तर.

(ब) मागासर्गीयांना म्हणजे दलितांना, आदिवासींना शस्त्रे बाळगण्यासाठी परवाने दिले पाहिजेत.

**दोन** :- महिलांना फार भोगावे लागते. आणि त्या बहुश: क्रूरतेच्या बळी ठरतात. सूर्यास्तानंतर आणि सूर्योदयापूर्वी महिलांना पोलीस स्टेशनात नियमाप्रमाणे जरी बोलावता येत नाही. तरीही महिलांना रात्रीही पोलीस स्टेशनात सर्रास बोलावण्यात येते. आणि म्हणून

(अ) महिलेवर जेव्हा अत्याचार झालेला असेल तेव्हा अशा गुन्ह्याची चौकशी डेप्युटी सुपरिनटेंडेंट ऑफ पोलीस या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या पोलीस अधिकाऱ्यांकडे सोपविली पाहिजे.

(ब) गुन्ह्याच्या चौकशीमध्ये महिलेची तपासणी (इंटरॉगेशन) महिला पोलीस आणि महिलेच्या नातेवाईकांची हजेरी सक्तीची केली पाहिजे.

**तीन** :- प्रचार - हा कायदा अंमलात आला असला तर त्याची माहिती जन सामान्यापर्यंत पोहोचलेली नाही. तेव्हा या कायद्यातील महत्त्वपूर्ण तरतूदींबद्दलची माहिती टेलीव्हीजन, रेडिओ या प्रभावी प्रचार माध्यमाद्वारे सामान्य लोकांपर्यंत पोहोचवली पाहिजे. प्रत्येक गावात प्रत्येक भू-धारकांपर्यंत ही माहिती जावी म्हणून ग्रामपंचायत कर पावती जमीन महसूल पावतीच्या मागील बाजूला या कायद्याच्या प्रमुख तरतूदी छापण्याचाही विचार झाला पाहिजे. सरकारी खर्चाने सर्व वर्तमानपत्रातून जाहिराती देऊन या कायद्याची माहिती सर्व लोकांना देता येईल.

या कायद्याच्या क्लॉज २३ (१) नुसार या कायद्याची उद्दिष्ट्ये पार पाडण्यासाठी केंद्र सरकारने नियम करायचे आहेत. हे नियम राजपत्रांत जाहीर करायचे आहेत. तसेच क्लॉज २३ (२) नुसार असा केलेला प्रत्येक नियम लोकसभेच्या अधिवेशनात मांडून त्याला लोकसभेची मान्यता घ्यावयाची आहे. हा कायदा १९ सप्टेंबर १९८९ ला अंमलात आला त्याला आता दोन वर्षे झाली आहेत. परंतु अद्यापही या कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी केंद्र सरकारला नियम करण्याची जरूरी भासलेली नाही. हे लक्षणीय आहे.

या कायद्याप्रमाणे (अ) अत्याचाराचे गुन्हे होऊ नयेत म्हणून प्रतिबंधात्मक कारवाई करायची आहे. (ब) कायद्याच्या परिणामकारक अंमलबजावणीची सर्व प्रकारची जबाबदारी अगदी अत्याचार पीडितांच्या पुनर्वसनासह क्लॉज २१ प्रमाणे सरकारने स्वीकारली आहे. आणि या तरतूदींच्या अंमलबजावणीसाठीही आवश्यक नियम तयार करण्याची जरूरी केंद्र सरकारला भासलेली नाही. हे एक आश्चर्य आहे. तेव्हा दलित आणि आदिवासींना दिलासा देणारा अत्याचार प्रतिबंध कायदा निव्वळ कागदावर रहावा तो अंमलात येऊ नये असेच केंद्र सरकारचे धोरण आहे. या कायद्याबद्दल केंद्र सरकार निरुत्साही आणि उदासीन आहे. असेच म्हणावे लागेल.

(गुजरात राज्यातील दलितांचे झुंजार नेते श्री. मार्टिन मकवाना यांच्या लेखाचे आधारे.)

# सातपुड्यातील आदिवासींच्या आर्थिक मागासपणाची मीमांसा

– प्रा. गिरासे एस.पी.

आदिवासींना जंगलाचे राजे म्हटले जाते. आदिवासींची वस्ती ही दऱ्या-खोऱ्यात, जंगलात दिसून येते. ते जंगलाच्या कुशीत जन्म घेतात व जंगलातच त्यांचा मृत्यू होतो. जंगल हेच त्यांचे कार्यक्षेत्र, आदिवासी समाज, शहरी आणि सुधारित समाजापासून दूर रहातो.

आदिवासींचा इतिहास पाहिला तर आदिवासी समाज हा टोळया टोळयांनी रहात असे. परंतु अलिकडे या समाजात बरेच परिवर्तन झाले आहे. काही बाबतीत आदिवासी समाजाचा सुधारित समाजाशी कमी अधिक प्रमाणात संपर्क येऊ लागला आहे. त्यामुळे त्यांची सामाजिक, आर्थिक, राजकीय व शैक्षणिक प्रगती होऊ लागली आहे. आदिवासी समाजाची शहरी व सुधारित समाजाशी तुलना केली असता असे दिसून येते की आज सुद्धा आदिवासी समाज सामाजिक, राजकीय आर्थिक व शैक्षणिक दृष्ट्या बऱ्याच प्रमाणात सुधारित समाजापेक्षा मागासलेला आहे. त्यामुळेच आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष लक्ष देण्याचे भारत सरकारचे धोरण आहे. आर्थिक प्रगतीवर सामाजिक व शैक्षणिक प्रगती बऱ्याच अंशी अवलंबून असते. म्हणून भारत सरकारने आदिवासी समाजाच्या आर्थिक प्रगतीला प्रथम स्थान देवून अनेक कल्याणकारी योजना राबविण्यास सुरुवात केली आहे.

### *मूलभूत गरजाही भागत नाहीत.*

अन्न, वस्त्र व निवारा ह्या मानवाच्या तीन प्राथमिक गरजा समजल्या जातात. आदिवासी समाजाचा सूक्ष्म अभ्यास केला तर आपणास काय दिसून येते? आदिवासी समाजातील ७०% आदिवासींना प्राथमिक मूलभूत गरजा भागविणे अशक्यप्राय आहे, अनेक आदिवासी बांधवांना रहाण्यासाठी घर नाही, दोन वेळचे जेवण मिळत नाही, अंगाला पुरेसे वस्त्र मिळत नाही. यावरून त्यांच्या मागासपणाची कल्पना येते. आर्थिक मागासपणाच्या कारणाची शास्त्रीय दृष्टीने संशोधन करूनच शासनाने व समाजसुधारकांनी त्यावर उपाय योजना करणे योग्य ठरते.

### *मागासलेपणाची कारणे*

त्यांच्या आर्थिक मागासपणाच्या कारणांचा शोध घेतला असता खालील कारणे दिसून येतात.

### *आर्थिक अंदाज पत्रकाचा अभाव*

आदिवासी समाजात शिक्षणाचा प्रचार व प्रसार फार कमी प्रमाणात झालेला आहे; त्यामुळे रोजगार कुठे मिळतो, निर्वाहासाठी कोणत्यामार्गाने पैसा मिळवावा व मिळविलेल्या पैशाचा काटकसरीने कशा प्रकारे पद्धतीने विनियोग करावा याबाबत त्यांच्यात अज्ञान असते. सुधारित समाजात प्रत्येक व्यक्ती स्वत:चे आर्थिक अंदाजपत्रक तयार करते. कोणत्या मार्गाने किती पैसा विशिष्ट कालावधीत मिळेल व त्याचा विनियोग कोणत्या कारणासाठी किती प्रमाणात करावा याचे अंदाजपत्रक त्याच्या मनात तरी तयार असते. तसे अंदाजपत्रक आदिवासी समाजात दिसून येत नाही.

### *रोजगार नाहीत*

आदिवासींची वस्ती जंगलात व खडकाळ

भागात दिसून येते. अशा भागात रोजगार उपलब्ध करून देणारे कारखाने व लहान मोठे उद्योग स्थापन होत नाहीत. खाजगी उद्योगपतींना व भांडवलदारांना जंगल भागात उद्योग किंवा व्यवसाय करणे व्यावसायिकदृष्ट्या परवडणारे नसते. त्यामुळे शहरी भागातील लोकांप्रमाणे आदिवासी बांधवांना रोजगार मिळण्याची संधी मिळत नाही. रोजगाराची पुरेशी संधी प्राप्त न झाल्यामुळे, आर्थिक दृष्ट्या उत्पन्नाचे मार्ग म्हणजे शेती व शेतमजुरी व किरकोळ वनस्पती गोळा करण्याशिवाय इतर दिसून येत नाहीत.

***व्यसनाधीनता***

आर्थिक गरजा भागविणे सुद्धा त्यांना कठीण जात असतेच, परंतु निरनिराळ्या व्यसनांमुळे विविध रोग होतात. औषधोपचारासाठी मोठ्या प्रमाणावर खर्च करावा लागतो. आजारपणाच्या कालावधीत आर्थिक उत्पन्नाला त्यांना मुकावे लागते. त्यामुळे आदिवासी बांधवांच्या व्यसन मुक्तीची विशेषच गरज दिसून येते.

***दूरदृष्टीचा अभाव***

आदिवासी बांधवांचा दुसरा महत्वाचा दुर्गुण म्हणजे भावी काळाबद्दल बेपर्वाई. एखाद्या दिवशी मोठ्या प्रमाणावर आर्थिक उत्पन्न मिळाले तर ते संपेपर्यंत आदिवासी बांधव कामावर जात नाहीत. सुधारित समाजासारखी भविष्यासाठी आर्थिक तरतूद करण्याची त्यांची प्रवृत्ती दिसून येत नाही.

आदिवासी जंगलात वस्ती करून राहातात. त्यांचा मुख्य आर्थिक व्यवसाय शेती व शेतमजुरी हा होय. जंगलात चढउताराची व खडकाळ जमीन असते. त्यामुळे उत्पन्न मर्यादित येते. त्याचप्रमाणे त्यांना शेती व्यवसायाचे अद्यावत् ज्ञान नसते. यामुळे शेती व्यवसायातून गरजेपुरते सुद्धा उत्पन्न काढता येत नाही. त्यामुळे आदिवासी बांधवांना अद्यावत् शेती व्यवसायाचे ज्ञान देण्याची मोठ्या प्रमाणावर गरज आहे.

***फसवणूक व पिळवणूक***

आदिवासी समाजाची व्यापारी व सावकारी वर्गाकडून सुरुवातीपासूनच फसवणूक व पिळवणूक होत आहे. व्यापारी वर्ग आदिवासींकडून शेतीवस्तू फळे व मध इत्यादी वस्तू कमीत कमी किंमतीला खरेदी करून व आपल्याकडील माल जास्तीत जास्त किंमतीला विक्री करून दोन्ही मार्गांनी पिळवणूक करतो. विशेष म्हणजे खरेदी व विक्रीच्या व्यवहारात वजन मापात मोठ्या प्रमाणावर फसवणूक करतो. सक्तीने खरेदीचा हा प्रकार अद्यापही आदिवासी भागात दिसून येतो. याप्रमाणे व्यापारी वर्ग व सावकारी वर्गाकडून आदिवासी समाजाची आर्थिक पिळवणूक मोठ्या प्रमाणावर होताना दिसून येते.

***धड रस्ते नाहीत***

आदिवासींना पुरेसा आर्थिक रोजगारात वाव मिळत नसल्याने जंगलात वनस्पती उदा. - डिंक, मध, जळाऊ लाकूड वगैरे किरकोळ वस्तू मोठ्या प्रमाणावर गोळा करून उपजीविका करतात. इतर काही जण गाई, म्हशी, शेळ्या, मेंढ्या ह्या पाळीव जनावरांपासून दूध मिळविण्याचा व्यवसाय करतात. आदिवासी बांधवांनी किरकोळ प्रमाणावर मिळविलेल्या ह्या वनस्पती व दुधासारख्या वस्तूंना योग्य बाजारपेठ लाभत नाही. कारण आदिवासी भागात वाहतुकीसाठी रस्त्यांचा व वाहतुकीच्या साधनांचा अभाव असतो. सहकारी दुग्ध सोसायट्या किरकोळ प्रमाणात स्थापन झाल्यामुळे काही प्रमाणात हा प्रश्न सुटू लागला

आहे. परंतु नादुरूस्त रस्ते ही मोठी समस्या त्यात निर्माण झाली आहे.

आदिवासी बांधवांचा शहरी भागाशी संपर्क येत नसल्यामुळे कोणकोणत्या मार्गांनी आर्थिक यश मिळविता येते. आर्थिक जीवनमान कसे उंचवावे इत्यादी शहरी भागासाठी आर्थिक उत्पन्नाच्या बाबतीत माहिती त्यांना नाही. त्यामुळे ते आर्थिक प्रगतीच्या दृष्टीने प्रयत्न करीत नाहीत.

***मजुरीतही पिळवणूक***

आदिवासी समाजाचा शेतमजुरी हा महत्त्वाचा व्यवसाय आहे. बडे/मोठे शेतकरी अल्प मजुरीवर त्यांच्याकडून काम करून घेवून आर्थिक पिळवणूक करतात. आठ तासांपेक्षा जास्त काम करवून घेतात. शहरी मजुरासारखी मजुरी देत नाहीत. आर्थिक हक्कांच्या बाबतीत शहरी मजुराच्या तुलनेने संपूर्ण अज्ञानच दिसून येते. मात्र अलिकडे श्रमिक संघटनेमुळे व किमान वेतन कायद्यामुळे आर्थिक हक्कांची जागृती आदिवासी शेतमजुरात होऊ लागली आहे.

***शिक्षण प्रसार***

शिक्षणाचाही प्रचार व प्रसार विशेष झालेला दिसून येत नाही. त्यामुळे शिक्षणाची आवड निर्माण झालेली नाही. शैक्षणिक प्रगती मर्यादित असल्यामुळे आदिवासी बांधवांचे अज्ञान दूर होत नाही. त्यामुळे व्यापारी वर्ग व सावकार वर्गाकडून त्यांची आर्थिक पिळवणूक मोठ्या प्रमाणावर होते. शैक्षणिक दृष्ट्या मागासलेले आदिवासी असल्यामुळे आदिवासी बांधवांना रोजगार प्राप्त करण्यास व स्वतंत्र आर्थिक व्यवसाय करण्यात अडचणी येतात.

***अल्प संतुष्ट वृत्ती - मागासलेपणाचे कारण?***

मर्यादित गरजा हे वरवर पाहता आर्थिक मागासलेपणाचे कारण दिसून येत नाही. परंतु खऱ्या अर्थाने आर्थिक मागासपणचे तेच मूळ कारण होय. आर्थिक गरजा मर्यादित असल्यामुळे गरजे पुरतेच उत्पन्न मिळवावे व संतुष्ट राहावे अशी प्रवृत्ती वाढते. त्यामुळे उत्पन्नात वाढ करून जीवनमान वाढविण्याची प्रवृत्तीच खुंटते. ज्याप्रमाणे अनावश्यक गरजा आर्थिक समस्या निर्माण करतात त्याचप्रमाणे मर्यादित गरजा आर्थिक मागासलेपणा निर्माण करतात. आदिवासी बांधवाचा आर्थिक मागासपणा दूर करण्यासाठी सरकारी पातळीवर आदिवासी उपाययोजनासारख्या कल्याणकारी योजनेची अमलबजावणी होत आहे. मात्र ही योजना यशस्वीरीत्या राबवली गेली पाहिजे; त्याचप्रमाणे आदिवासी समाजात परिवर्तन व जागृती निर्माण करण्यासाठी निष्ठावंत समाजसेवक व आदिवासी बांधवातून नेतृत्व जागृत होणे आवश्यक आहे. आदिवासी भाग व शहरी भाग यांचा वेळोवेळी संपर्क प्रस्थापित होण्यासाठी दळणवळणाच्या सुविधा व बारमाही पक्क्या रस्त्यांची सोय झाली पाहिजे.

खाजगी उद्योगपतींनी आदिवासी भागात जंगल संपत्तीवर आधारित मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण करणारे उद्योग निर्माण केले पाहिजेत. सर्वात महत्वाचे म्हणजे आदिवासी बांधवांच्या गरजा वाढल्या पाहिजेत व जीवनाकडेच पहाण्याचा दृष्टीकोन बदलला पाहिजे. आर्थिक उत्पन्नात भर टाकून वाढत्या गरजा पूर्ण करण्यासाठी धडपडणारा आदिवासी निर्माण झाला पाहिजे.

●●●

# शासकीय योजना राबविण्यात आदिवासींच्या 'अंधश्रध्दा' अडसर

– प्रा. गिरासे एस.पी.

सातपुड्याच्या अतिदुर्गम भागात पावरा, वळवी, दळवी, भिल्ल या जमातीचे लोक राहतात. या जमातीचे लोक सातपुड्याच्या कुशीतच जन्म घेतात. आणि त्यांचा मृत्यू सातपुड्याच्या कुशीतच होतो. त्यांचे कार्यक्षेत्र देखील सातपुडाच आहे. या जमातीचा शहरी-भागाशी विशेष संपर्क नसल्यामुळे शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प आहे. हा समाज रूढी परंपरा प्रिय आहे. त्यामुळे या जमातीत अनेक अंधश्रद्धा जिवंत आहेत.

शासन विविध योजना सातपुड्यातील या जमातीपर्यंत पोहचविण्याच्या प्रयत्न करीत आहे. परंतु त्यांच्या जमातीत असलेल्या अनिष्ट अंधश्रद्धा या योजना राबविण्यात अडसर ठरत आहेत.

मी सातपुड्याच्या परिसरात नोकरी निमित्त २० वर्षांपासून आहे. सातपुड्यातील अतिदुर्गम भागातील आदिवासींच्या अंधश्रद्धा अभ्यासण्याचा प्रयत्न केला. या प्रयत्नातून, प्राप्त झालेल्या माहितीतून निवडक अंधश्रद्धा आपणापुढे मांडताना आनंद होत आहे.

सातपुडा परिसरातील दुर्गम भागात शासकीय स्तरावर अनेक आरोग्य विषयक सुविधा उपलब्ध करण्याचा प्रयत्न होत आहे, परंतु शारीरिक आजार औषधानी बरा होत नाही, तर धागे-दोरे, तावीज आणि भगताच्या मंत्र-तंत्रानेच बरा होतो. अशी अंधश्रद्धा या भागातील आदिवासी समाजात रूढ झालेली आहे. त्यामुळे शासकीय दवाखान्यात औषधोपचार घेण्यापेक्षा भगत वर्गाकडूनच उपचार घेण्याचा प्रघात आदिवासी समाजात मोठ्या प्रमाणावर दिसून येतो. त्यामुळे भगत वर्गाचे प्रस्थ या भागात विशेष दिसून येते. सातपुड्यातील दुर्गम भागातील "बामणी"चे प्रकरण याच कारणाने उद्‌भवले असे संशोधना अंती दिसून आले आहे.

एखाद्या व्यक्तीचा आकस्मिक मृत्यू झाला म्हणजे त्याव्यक्तीचा मृत्यू भगताकरवी, शत्रूने मूठ मारली, अशी समजूत दिसून येते. वास्तविक त्या व्यक्तीचा आकस्मिक मृत्यू हार्ट अटॅकने झालेला असतो. तसेच डाकीन हा प्रकार आदिवासी भागात विशेष समजला जातो. स्त्री-पुरुषाचे काळीज डाकीन रूपी राक्षसीण तंत्र-मंत्राने खाते. आकस्मिक मृत्यू हा डाकीन प्रकारातून होतो अशी अंधश्रद्धा आहे. डाकीनीच्या संशयावरून अनेक आदिवासी स्त्रीचा ठेचून खून केल्याच्या बातम्या अधूनमधून वर्तमानपत्रात वाचावयास मिळतात.

घरात लहान बाळ सतत रडत असेल तर घरात मृत्यू पावलेल्या स्त्रीने त्या बाळाला पछाडले आहे असा समज आहे. औषधोपचार न करताच सतत रडत असलेल्या बाळाला त्याचा कपडा त्याच्या अंगावरून मृत्यू पावलेल्या बाईच्या नावाने उतरवतात.

मृत्यू पावलेल्या व्यक्तीच्या प्रेतयात्रेवर येणाऱ्या स्त्री-पुरुषांना दारू पाजल्यामुळे मृत आत्म्याला शांतता प्राप्त होते. अशी भोळीभाबडी समजूत या समाजात दिसून येते. त्यामुळे दारूसारख्या अनिष्ट व्यसनाला समाज बळी पडतो.

मृत्यू पावलेली व्यक्ती, मृत्यूनंतर त्याच्या सोबत पुरलेल्या वस्तूंचा उपभोग घेते. असा समज आहे. त्यामुळे मृत्यू पावलेल्या व्यक्तीचा अंत्यविधी करताना, म्हणजेच त्याचे शव जमिनीत पुरताना त्याच्या आवडीचे दागिने, कपडे आणि इतर वस्तू त्याच्यासोबत पुरतात, किंवा जाळतात.

दुर्गम भागात कोणत्याही सणा-सुदीला देवाला आणि आपल्या पूर्वजांना दारूचा नैवेद्य देतात. देवाला आणि आपल्या पूर्वजांना दारूचा नैवद्य दिल्याशिवाय तो नैवेद्य त्यांना पोहचत नाही. अशी भाबडी समजूत दिसून येते. दारूचे व्यसन त्यांच्यात सर्वत्र दिसून येते. त्याचेदेखील हेच महत्वाचे कारण असावे. असेच मला वाटते.

गुजराथ आणि महाराष्ट्राच्या सीमेवरील देव मोगरादेवीच्या मंदिराजवळ काकड नांवाचे झाड आहे. त्या झाडाला ज्यावर्षी ज्यादिशेला फळे आलीत त्यावर्षी त्या दिशेला सुखसमृद्धी प्राप्त होते. आणि उलट ज्यादिशेला फळे आली नाहीत त्या दिशेला अपशकून समजला जातो. या गैरसमजुतीमुळे त्यांच्या कार्यप्रेरणेवर विपरीत परिणाम होतो.

इतिहास पुरुष "अश्वस्थामा" हा जिवंत असून अश्वस्थामाच्या यात्रेला रात्रीच्यावेळी येणाऱ्या जाणाऱ्या यात्रेकरूंना सातपुड्याच्या जंगलात आदिवासी गुराखी किंवा आदिवासी शेतमजूर किंवा आदिवासी शेतकऱ्यांच्या वेशात वाटाड्याची भूमिका बजावतो. तसेच डोक्यावर झालेल्या जखमेसाठी गावोगावी अश्वस्थामा तेल-तूपाची मांगणी करत फिरत असतो. असा समज अद्यापही अनेक वर्षापासून दिसून येतो.

प्रत्येक आदिवासी खेड्यात गाव-दिवाळी साजरी केली जाते. दिवाळीच्या दिवशी गावाच्या शांततेसाठी ग्रामदेवतेला बोकड आणि कोंबडीचा बळी दिला जातो. बोकड आणि कोंबडीचा बळी दिल्याशिवाय गावात शांतता नांदत नाही. अशी अंधश्रद्धा आहे.

अती दुर्गम भागात शेतजमीनीत पेरणीची सुरुवात करण्यासाठी शनिवार हा वार अशुभ समजला जातो. मला वाटते सुधारित समाजात जसा "शनिवार" हा न कर्त्याचा वार समजतात. त्याचप्रमाणे आदिवासी शेतकऱ्यांना पेरणीची सुरुवात करण्यासाठी 'शनिवार' हा अशुभ दिवस वाटतो. आदिवासी समाजातील स्त्री आणि पुरुषांनी काळे रंगाचे कपडे परिधान करणे अशुभ समजले जाते. कपडे परिधान करण्यासंदर्भातील ही अंधश्रद्धा सुधारित समाजासारखी दिसून येते.

शेतजमीनीत समाधानकारक अन्नधान्य पिकले नाही तर अन्नधान्य मळणीच्या प्रसंगी भगताच्या साक्षीने पाच कोंबड्यांचा बळी देतात. आणि पुढील हंगामात मुबलक अन्नधान्य पिकण्यासाठी ईश्वराची आराधना भगता करवी करतात. कोंबड्याचा बळी दिल्यामुळे पुढील हंगामात मुबलकअन्नधान्य पिकते. अशी गैरश्रद्धा या समाजात अस्तित्वात आहे.

"होळी" हा आदिवासींचा सर्वात आवडता सण आहे. होळीला जाळल्यानंतर ज्या दिशेला होळी पडते त्या दिशेला सुखसमृद्धी नांदते आणि होळी ज्या दिशेला पडत नाही त्या दिशेला दुष्काळी परिस्थिती निर्माण होईल अशी समजूत आहे.

सागाच्या झाडाची नवीन पाने वाघ देवीला अर्पण केल्याशिवाय घरात सागाची पाने आणणे अशुभ समजतात. वाघदेवीला सागाची नवीन पाने अर्पण न करताच घरात आणली तर घरात वाघ येतो, अशी गैरसमजूत या समाजात आहे. वाघ आणि सागाची पाने यांचा तर्कशुद्ध

संबंध शोधणे हा स्वतंत्र संशोधनाचा विषय ठरेल.

विवाहित युवती पहिल्यांदा सासरी जाताना, रस्त्यावर नदी किंवा नाला ओलांडताना संबंधित युवतीच्या पायाला पाण्याचा स्पर्श अशुभ समजला जातो. त्यामुळे नदी किंवा नाला (पार करताना) युवतीला अलगद उचलून नेतात.

दुर्गम भागात जेवण करताना दोन व्यक्ती समोरासमोर न बसता परस्पर विरोधी दिशेने जेवण करताना बसतात. समोरासमोर जेवण घेताना एकमेकांच्या नजरेने अन्नाला नजर लागते. त्यामुळे अन्नात विषबाधा होते, अशी समजूत असल्यामुळे घरात जेवणाच्या प्रसंगी हसत खेळत वातावरण दिसून येत नाही.

प्रवासात निघताना रिकामी घागर किंवा मातीचे मडके दिसले म्हणजे प्रवासात उद्देश सफल होणार नाही. असा समज आहे. तसेच जर भरलेली घागर किंवा मातीचे मडके दिसले तर प्रवासाचा उद्देश सफल होईल. अशी समजूत आहे.

कुटुंब नियोजन या कल्याणकारी योजनेला आदिवासी समाजाचा योग्य पाठिंबा मिळत नाही. याचे महत्वाचे कारण म्हणजे पुरुषाचे कुटुंब नियोजनाचे ऑपरेशन केल्याने पुरुषाचे पुरुषत्व कमी होते, आणि संसारिक शारीरिक सुख योग्य मिळत नाही, अशी अंधश्रद्धा मोठ्या प्रमाणावर दिसून येते. तसेच कुटुंब नियोजनाचे ऑपरेशन केलेल्या व्यक्तीला डाकीण मंत्र मारते. आणि त्यातून संबंधित व्यक्तीला कायम स्वरूपाचा आजार लागतो अशी समजूत असल्यामुळे कुटुंब- नियोजनासारखी हितकारक योजना यशस्वीपणे राबविण्यात मोठा अडसर निर्माण होतो.

रात्रीच्यावेळी मृत व्यक्तीचा आत्मा भूताच्या रूपात फिरतो. त्या मृत आत्म्याच्या मर्जीतील व्यक्तीला रात्रीच्या वेळी रात्रभर फिरवितो. आणि काटेरी झुडपात झोपवतो. तरी देखील काट्याचा त्रास संबंधित व्यक्तीला जाणवत नाही. तसेच लहानशा वाटीत जेवण देतो. लहानशा वाटीतील आहार, जेवण पोटभर केल्यानंतर देखील संपत नाही, अशी भूतांच्या संदर्भात गैरसमजूत आहे.

गावात रोगराईचा प्रवेश होवू नये म्हणून साधारणपणे पावसाळ्यात गावाच्या सीमेवर मातीच्या बाहुल्यांची भगताकरवी विधी पूर्वक पूजा करतात. जर रोगराईची सुरुवात गावात झाली तर सर्व गावकरी गावात साफसफाई करतात. साफ सफाईसाठी वापरलेले साहित्य उदा. खराटा आणि टोपली गावाच्या सीमेवर आणतात. "खेडकोचरा" या देवाच्या नावाने ती उचलतात आणि दुसऱ्या गावाच्या सीमेवर ठेवून देतात, त्यामुळे आपल्या गावातील रोगराई दुसऱ्या गावात पाठविली जाते. अशी समजूत मोठ्या प्रमाणावर दिसून येते.

समाजातील अंधश्रद्धा समाज विकासात अडसर ठरतात. हे सर्वमान्य झालेले आहे. कोणताही आजार डाकीण प्रकाराने होतो. किंवा पूर्वजांच्या अवकृपेने किंवा देवाच्या अवकृपेमुळे होतो. अशा मोठ्या प्रमाणावर गैरसमजुती या समाजात असल्यामुळे हा समाज दैववादी झालेला आहे. याच कारणाने शासकीय आरोग्य विषयक योजना आणि सुविधा उपलब्ध असून देखील दुर्गम भागात त्यांचा लाभ या समाजाकडून घेतला जात नाही, त्यामुळे आरोग्यविषयक सुविधा दुर्गम भागात उपलब्ध करून देण्यापेक्षा आरोग्यविषयक शिक्षण उपलब्ध करून देणे आणि गैरसमजुती कमी करणे ही काळाची गरज आहे. अंधश्रद्धा निर्मूलन समित्या शहरीभागात अंधश्रद्धा निर्मूलन मोठ्या प्रमाणावर करताना दिसून येतात. शिक्षणाच्या प्रसारामुळे सुधारित

समाजात अंधश्रद्धेच्या प्रकार बराच कमी होवू लागला आहे. आदिवासी भागात शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार फारच कमी असल्यामुळे दुर्गम भागात मोठ्या प्रमाणावर अंधश्रद्धा दिसून येतात. त्या दूर करण्यासाठी अंधश्रद्धा निर्मूलन समित्यांनी प्रयत्न केला तर त्यांना अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कार्याला या भागात मोठी संधी आहे. अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्यांना मी नम्रपणे विनंती करतो की, आरोग्य विषयक शासकीय योजना आणि कुटुंब नियोजनासारखी कल्याणकारी योजना राबविण्यात येणारा अंधश्रद्धा रूपी येणारा अडसर दूर करण्यासाठी आणि आदिवासींचा दैववादी दृष्टीकोन घालविण्यासाठी पुढाकार घ्यावा आणि आदिवासींना शास्त्रीय दृष्टीकोन देवून त्यांच्या विकासाला गती देण्याची संधी प्राप्त करून द्यावी. अंधश्रद्धा निर्मूलनाची खरी गरज अतिदुर्गम भागातील आदिवासी समाजाला आहे. अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कार्यक्षेत्राची व्याप्ती वाढविणे ही अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्यांच्या दृष्टीने काळाची गरज आहे असे या प्रसंगी आवर्जून त्यांना सांगावेसे वाटते.

● ● ●

## "वणवा एकलव्याची"

सत्ता संस्कृती संघर्षाच्या वणव्यात
जळून खाक होत असलेल्या संस्कृतीचे
रक्षण, जतन आणि पुनस्थापन करण्यासाठी
तुझे अंत:करण तळमळत होते.
गोंड, भिल्ल, आदियांच्या धर्म संस्कृती रक्षणाची धूरा
समर्थपणे पेलण्यासाठी
धनुरविद्या प्राप्तीची पिपासा तुला लागली होती
तू स्वीकारलेला विद्याव्यासंग अलौकिक होता.
म्हणूनच डोंगर दऱ्याची वाट चालून
हस्तीनागपूरच्या धनुरविद्यापिठात दाखल झालास
पण–
पण इथेही संस्कृती संघर्षाचा वणवा
तुला भाजून काढण्यास सज्ज होता
वर्णजाती व्यवस्थेच्या मानवताहीन संस्कृतीने
तुला विद्यादान नाकारले होते.
परंतु तुझी आत्मनिष्ठा ढळली नाही.
तुझे आत्मतेज विझले नाही
आपल्या आत्मबलाच्या निश्चयाने
हस्तीनागपूर बाहेरील वनात
स्वबळाने विद्येची कठोर साधना करून
धनुरविद्या प्राशन करून टाकलीस
तुझ्या शरसंधानाने
साऱ्या आर्यवताचे डोळे दीपवून टाकले.
पण–
पण मीत्रा छलकपटाचा वणवा
तुझा पाठलाग करीतच होता.
भुंकत येणाऱ्या कुत्र्याचे इजान होता बंद झालेले तोंड
आर्यपुत्रांना पाहवत नव्हते.
अनार्य आदिम वनवीरांचे रणकौशल्य
आर्यनितीला सलत होते.
म्हणूनच विद्यादान न केलेल्या गुरुने
गुरुदक्षिणेच्या गोंडस नावाचा
कपटफास टाकून घात केला.
तुझ्या आंगठारुपी विद्येचा प्राणच कापून घेतला
तरीही तू कापलेल्या आंगठ्याने
आपल्या धर्म संस्कृती रक्षणास्तव लढत राहिलास
जीवनाच्या अंत:पर्यंत
हे अनार्य आदिम वनवीरा, भील्लवीरा एकलव्या
तुला माझे कोटी कोटी प्रणाम!

**— गोविंदा आनंदराव कन्नाके**

# आदिवासी एकता परिषद का व कशासाठी

**— विरसिंग पाडवी**

आदिवासी समाजाकडे नजर टाकली तर तो देशभर डोंगर, दऱ्याखोऱ्यात, वेगवेगळ्या विभागात, जंगलाच्या सान्निध्यात आपले पारंपरिक जीवन जगत असल्याचे दिसते. आर्थिक, शैक्षणिक क्षेत्रात इतर समाजाच्या तुलनेत मागासलेला आहे. सामाजिक दृष्टीनेही इतर समाजाच्या तुलनेततो त्याला दुय्यम स्थान दिले जाते. अर्थात याची मुळे इथल्या समाजव्यवस्थेत रुजलेली आहेत. आदिवासी समाज सामूहिक जीवन पद्धतीने जगणारा असल्याने, त्याच्या सामाजिक जीवन पद्धतीत निर्णय प्रक्रिया सामूहिक असून, मानवी मूल्ये जपून समानतेकडे वाटचाल करणारी अशी त्याची संस्कृती आहे. परंतु त्याचा आर्थिक विकास आणि शैक्षणिक प्रगती नसल्याने इतर समाजाच्या तुलनेत त्याचा राहणीमानाचा दर्जा उच्चप्रतीचा नाही. त्यामुळे त्याच्या सामाजिक जीवनातील आणि संस्कृतीतील चांगल्या मानवीमूल्यांकडे डोळसबुद्धीने कधी बघितले नाही. साहित्यात जे काही लिखाण आदिवासी समाजाबद्दल झाले तेही खुनी, दरोडेखोर, लुटारू, दारूडे, जंगलात राहणारे जंगली अशा प्रकारचे चित्र उभे केल्याने इतर समाजाचा आदिवासी समाजाकडे बघण्याचा दृष्टीकोन तिरस्कारणीय, अनादरयुक्त असा आहे. सवर्णांची जीवनाची काही अंगे सदोष आहेत, त्यांचे शुद्धीकरण झाले पाहिजे ह्याची काळजी कधी घेतलीच नाही. कारण जातीव्यवस्थेने दिलेला श्रेष्ठतेचा अहंकार न वळवण्यास कारणीभूत ठरला. देवाने दिलेली देणगी असल्यामुळे आम्ही श्रेष्ठ एवढेच सांगून मोकळे झाले. वर्षानुवर्षे धार्मिक आणि जातीव्यवस्थेच्या सिद्धांताच्या चौकटीत चकरा मारीत राहिले, एका सामाजिक सिद्धांताचे स्वरूप कधी झाले नाही. इतिहासाचार्य वि.का. राजवाडे म्हणत आमचे वंशज आर्य हे खरे जंगली होते. मग जंगलात राहणाऱ्या आदिवासींकडून जीवनोपयोगी काहीच नाही का? इतका आदिवासी समाजाबद्दल दुजाभाव का? असा प्रश्न उपस्थित होतो. इतिहासानेही ब्रिटीशांविरुद्ध लढणाऱ्या आदिवासी क्रांतिवीरांना कुठेच स्थान दिले नाही. इतिहासाचा शोध घेतला तर काय दिसते? ब्रिटिशांविरुद्ध पहिला उठाव करणारे आदिवासी होते ही वस्तुस्थिती आहे. खाज्या नाईक, उमाजी, तंट्या भिल, बिरसा मुंडा असे कितीतरी आदिवासी क्रांतीवीर ब्रिटिशांविरुद्ध लढले परंतु इथल्या इतिहासकारांनी त्यांची कुठेच दखल घेतली नाही. अगदी अलीकडील काळात गुजरांच्या अन्याय-अत्याचाराविरुद्ध उठाव करणाऱ्या शहाद्यातील अंबरसिंग महाराजावरही चोरीच्या आणि दरोडेखोरीच्या खोट्या केसेस करून त्याला बदनाम करण्याचा अनेक तऱ्हेने प्रयत्न केला गेला.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर ४५ वर्षांचा प्रत्यक्ष अनुभवही सुखद नाही. दरवर्षी आदिवासींच्या नावावर अनेक प्रकारच्या योजना आखून प्रचंड प्रमाणावर पैसा खर्च करण्यात येतो. परंतु आदिवासींच्या शैक्षणिक प्रगतीत आणि आर्थिक विकासात फारसा बदल दिसत नाही. चंद्रपूर, बस्तर आणि धुळे जिल्ह्यातील नर्मदाकाठावरील आदिवासींकडे नजर फेकली तर तेथे पक्के रस्ते

नाहीत. अशा ठिकाणी आदिवासींच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणारी कुठलीही यंत्रणा जाऊ शकत नाही. रस्ते नसल्यामुळे दळणवळणाच्या साधना अभावी कोणत्याही योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी होत नाही. आदिवासींच्या विकासासाठी आखण्यात आलेल्या योजनांची अंमलबजावणी करणारे प्रशासकीय अधिकारी अशा ठिकाणी जाण्यास नेहमी उदासीन असतात.

वरील परिस्थिती आदिवासींच्या वाट्याला का आली? ही परिस्थिती बदलेल कशी? आणि बदलेल तरी केव्हा? असा प्रश्न आदिवासी समाजाला पडल्यावाचून राहात नाही. याचा शोध घेतला तर काय दिसते? आर्य भारतात आल्यानंतर अगोदरच या भूमीवर वास्तव्य प्रस्थापित करण्यासाठी वेगवेगळ्या पद्धतीने छळायला सुरुवात केली. आपले जीवन उध्वस्त करणाऱ्या आर्यांना ह्या जमातींनी प्रतिकार करण्यास सुरुवात केली. या परस्पर विरोधी प्रतिकारातून आर्य-अनार्य असा संघर्ष होऊन, आर्यांनी आदिवासी जमातींच्या कत्तली करण्यास सुरुवात केली. पराभूत आदिवासी जमाती डोंगर, दऱ्याखोऱ्यात पळाले ते पुन्हा बाहेर आलेच नाहीत. कारण आर्यांनी अशा प्रकारे वर्चस्व प्रस्थापित केल्यानंतर त्यांच्या समाजरचनेत वर्गावर आधारित चार्तुवर्णाची निर्मिती झाली. चार्तुवर्णातूनच जातीव्यवस्थेचा जन्म झाला. या जातीव्यवस्थेनुसार श्रेष्ठांची-ब्राह्मणांची पूजा हिंदू समाजातील इतरांनी करावी, केवळ हा उच्च पुरुष-ब्राह्मण व त्याचा वर्गच उत्तम जीवन जगण्यासाठी व इतरांवर शासन चालवण्यासाठी जन्माला आला असून त्याचे अन्य काही कर्तव्य नाही, त्यांना स्वत:साठी जगण्याचा अधिकार नाही व स्वत:चा व्यक्तिमत्वाचा विकास करण्याचा हक्कही नाही. अशा प्रकारचे तत्त्वज्ञान या जाती व्यवस्थेत ठेवल्यामुळे आदिवासी समाज त्याच्या अस्तित्वापासून अधिकाधिक दूर फेकला गेला.

कायद्याने जातीव्यवस्था नष्ट करण्यात आली आहे. घटनेने सर्वांना समानाधिकार दिले असून स्वत:च्या व्यक्तिमत्वाचा विकास करण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे. परंतु प्रत्यक्ष अनुभवावरून काय दिसते? कायद्याने प्रदान केलेले हक्क आणि संधी - जसेच्या तसे सुरक्षित राहण्यासाठी कार्यक्षम अशी सामाजिक सद्सद्‌विवेक बुद्धी असेल, समाज जीवन पद्धतीत परस्परांबद्दल आदर आणि समानतेची भावना असेल तरच कायद्याने प्रदान केलेले हक्क आणि संधी लोकांना मिळू शकतात. दुर्दैवाने स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सुद्धा भारतीय समाज जीवनामध्ये वरील गुणांचा अभाव दिसून येतो. स्वातंत्र्य प्राप्तीनंतरसुद्धा जातीव्यवस्थेने निर्माण केलेल्या सामाजिक विषमतेचे शुद्धीकरण झाले नाही. एक वेळ आर्थिक विकासातील अंतराचा समेट घडवून आणणे तितके कठीण नाही, परंतु जातीव्यवस्थेने प्रदान केलेली श्रेष्ठतेची मानसिक विकृती नष्ट करणे अशक्य नसले तरी महाकठीण आहे.

वरील परिस्थितीतून आलेला अनुभव आणि अनेक वर्षापासून व्यक्तिगत पातळीवर मनात खदखदत असलेल्या विद्रोहाला, महाराष्ट्र व्यापी आदिवासींची बैठक, आदिवासी विकास भवन नासिक येथे होऊन सामूहिक रूप देण्यात आले. त्यातूनच आदिवासी एकता परिषदेची निर्मिती आणि स्थापना झाली. धुळे, नासिक, चंद्रपूर, ठाणे अशा निरनिराळ्या विभागातून प्रतिनिधी उपस्थित होते. हरीचंद्र चव्हाण, काळूराम धोदडे, वाहरू सोनवणे, सी.सी. राठवा, ए.टी. पवार, मा. आमदार हरीभाऊ महाले, खा. कहांडळे, प्रताप पवार, माधव बंडू

मोरे, पाढरे, डॉ. डग्ला, कुंवर, आदिवासी कवि भुजंग मेश्राम, आमदार नेताजी राजगडकर, समाज कल्याण मंत्री ना. मधुकर पिचड इ. नी आपापले विचार मांडले. बैठक उत्साहात पार पडली. आर्थिक, शैक्षणिक प्रश्नापुरती मर्यादित चळवळ न राहता आदिवासींचा स्वाभिमान आणि संस्कृती जपून आत्मसन्मानाची चळवळ उभारण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

बैठकीत खालील ठराव एक मताने करण्यात आले.

१) परिषद प्राधान्याने आदिवासींच्या आत्मसन्मानात्मक लढे उभारण्यासाठी कटीबद्ध होत आहे.

२) आदिवासी समाजाला प्रबळ राजकीय शक्ती म्हणून उभे करण्यासाठी प्रयत्न करणे.

३) आदिवासींचे राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक हक्कांसाठी कार्य करणे व आवश्यक वाटल्यास संघर्षात्मक लढे उभारणे.

४) प्राथमिक ते महाविद्यालयीन क्रमिक पाठ्यपुस्तकात आदिवासींच्या खऱ्या इतिहासाचा तसेच आदिवासी लेखक, कवि, यांच्या साहित्य कृतींचा समावेश करणे.

५) शासनाची विविध महामंडळे (उदा :- नियोजन मंडळ, महिला आर्थिक विकास मंडळ, साहित्य अणि संस्कृती मंडळ) यांचेवर आदिवासींचे प्रतिनिधी शासनाने घ्यावेत.


६) शिक्षण, जमीन व रोजगार हा आदिवासींचा हक्क म्हणून त्यांची कठोर अंमलबजावणी करावी.

७) आदिवासी विकास कार्यक्रमासाठी वार्षिक, आर्थिक योजनेत लोक- संख्येच्या प्रमाणात म्हणजे ९% निधीऐवजी आदिवासी जेवढ्या भू- भागावर राहतो तेवढी म्हणून १६% रक्कम देण्यात यावी.

८) नकली आदिवासी मोठ्या प्रमाणावर आदिवासींच्या सवलतीचा लाभ उठवत असल्याने नकली आदिवासींपासून खऱ्या आदिवासींचे संरक्षण करण्यासाठी सरकारने संवैधानिक उपाययोजना करावी.

● ● ●


क्या सर्दी-ज़ुकाम आपको जकड़े रहता है?




इंडू फार्मास्युटिकल वर्क्स लि.,
गोखले रोड, दक्षिण दादर, बंबई ४०० ०२५.
पूरी जानकारी के लिए इस्तेमाल करने से पहले पैक पर दिये ये निर्देशों को ध्यानपूर्वक पढ़ लीजिए.

लघुकथा

## एका आदिवासी युवतीच्या फसवणुकीची कहाणी

# "झिपरी"

**– चुडाराम बल्हारपुरे**

त्या गारड सायेबानं 'झिपरी'चा हात धरला तेव्हा झिपरी थोडीसी लाजली होती. लाजण्या - अगोदर तशी ती घाबरलीच होती. पण नंतर गारडसायेब काही रागावलाच नाही. तेव्हा धडधडत्या छातीने, तिरप्या नजरेने त्याच्याकडे पाहिल्यानंतर, गारड (गार्ड) आपल्याकडे पाहून हसत आहेत हे बघून झिपरी अगदी लाजून गेली होती; लाजाळूच्या पानासारखी आणि त्यानंतर काय झालं कोणास ठावूक, पण झिपरी एकदम त्या गार्डाच्या प्रेमात पडली. तिची भिती तर दूर निघून गेलीच, पण गार्ड मात्र तिला अगदी देवासारखा भासू लागला.

आज झिपरी अगदी आनंदात होती. कारण तो गार्ड आज तिला आपल्या सोबत घेवून जाणार होता; अगदी कायमचा, लग्न लावून, आपल्यासोबत लग्नाची बायको म्हणून ठेवण्याकरता. ती त्याच्याकरता स्वत:चा जीव ओवाळून टाकणार होती. जन्मभर त्याची सेवा करण्याची तिची तयारी होती. त्या दिवशी तो गार्ड म्हणाला होता–

"झिपरे..."

"काय गारडसायेब?"

"मी तुला घेवून जाणार आहे माझ्यासोबत."

"कुठं जी?" हृदय धडधडायला लागलं. तोंडातून बोल फुटेना.

"अशी घाबरतेस काय?"

"नाय जी. पर कुठं घेवून जाणार हायीसा?"

"अगं माझ्या घरी. माझी लग्नाची बायको म्हणून."

"पर..."

"आपलं लग्न झालं नाही ना? तू काही काळजी करू नकोस. मी येत्या पुनवेला तुझ्याशी लग्न लावतो. आणि तुला माझ्या घरी घेवून जातो."

आणि तेव्हापासून झिपरी खूष होती. गारडसाहेबांचा हा निरोप ऐकल्यापासून तर ती अधिकच वेडीपिशी झाली होती. काय करू अन् काय नको असं तिला होवून गेलं होतं. आणि ती मोठ्या आतुरतेने पुनवेची वाट पाहत होती. आणि आज "पौर्णिमेचा दिवस" होता.

झिपरी आज सकाळीच उठली होती. अंधारातच तिने सडासंमार्जन केलेला होता. अंगण अगदी आरशासारखं चकचकीत करून नंतर ती माठ घेवून जवळच्या ओढ्यावर पाण्याकरता गेली होती. आणि सोबतच आंघोळीकरता म्हणून एक धोतर घेतला होता. ओढ्यातील गार पाण्याने आंघोळ करताना काय शहारलं तिचं अंग! ती एकदम धुंद होवून गेली. आणि त्यातच तिला आठवला तो पहिला दिवस; ज्या दिवशी गार्डानं तिचा हात धरला होता...!

दिवस हळू-हळू वर येऊ लागला तसा "झिपरी"चा जीव खालीवर होऊ लागला. तिनं भराभर काड्यांची मोळी बांधली. तशी ती कोंबड्याच्या पहिल्या बांगेलाच जागी होवून या रानात आली होती. पण अंधारात एका भल्या

मोठ्या वाघरुनं कुठंतरी डरकाळी फोडली आणि तिची पाचावर धारण बसली. भितीनं ती एका झाडावर चढून बसली तो उजाडेपावेतो. आणि पूर्वेला सूर्यनारायण थोडासा डोकावताच ती खाली उतरली. आणि एक-एक काड्या जमा करायला लागली. आता वाघराची भितीतर दूर निघून गेली होती, पण त्याहीपेक्षा एक मोठी भिती होती, "मायबाप सरकारच्या माणसाची." आणि हा सरकारचा माणूस म्हंजे "गारडसायेब."

आदिवासी माणसांकरता गारड-सायेब म्हणजे एक मोठा अधिकारी. कधीतरी लाकडं जंगलातून नेतांना गारड-सायबानं पाहिलं म्हणजे झालं. एक महिनाभर त्याच्या घरी निमूटपणानं फुकट काम करणं किंवा पाच-सात कोंबड्या त्याच्या घशात टाकणं हे आलंच. निदान आदिवासीच्या अज्ञान मनाला तरी ह्येच वाटायचं. गारड सायेबानं वरीलपैकी काहीच नाही मागितलं तरी 'आदिवासी' स्वत:च चुकल्यागत ते करायला तयार व्हायचा. आणि मग त्याच्या अज्ञानपणाचा फायदा न घेणारा माणूस 'सुज्ञान' राहणारच कसा?

आणि म्हणून झिपरी वेगानं कामाला लागली होती. मनात पेरसापेन देवाचा (हातात फरशी घेतलेला देव) धांवा करीत होती. "देवा, गावात जावून ही मोळी विकून घरी जाई पावतं त्या गारड सायेबाला झोपवूनशानच ठेव." पण देव कसला वस्ताद! त्यानं तो धावा ऐकलाच नाही.

दिवस बराच वर चढून गेला. झिपरीने मोळी बांधली. आणि ती उचलणार, इतक्यात—

"ए झिपरे, थांब तिथंच. रानातील लाकडांची चोरी करतेस होय?" गारडसाहेबांचा आवाज कानावर पडला. आणि झिपरीच्या हृदयात धस्स झालं. तिचं अंग क्षणभर थरथरलं.

"आरं देवा, घात झाला" असं म्हणत झिपरी अगदी घाबरून गेली. क्षणभर तिच्या मनात मोळी टाकून पळण्याचा देखील विचार डोकावून गेला. आणि लगेच तिनं मोळी फेकून दिली व धूम ठोकणार तोच....

अचानक गारड साहेबानं तिचा हात धला. झिपरीचा खालचा श्वास खाली आणि वरचा वरच राहिला. जाम घाबरून गेली ती. आता गारडसायेब आपल्यास काय म्हणणार किंवा कोणती शिक्षा देणार? ह्या विचाराने ती क्षणभर कासाविस झाली. आणि गयावया करून म्हणाली- - "दया करा गारडसाहेब, तुमीच आमचे मायबाप. आमच्या हातून चूक झालीया. ही चूक पदरात घ्या सरकार."

झिपरी अगदी रडकुंडीला आली. तसा तो गारडसायेब हसायला लागला. झिपरीने चमकून त्याच्याकडे पाहिलं. तेव्हा गारडसायेब म्हणाला— "भिऊ नकोस झिपरे. मी तुला शिक्षा करणार नाही. तू ही मोळी घेवून जा. आणि विकून आपलं पोट भर."

तिचा विश्वास बसला नाही. तिनं एकदा त्याच्याकडे अविश्वासानं पाहात विचारलं— "असं कसं होईल मायबाप?"

"मी सांगतो म्हणून होईल झिपरे. तू दररोज ह्या रानातून मोळी नेत जा. मी तुला काही म्हणणार नाही. पण...." तिनं त्याच्याकडे प्रश्नार्थक मुद्रेनं पाहिलं. तसा तो हसला. आणि ती एकदम लाजून गेली. त्याच्या हसऱ्या डोळ्यांनी तिच्यावर जी छाप पाडली ती कायमचीच.

त्या दिवसानंतर झिपरी रोज सकाळी लगबगीनं उठायची. भरभर घरची कामं करायची. आणि जंगलात जायची. काड्या जमा करायची. तोवर तिथं तो गारड-सायेब यायचा. तिच्याकडे टक लावून पाहात राह्यचा. बोलायचा

काहीच नाही. फक्त हसायचा. आणि एखाद्यावेळी बोललाच तर मोजकंच बोलायचा. नाही म्हणायला झिपरी देखील काड्या जमा करता-करता चोरून त्याच्याकडे पाहात राहायची. तिच्या मनात देखील काहीतरी वेगळ्याच भावना घर करू लागल्या होत्या. तसा गारडसायेब काही वयानं जास्त नव्हता. पंचवीस वर्षाचा तरुण होता. त्याचं लग्न झालं किंवा नाही हे माहीत नव्हतं. पण ह्या गावात मात्र तो एकटाच आला होता नोकरी करायला. होता-होईतोवर हे असं बरंच दिवस चाललं. आणि दोघांनाही एकमेकांविषयी स्नेह निर्माण झाला. फक्त आपलं मन मात्र उघडं करून दाखवायची हिम्मत त्यांनी केली नाही. पण एक दिवस...

झिपरी रानात पोचली. तोच तिनं पाहिलं, गारड साहेब अगोदरच येवून एका झाडाखाली चुपचाप बसलाय. तिनं त्याच्याकडे पाहिलं. पण तो हसला नाही. आणि काही बोलण्याचा प्रयत्न देखील नाही. ती चमकली. 'काय झालं गारडसाहेबांना?' ह्याचा ती विचार करू लागली. शेवटी बराच वेळ तिच्यानं राहणं झालं नाही. तेव्हा तिनं त्याला विचारलंच– 'काहून जी गारडसाहेब? तब्बेत बरी नाही का?' पण तिच्या ह्या प्रश्नाला देखील तो बोललाच नाही.

"मी म्हणतेय, आज अगदी सकाळीच आलायसा?" तरी तो मख्खच.

"न्हाई मनलं; माज्या हातून काय चुकलं का?"

तिच्या ह्या प्रश्नानं मात्र त्याची कळी खुलली. तो तिच्याकडे पाहून बोलला– "झिपरे..."

"काय म्हणताय?"

"आज दोन महिने झालेत. आपण दोघंही सकाळी जंगलात येतो. तू काड्या जमा करतेस. मी तुझ्याकडे पाहात राहतो."

"............"

"तुला माझ्याविषयी काहीच वाटत नाही झिपरे?"

"............"

"हे बघ. मी तुला रानातून मोळ्या नेण्यास मनाई करीत नाही. तुझ्यासाठी धावत मी सकाळी जंगलात येतो."

"............"

"झिपरे, मी तुला आवडत नाही?"

तिला त्याचा हा प्रश्न अपेक्षित नसावा. ती एकदम पुढे झाली व म्हणाली– "गारडसाहेब, असं म्हणू नका. तुमी मास्नी लई आवडतायसा." "आवडतोयना? मग तू माझ्याशी बरोबर बोलत नाहीस. मला आपल्या मनातलं काही सांगत नाहीस–!"

"............"

"झिपरे, मी तुझ्यावर प्रेम करतोय." एकदम त्यानं आपलं मन मोकळं केलं. आणि झिपरी...?

लाजून झिपरीनं खाली मान टाकली. व विचार करायला लागली. गारड-सायेब सांगताहेत हे खरं आहे का?

गारडसाहेब तिच्या जवळ येवून उभा झालाय, ह्याची तिला जाणीव झालीच नाही. तिच्या मनात तर मोर बागडायला लागला होता. तिच्या मनातील अंगणात आनंदाचा मोर थुई-थुई नाचू लागला होता. हृदयात मंजुळ झंकार उठत होते. आणि त्याचवेळी अचानक तिनं अनुभवलं; आपण कोणाच्या तरी बाहुपाशात आहोत. त्या मिठीनं आपणाला धुंद केलंय.

अलगद गारड साहेबांनी आपल्या बाहूंचा विळखा तिच्याभोवती घातला. आणि तिचं चुंबन घेतलं. आणि नंतर....?

काय झालं कुणास ठावूक? त्या दिवशी त्या सकाळच्या प्रहरी थंड वातावरणात गावापासून दूर त्या जंगलात ते दोन जीव एकमेकात गुंतून गेले.

आणि त्यानंतर...

त्या दिवशी गारड-साहेबांनी मांडला लग्नाचा प्रस्ताव. येत्या पुनवेच्या दिवशी तो तिच्याशी लग्न करणार होता. आणि लग्नाची तयारी करण्याकरता गारड सायेब पंधरा दिवसापूर्वी शहराच्या ठिकाणी आपल्या गावी गेला होता. तिथून तो सगळ्या तयारीनिशी आज येणार होता.

ओढ्यातील गार पाण्यानं आंघोळ करताना झिपरीला हे समदं आठवलं. आणि तिच्या मनात गुदगुल्या व्हायला लागल्या. तिनं भराभर-भराभर आंघोळ आटोपली. अंगावरची साडी बदलून तिनं माठ भरला. व ती घराकडं निघाली.

रस्त्यानं घराकडे जाताना ती विचार करू लागली. गारड सायेबांसोबत आपलं लगीन हुईल. मग गावच्या समद्या बाया मला सायबीनबाई म्हणतील. आन् मी बी सायबीनसारखी राहीन. समद्या बाया माझा हेवा करतील. अक्षरश: ह्या विचारांनी तिच्या डोक्यात गोंधळ घातला. आणि त्यातच ती घरी कधी येवून पोहचली हे तिला कळलंच नाही.

"ऐकलंस का झिपरे?" शेजारच्या यल्लमानं झिपरीला आवाज दिला. तशी झिपरीची तंद्री भंग झाली.

"काय यल्लमा?" झिपरीनं विचारलं.

"त्यो गारड नव्हता का आपल्या गावात?"

गारड म्हणताच झिपरीने कान टवकारले. आपली चोरी पकडल्या गेली की काय? अशी तिला भिती वाटायला लागली. चोराच्या मनात चांदणं म्हणतात तेच खरं. तिनं विचारलं-- "काय झालं यल्लमा?"

"त्या गारड-सायबाची म्हणं; बदली झालीया." यल्लमा.

"बदली?"

बदली म्हणताच झिपरीचे धाबे दणाणले. गारडसायबांची बदली? आन् ती बी एकाएकी? म्हणजे गारड-सायेब आता येणार नाही? मग आपलं काय? पण गारडसायबानं तर आपल्याला लग्नाचं वचन दिलं होतं. आन् आज तो येणार होता. पण...

गारड-सायेब अशी बेईमानी करणार नाही, असं तिच्या मनानं तिला सांगितलं. आज गारडसायेब येईल. आणि आपल्याशी लग्न लावून मग आपणाला बदलीच्या ठिकाणी घेवून जाईल. तिथं आपणास तो राणीसारखं वागविल. ह्या तिच्या विचारानं तिचं समाधान झालं. तिनं पुढं विचार केला; 'नाहीतरी आहे काय ह्या गावात? तीच ती मोडकी- तोडकी घरं? तीच बाया-माणसं. तेच ढोरं. आपला गारडसायेब ह्या नर्कातून आपली सुटका करणार आणि आपल्या सोबत चांगल्या गावी घेवून जाणार. तिथं आम्ही दोघं राजाराणी सारखी राहू.'

तिच्या ह्या विचाराचं तिलाच हसू आलं. मग ती पुन्हा स्वप्नात हरवली. आणि तिला आठवलं; त्या दिवशी ती ओढ्याच्या काठाकाठाने असलेल्या आमराईतून पाटलाच्या वावरात चालली होती. आन् गारडसायेब समोरून आला.

"काय झिपरे, कुठं निघालीस?"

"वावरात."

"वावरात... कशाला?"

"कशाला न काय? वावरात गेलं नाही तु आमचं पोट कसं भरंल?"

"का ?"

"तुमच्यासारखी नोकरी थोडीच हाय आपणाला ?"

"अगं पण तू आता पोटाची काळजी सोडून दे. आता तुझ्या पोटाची काळजी मी करणार आहे."

"...........'' ती गप्प.

"अगं, तू आता बायको होणार आहेस ना माझी ?"

"म्हणून का तुमची बायको होईपावतर मी उपाशी राहू ?"

"अगं-अगं, तसं कुठं म्हणालो मी ? हे घे."

तिनं त्याच्याकडे पाहिलं. त्याच्या हातात दहाच्या नोटा होत्या. तिनं पैसे घ्यायचे नाकारले. तो तिची समजूत घालायला लागला. पण ती मानली नाही. तिनं स्पष्ट सांगितलं– "आपलं लग्न झाल्यावर पाहू मग. तोवर आपली म्या काम करूनशानच पोट भरणार."

"बरं !" तो म्हणाला. आणि पुढं निघाला.

"गारडसायेब......" तिनं आवाज दिलं.

त्यानं सायकल थांबवली. आणि तो तिच्याकडे वळला– "काय झिपरे ?"

"माझ्या पोटाची तुमास्नी काळजी लागलीया न्हवं ?"

"म्हणून तर..."

"त्ये जावू द्या. मी मागतेय त्ये द्या मला. म्हणजे पोट भरंल माझं."

"सांग-सांग." तो उत्सुकतेनं म्हणाला.

"ते बघा." तिनं आमराईतील आंब्याच्या झाडाकडे बोट दाखवलं.

आणि ती कच्ची कैरी पाहून त्याच्या तोंडचं पाणीच पळालं. त्यानं ओळखलं; आपण केलेल्या "भलत्याच गडबडीनं" झिपरीचं पोट भलतीकडेच भरलंय. तो घाबरला. पण तसं भासू न देता त्यानं झिपरीला कैऱ्या तोडून दिल्या.

आणि एक दिवस झिपरीला त्यानं सांगितलं ते लग्नाबद्दल. तो म्हणाला– "झिपरे, तुझ्या उदरातील बी आकार घेण्याअगोदर आपण लग्न करू या." ती तयार झाली. नाहीतरी लग्ना अगोदर पोर झालं; त्याच्या बापाचा पत्ता नसला की आदिवासी (माडीया) समाज त्याला 'मुरा' समजतो. त्याचं नाव पडतं 'मुरा'. माझ्या पोराला कुणी मुरा म्हणू नये. असं तिला वाटायचं. एवढा बाप 'गारडसायेब' असताना पोरगा मुरा ? छे :!

आज झिपरीचं लग्न होतं गारडासोबत. आपला गारडसायेब आता येईल आन् आपल्याशी लग्न करून आपल्याला घेवून जाईल. ह्या स्वप्नात ती दंग होती. तोच यल्लमानं तिच्या खांद्याला धरून हलवित विचारलं.

"झिपरे कोणत्या इचारात हाईस ?"

"काय नाय यल्लमा. गारडसायेब चांगला माणूस हाय."

"चांगला माणूस जास्त दिस एका ठिकाणी ऱ्हात नाय झिपरे."

"कवा येणार हाय गारडसायेब सामान न्यायला ?" झिपरीनं कानोसा घेतला.

"सामान न्यायला ?" यल्लमानं पुढं सांगितलं– "आता त्यो कंचा येतोय सामान न्यायला ?"

"नाय पर नवीन ठिकाणी जाण्याअगुदर ?"

"आगं, त्यो नवीन ठिकाणी जावून पंधरा दिसं झालीत बग. लई दूर हाय त्याचं हे बदलीचं गाव." यल्लमा.

"काय?" झिपरी दचकली. "पंधरा दिस झाले? तुला कोणी सांगितलं?"

"त्यानं माणूस पाठवला हाय गाडी घेऊन. त्यो सामान भरत हाय गाडीत. आता थोड्याच वेळात ती गाडी जाईल बघ भुर्रकन्" यल्लमा असं सांगत आहे. तो गाडीचा आवाज यायला लागला. पुढच्याच क्षणी एक मेटॅडोर त्यांचे समोरून भुर्रकन् निघून गेली. त्या मेटॅडोरकडे बोट दाखवित यल्लमा म्हणाली– "त्ये बग. ती गाडी गेलीया गारड सायबांची."

पण हे ऐकायला झिपरी शुद्धीवर होतीच कुठं? तिच्या नजरेसमोर रंगीबेरंगी तारे नाचायला लागले होते. तिला चक्कर यायला लागली. कोणीतरी आपला प्राण ओढून नेतो आहे, असं तिला वाटायला लागलं. आणि अवघ्या सेकंदात झिपरी धाडकन् जमीनीवर कोसळली. तिच्या डोक्यावरील माठ खाली पडून फुटून गेला. त्यातील पाणी वाहून गेलं. झिपरीची देखील तीच गत झाली होती. तिचे स्वप्न भंगून गेले. तिच्या हृदयात तुकडे तुकडे झाले. आशा आकांक्षा मातीत मिसळून गेल्या.

यल्लमानं बोंब ठोकली. लोकं धावून आले. त्यांनी झिपरीला उचलून खाटेवर ठेवलं. आणि तिला शुद्धीवर आणायचा प्रयत्न करू लागले. आणि थोड्या वेळाने झिपरी शुद्धीवर आलीदेखील, पण...?

भोळ्या मनाची, भोळेपणानं वागणारी झिपरी पुरती नागवली गेली होती; त्या गारडसायबाच्या भोळ्या चेहऱ्यावर भाळून. त्याच्या हसऱ्या चेहऱ्यामागं कपट दडलंय; हे तिला माहीतच नव्हतं. आणि म्हणून ती फसली; नव्हे फसवली गेली होती, समाजातील एका सज्जन समजल्या जाणाऱ्या समाजकंटकाच्या हातून. तिनं ज्याच्यावर विश्वास टाकला त्यानं तिचा विश्वासघात केला. आणि स्वत:ची बदली करवून घेवून पळून गेला पळपुट्यासारखा. तो सुटला ह्या पापचक्रातून. पण त्यानं जिच्यावर हे सामाजिक नैतिकतेचं बंधन घालून पापाचं ओझं तिच्या उदरात पेरलं, त्या झिपरीचं काय? तिचा टाहो कोण ऐकणार? ती झालीय अनाथ. हाय रे दुर्दैव! हाय रे स्त्री जन्मा!

आता ते पापाचं ओझं सांभाळायचंय तिला. पापी माणूस दूर गेला; पण पाप मात्र राहून गेलं. आता ते पाप 'मुरा' म्हणून जन्माला येईल. आणि जन्मभर 'मुरा' बनून राहील. आणि झिपरी?

झिपरी आता वाळीत पडलीय. समाजानं तिला दूर लोटलं. ह्या समाजानं सहानुभुतीनं तिचा विचार केलाच नाही. पुरुष-प्रधान वृत्ती असलेल्या ह्या समाजानं नाण्याची दुसरी बाजू तपासून पाहिलीच नाही. मर्यादेच्या साऱ्या श्रृंखला स्त्रीच्या पायात अडकावून त्यानं तिला जायबंदी करून टाकलंय. आणि तिनं सारं सहन केलं. खरंच–

"स्त्री जन्मा ही तुझी कहाणी;
ओठी हासू, नयनी पाणी."

● ● ●

# "उन्हातलं झाड"

– सौ. मीना कराडकर

प्रा. भगवान भोईर यांचं 'उन्हातलं झाड' हे खरोखरच कॅक्टस सारखं आहे. त्याच्या काटेरी अनुभवातच अनुभवसौंदर्य दडलेलं आहे. पुस्तक वाचताना जातीय विषमता, अंधश्रद्धा, देवदासींच्या व्यथा, दलित समाजाचे प्रश्न, भटक्या जमातीच्या वेदना असे कितीतरी काटे खोलवर आपल्या मनात रुततात. आणि ते काटे काढण्याच्या प्रयत्नातच विचारचक्र सुरू होते. हे विचारचक्र वाचकाच्या मनात (संग्रह वाचून संपल्यानंतरही) फिरवत ठेवण्यात कवी यशस्वी झाले आहेत. नेहमीच्या रुळलेल्या वाटांनी चालणारा हा कवी नव्हेच.

"सर्वांसाठी एकच वाट निर्माण व्हावी,
मानवतेच्या धवल रंगाची !"

असं एक आगळं-वेगळं आणि अवघड स्वप्न पहाणारा हा कवी आहे.

आजच्या राजकारणी लोकांच्या कृतीवर त्यांनी परखडपणे कोरडे ओढले आहेत. 'मिठू मिठू' बोलणारेही संसार उध्वस्त करतात हे अगदी मोजक्या ओळीत मांडले आहे.

'सफेद कावळे
पोपटासारखेच
मिठू मिठू बोलताहेत
चिमण्यांची घरटी
उध्वस्त करणारे
बांधिलकीची पोपटपंची करताहेत !'

राजकारणी लोकांची दुटप्पी वागण्याची पद्धत पाहून आपण संभ्रमात पडतो. ज्यांनी रक्षण करायचं तेच भक्षक बनले आहेत.

"सत्याचा खून करणारेच,
जेथे सत्तेवर असतात,
सत्यवान एकही नाही,
सावित्रीने कुणासाठी सौभाग्य मागायचे ?"

हा अगदी प्रत्येक सामान्य माणसाच्या मनातला एक अनुत्तरीत प्रश्न ! स्वातंत्र्य, समता, बंधुत्व या शब्दांना पावित्र्य, बांधिलकी उरत नाही आणि याचाही उपयोग धंद्यासाठी केला जातो.

स्वत:च्या स्वार्थासाठी धर्माचाही आधार घेण्यास किंवा 'धर्म' ही वापरून घेण्यास माणूस मागेपुढे पहात नाही. धर्माचाही काळाबाजार या जगात सर्रास चालतो हे धंदा या कवितेतून कवीने यथार्थतेने दाखवून अंधश्रद्धाळू लोकांच्या डोळयात झडझणीत अंजन घातले आहे. गंगेचे पवित्र पाणी आणि अष्टविनायकाचा प्रसाद हेही या गल्लाभरू वृत्तीतून सुटलेले नाही.

भटक्या लोकांचे प्रश्न अगदी साध्या आणि समर्पक शब्दात मांडले आहेत.

"रेशनकार्ड नाही,
शाळेत गेलो नाही,
मतदार यादीत नाव नाही."

कुणीही भेटल्यावर 'तुम्ही कोणत्या गावचे ?' असा सहज प्रश्न आपण एकमेकांना विचारतो. पण या सहज प्रश्नालाही काहीवेळा उत्तर नसतं हे आपल्याला प्रथम जाणवतं ते या संग्रहात !

नदिकिनारी या कवितेत जीवनातलं एक महत्वाचं सत्य त्यांनी सांगितलं आहे.

"प्रार्थनेने संकट टळत नसते.
काठावर उभं राहून,
कुणालाच वाचविता येत नाही.
लाटांवर स्वार होतो, तो जिंकतो."

'यासाठी जीवाची पर्वा न करता लाटांवर स्वार व्हावं लागतं. स्वत: काहीतरी धाडस करावं लागतं.' हेच यातून कवीने सांगितले आहे.

समाजाला त्यांच्या चुका दाखवून देण्याची ताकद त्यांच्या शब्दात आहे. 'कचऱ्यातला देह' ही कविता कोणताही सहृदय माणूस डोळे ओलावल्याशिवाय वाचू शकणार नाही. दु:ख हाल, प्रेमाचा अभाव, खाण्याचा अभाव, यातच जीवन जगण्यासाठी चाललेली धडपड आणि प्रतिकूल परिस्थितीतील त्या धडपडीतच धनुर्वात होऊन संपलेलं एका लहानग्याचं मरण मनाला चटका लावून जातं.

दलितांच्या आशा कधी पालवल्याच नाहीत. त्यांच्या जीवनात रात्रीच्या अंध:काराशिवाय काही झालंच नाही. सोनेरी, आशावादी भविष्यकाळाची स्वप्नंही त्यांच्यापासनू खूप अंतरावर आहेत, हे सर्व सांगताना फार मार्मिक आणि सुरेख प्रश्न कवीने विचारला आहे.

'सूर्य कोणत्या कारागृहात बंदिस्त आहे?' हे एकच वाक्य सर्व काही सांगून जाते. उष:कालचा साक्षीदार सूर्यच जर बंदिवासात आहे, तर दलितांच्या आशा-आकांक्षाना काहीही अर्थ नाही. तरीही कवी निराश नाही. प्रत्येकवेळी कवितेतून मला कवीची बंडखोर वृत्ती जाणवली. त्याकाळी 'केशवसुत' समाजातली अवस्था बघून 'जग' उलथवून देण्याची' भाषा बोलत होते, तशीच बंडखोर वृत्ती प्रा. भोईरांचीही दिसून येते. ते प्रश्न विचारतात,

"गाफील किती दिवस रहाणार?<br>
तुम्हाला दानही मिळणार नाही<br>
कृत्रिम ग्रहणही सुटणार नाही."

जगात सामान्य माणसांना सोसावे लागणारे चटके त्यांच्या कवितेतून ठिकठिकाणी प्रतीत होतात आणि सरळमार्गी सामान्यमाणूस आयुष्यात यशस्वी होऊ शकत नाही, ही व्यथाही ते 'पत्रावळी शिवणाऱ्या माणसांना आयुष्य कधी शिवताच आलं नाही.'

अशा सारख्या ओळीतून मांडतात. देवदासींच्या व्यथाही त्यांनी एका कवितेतून मांडल्या आहेत. 'कातडी इकायची आन् वासना इझवायच्या!' या शब्दात! सुसंस्कृत कानांना बोचणारं पण एक विदारक सत्य! पण याच सत्यानं बोलतं व्हावं, लिहितं व्हावं म्हणूनही ते प्रयत्न करताना दिसतात. स्वत:चे अनुभव, दु:ख, वेदना शब्दबद्ध करण्यासाठी ते पीडित लोकांना उद्युक्त करताना दिसतात.

"बाबासाहेबांनी आपल्या हाती लेखणी दिलीय!

आता रापीची धार लेखणीला दिलीय!"

असा खूप मोठा आधारही ते सामान्य माणसाच्या पाठीशी उभा करतात. सामान्य माणूस कोणत्यातरी मोठ्या भक्कम आधाराशिवाय उभा राहू शकत नाही. याची त्यांना जाणीव आहे.

अत्यंत उत्तम, जिवंत व्यथा वेदना मांडणारा, लोकांना विचारप्रवृत्त करणारा, दलितांच्या समस्या वेशीवर टांगणारा एक परखड संग्रह म्हणून या संग्रहाचे मी वर्णन करीन.

समाजातील विरोधाभास, भ्रष्टाचार यावर प्रहार करताना ते बेभान होतात. मंत्रालयातील भ्रष्टाचाराच्या प्रत्येक जाळीत फक्त दीन-दुबळ्यांचीच प्रेते त्यांना अडकलेली दिसतात.

'पापपुण्याच्या कल्पनांचीच कत्तल करावी म्हणतोय.' म्हणून हातात कवितेचे जहाल शस्त्र घेऊन सर्वांची मने भेदत ते निघाले आहेत. पण मध्येच त्यांना प्रश्न पडतो--

"एक ठिणगी आहे, उभे रान पेटवू कसे?<br>
एक ठिणगी आहे, हे झाड पेटवू कसे?"

अशा विचारात असलेल्या या कवीची एकच ठिणगी ही अग्न्यास्त्रासारखी प्रभावी आहे. एकच ठिणगी ही उभा वणवा पेटविण्यास समर्थ आहे आणि माणसांची मने चेतविण्यासही समर्थ आहे. ठिणगी ठिणगीने पेटलेल्या या रानातूनच दलितांच्या व्यथा तावून-सुलाखून निघतील आणि एका नव्या युगाचा उदय होईल जिथे सर्वांसाठी एकच वाट असेल आणि कारागृहातील बंदिस्त सूर्य आशादायक उष:कालाला घेऊन येत असेल!

●●●

# "आदिवासी दृष्टी"

– सुषमा सोनक

बी.बी.सी.साठी पृथ्वीवरील प्राणीजीवनावर चित्रपट बनविण्यासाठी डेव्हिड ॲटनबरो या प्रसिद्ध प्राणीशास्त्रज्ञाने अक्षरश: पृथ्वी पालथी घातलेली आहे. प्राणीजीवनावरील 'द् लिव्हींग अर्थ' ही त्यांची चित्रपटमालिका विस्मयचकित करणारी आहे. या चित्रपटमालिकेसाठी देशोदेशी भ्रमंती करीत असताना ठिकठिकाणच्या जंगलात व वाळवंटात वास्तव्य करून राहणाऱ्या आदिवासी जमातींशी ॲटनबरो यांचा परिचय झाला. वन्य प्राण्यांचे, भक्षक, संरक्षक, माहितगार, वाटाडे, पूजक आणि चित्रकार अशा वेगवेगळ्या रूपातून आदिवासी त्यांना प्रथम भेटले. ॲटनबरो यांच्या मनात आदिवासींविषयी वसत असलेल्या आदरामुळे हा परिचय दृढ झाला. या संबंधाचे एक फलित म्हणजे 'द् ट्रायबल आय' (आदिवासी दृष्टी) या नावे त्यांनी तयार केलेली चित्रपटमालिका. या मालिकेद्वारा त्यांनी पाची खंडांतील कानाकोपऱ्यातील काही आदिवासी जमातीतील समृद्ध कलानिर्मिती आपल्या प्रेक्षकांसमोर आणलेली आहे. 'द् ट्रायबल आय' हे त्यांचे पुस्तक या मालिकेवर आधरित आहे.

***वस्तूसंग्रहालयाच्या चौकटीबाहेर***

या पुस्तकात त्यांनी जगभरातील वेगवेगळ्या प्रसिद्ध वस्तुसंग्रहालयात पसरलेल्या आदिवासींनी घडविलेल्या वस्तूंचा मागोवा घेतलेला आहे. वस्तूसंग्रहालयातील कांचपेटीत बंदिस्त व मखमाली चौथऱ्यावर विराजमान झालेल्या वस्तू केवळ तेवढ्याच बंदिस्त व गुळगुळीत अशा चौकटीत पाहणे अतिशय अपुरे आहे; या विचारातून ती वस्तू त्या संग्रहालयात कशी आली, त्यामागे कुठच्या लुटी, चांचेगिऱ्या, फसवेगिऱ्या, स्वाऱ्या आणि मोहिमा आहेत याचा हृदयद्रावक मागोवा त्यांनी घेतलेला आहे. मात्र गतइतिहासाबाबत केवळ लोकांच्या भावनांना हात घालून ते थांबलेले नाहीत. त्याहीपेक्षा महत्त्वाची एक गोष्ट आपल्या लिखाणात त्यांनी अंगिकारली आहे. त्या विशिष्ट वस्तूचे तिच्या सामाजिक, सांस्कृतिक जीवनात काय स्थान होते, आणि त्या त्या स्थलकाल संदर्भात तिचे काय महत्व होते, याचा पडताळा घेऊन ती ज्यांनी घडविली आणि ज्यांच्या रोजच्या वापरात ती होती अशा आज विलयाला गेलेल्या, नेस्तनाबूत झालेल्या किंवा नव्या जोमाने जगू पहाणाऱ्या समाजांचेही जीवन त्यांनी उद्धृत केलेले आहे.

***आदिवासी संस्कृतीचे भान***

या वस्तू केवळ अपरिचित रेषा, लयी, विचित्र आकृत्या, अनोळखी प्राणी आणि दुर्बोध भाव व स्तिमीत करणाऱ्या रंगाची सरमिसळ असलेल्या अपरिचित भेसूर गोष्टी राहू नये तर इफे जमातीतील धातूचे मुखवटे मेक्सिकोतील सुवर्णपात्रे, दुर्गम आस्ट्रेलियातील भागात पूर्वजांच्या स्मृतीखातर उभारलेले उंच कोरीव खांब जिवंत होऊन बोलू लागावेत व त्यायोगे आधुनिक संग्रहालयातील पर्यटक- प्रेक्षकांना आणि कलेच्या विद्यार्थ्यांच्या दृष्टीलाही साकल्याने बघण्याचे वळण मिळावे यासाठी विविध पातळयांवरचे स्थानिक वास्तव लेखकाने आपल्या समोर आणले आहे. ही बहुमोल

भौतिक संस्कृती ज्या ज्या समाजाने घडविली त्यांच्या या अज्ञात कथा ऐकता ऐकता आदिवासींच्या जीवनमूल्यांचे, निसर्ग आणि आदिभौतिकाकडे पाहण्याच्या त्यांच्या जीवनदृष्टीचे आपल्याला भान येते. आदिवासी किंवा कुठल्याही समाजाची कलाप्रकाराकडे पाहण्याची दृष्टी व मापदंड वेगवेगळे असल्याने त्यांच्या जीवनाला स्पर्श केल्याशिवाय त्यातील भौतिक संस्कृतीची खरी ओळख होणे असंभव आहे हे या लेखनातून स्वच्छपणे जाणवते.

### आदिवासी कलेवरील आघात

आदिवासी कलेचा पश्चिमेत सर्वांगीण असा हा प्रथमत: माग घेण्याचे श्रेय लेखकाने मानवशास्त्रालाच दिले आहे. हा माग न घेताच पश्चिमी कलाकार व इतर सर्वांनी जगभरच्या आदिवासी कलाप्रकारांवर ओढलेले ताशेरे लेखकाने जागोजागी नमूद केले आहेत. आदिवासींची कला 'प्रगत' नसल्याने ग्रीक व रोमन धर्तीवरील चित्रे, शिल्पे व इतर कलाकृती त्यांना घडविता येत नाहीत आणि त्यामुळे त्यांची कला नीच दर्जाची आहे अशी प्रच्छन्न अनुमाने प्रगत समाजाने भराभर काढलीत. आदिवासींना केवळ एका पश्चिमी दाखल्यानुसार कलाकृती निर्माण करण्यात रस असल्याचे काहीही कारण नाही हे सत्य पश्चिमेने वारंवार उद्दामपणे पायाखाली तुडवले, त्याची परिणती केवढ्या मोठ्या सांस्कृतिक ऱ्हासात झाली याची विदारक उदाहरणे लेखकाने दिलेली आहेत. एकूणच वसाहतवादी मनोवृत्ती आणि कृतीने जगभरच्या विविध संस्कृत्यांवर कसा घाला घातला हे या विवरणातून स्पष्ट प्रतीत होते.

अनेक बोलक्या छायाचित्रांमुळे या पुस्तकाला भराव आलेला आहे. वस्तू घडविणारे कारागिर आणि त्या वापरणाऱ्या माणसासोबत जेव्हा निबीड रानावनात किंवा वाळवंटात आपण मनाने पोचलेलो असतो तेव्हा लेखक आपल्याला खडबडून जाग आणतो आणि त्या त्या ठिकाणी कसकशी आक्रमणे झाली आणि तेथील बहुमोल चीजांना कसकसे पाय फुटत गेले व त्या देशोदेशीच्या संग्रहालयात कधी व कशा पोहोचल्यात याचा दस्तावेज आपल्यापुढे मांडतो. वाचता वाचता शरमेने मान खाली जाते कारण हा काही एखाद् दुसऱ्या फुटकळ वस्तूचा प्रवास नाही तर ती उभीच्या उभी संस्कृतीच कशी या आघातामुळे पराभूत, नामोहरम किंवा नष्ट झाली याचे हे पुरे आलेख आहेत.

### बदलत्या वास्तवाचा मूळ आकृतीबंधावर परिणाम

वसाहतीकरणाच्या काळात हिणवलेल्या व तरीही किमती कच्चा माल म्हणून लुटलेल्या वा भेटीदाखल मिळालेल्या या वस्तुपैकी काही 'प्रगत' राष्ट्रातील काही संग्रहालयांनी विकत घेतल्या. त्यांच्या चौथऱ्यांवर दाखल झाल्यावर आणि कालांतराने पश्चिमी समाजात त्यांनी काही कलामूल्ये प्राप्त केल्यावर त्यांच्या नकला तेथील कलासक्त घरातील सजावटीच्या कामी येऊ लागल्यात.

आता इथून लेखक आपल्याला पुन्हा त्या लुटलेल्या देशात, गावात, समुद्रकिनारी, गुहेत वा झोपडीच्या आत नेतो आणि तिथे काय शिल्लक राहिले याचा तपास घेऊ लागतो. अनेकविध ठिकाणी दिसतात, केवळ देशोधडीला लागलेल्या संस्कृत्या. काही ठिकाणी आपल्या जीवनातील हस्तक्षेप दूर सारायचा प्रयत्न करून लोकांनी नव्या जोमाने जगू पाहतांना दिसतात. वसाहतवादी इतिहास, औद्योगिक संस्कृतीचा परिचय, बाजारपेठेचा प्रादूर्भाव लोकजीवनावरील सैलावलेली धर्मांची पकड,

पर्यटनाचा व्यवसाय, या विविध प्रभावांखाली आदिवासींची भौतिक संस्कृती कुठली वळणे घेते आहे, याची नेमकी उदाहरणे इथे सापडतात. इथे परदेशी प्रवाशांसाठी पुन्हा अवजारे हाती घेऊन जुन्या कलाप्रकाराचे अनुकरण करू पहाणारी नवी पिढी दिसते. विमानतळावरील दुकानांमध्ये आढळून येणाऱ्या आदिवासी शेतीच्या कलावस्तूंबाबत लेखकाने मांडलेले विचार आपल्याला थेट वर्तमानात आणून सोडतात.

***नव्या निकषांची गरज***

प्रचलित कलामूल्ये, संस्कृतीरक्षणाची निकड अशासारखी जणू सर्व पटले एका हाताने दूर सारत हा माणूस आपल्याला लोकांच्या पोटापाण्याच्या प्रश्नाशी आणि कलेच्या व्यापारीकरणाच्या अवघड टप्प्यावर आणून पोचवतो. प्रभावशाली संस्कृती आणि स्थानिक संस्कृतीच्या परस्परसंबंधातून अनेकदा नव्या भाषाशैली उदयाला येतात व त्याही हळूहळू व्यामिश्र होऊ लागतात. या प्रक्रियेचा दाखला देऊन लेखकाने आदिवासी समाजात नव्याने उदयाला येणाऱ्या चित्रशैलीकडे आपले लक्ष वेधले आहे, पश्चिमी जगाने प्रथमत: नाकारलेली व नंतर त्यांच्याच आधुनिक कलेवर सखोल प्रभाव पाडणाऱ्या आदिम कलेतही कसकसे अपरिहार्य बदल प्रत्यक्षात घडत आहेत हे त्याने इथे निदर्शनास आणले आहे.

सुझान वेंगरसारख्या पश्चिमी स्त्रीने नायजेरियातील कारागिरांसमवेत बांधलेली देवळे व गुगेनहाइमसारख्या मानवशास्त्रज्ञाने डोगान जमातीतील पाण्याचा प्रश्न ओळखून तेथील लोकांच्या निर्णयानुसार बनविलेल्या फेरोसिमेंटच्या टाक्यावरील स्थानिक शैलीच्या चित्रणाचे उदाहरण देऊन ॲटनबरोने म्हटले आहे की विविध प्रकारच्या परस्परसंबंधातून, प्रभावातून, बळजोरीतून आणि सहाय्यातून नव्या शैली, आकार व उपयोग निर्माण होत आहेत. हे सर्व बदलते वास्तव समजून घेण्यासाठी कुठचे निकष असतील हा प्रश्न त्याने उपस्थित केला आहे. आणि हे निकष ठरवितांना त्यांचे स्वरूप आणि आधार कोणते असावेत याबाबत तो म्हणतो की यासाठी अनुभव आणि आशयाचे वेगळे परिमाण देणाऱ्या "आदिवासी दृष्टीची" दखल घेणे अत्यावश्यक ठरेल एवढेच नव्हे तर आदिवासींच्या भौतिक संस्कृतीतील बदलांची दिशा चोखाळण्याचे या निकषांत सामर्थ्य असावे लागेल.

दुर्गम स्थानिक पातळीवरील जिवंत तपशील आणि आजवर तगलेल्या आदिवासींच्या भौतिक संस्कृतीत घडत असलेले बदल आणि त्यातून उमटणाऱ्या हानिकारक वा आशादायी संभावनांकडे समतोलपणे हे पुस्तक लक्ष वेधते, यात त्याचे महत्व आहे.

● ● ●

# बिरसामुंडा

बिरसा ! तू पुन्हा एकदा ये रे बाबा
आम्हा आदीम मायांच्या कुशीत जन्मायला
पुन्हा एकदा होवू दे 'उलगुन' !
ही रानाची सय-जळून राख झाली रे
इथल्या रानकुशीला महारोग जडला रे
इथल्या मायच्या कुशीलाच सुरंग लागला रे
कच्चीबच्ची-तरणीताठी
'साऱ्यांचीच लक्तरं झालीत रे
सजनी चिलाटीच्या टोकावरची'
इथं सूर्य अजुनही नाही रे पोचला
बिरसा ! सूर्यकमलांचा तलाव नाही रे फुलला !
अंधाऱ्या एकेका रात्री
घिसून निघतात रे एकेक जीव– काकडी कंदासारखे !
भाजून सोलून निघतात रे– भाजल्या लाव्या बारड्यासारखे
एकेक जीव सडतो कुजतो दरीडोंगरांच्या खापीत
दारूच्या सडक्या मोहासारखा !
इथं रोजच नव्या पुष्पवतीच्या गर्भातून
नकळत फुटतो रे 'रानआरसा'
भयानवादळातून ऐकू येतो रे चित्कार हुंदका
बिरसा भगवाना ! आता कुठं कुठं साठवावं रे
हे अश्रूंचे अविरत वाहणारे पाट ?
कोणत्या मातीखाली लपवावं रे चाफेकळी फूल ?
अरे बिरसा ! आमच्या छाताडावरचे हे व्रज
तू तरी फेकून दे हे होवून रानवादळ !
आणि टांगून दे रे– वेशीवर
आमच्या वेदना जखमांचे घरटे – खोप्यासारखे !
घेवून येरे नवासंदर्भ प्रवाह
ह्या इंद्रावती – पामलगौतमी पर्लकोटाच्या पाण्यात !
आम्ही राखून ठेवले आहेत तुझ्या आवडीचे
बांबूचे हिरवेकोंब – आणि
मोहाच्या पानोऱ्या (भाकरी)
पेटवून ठेवला आहे अंगणा अंगणात
नवा जाळ
घेवूनं ये रे बाबा–
क्रांतीचा नवा रेला ऽऽ ठेमसा !
आणि पहाट गर्भातून सूर्य येण्याआधीच
तोड सारी साखळदंड – आणि करून टाक मोकळे
बिरसा ! म्हणूनच ये रे आमचा–
नवा आशादीप होवून !

*- कु. उषाकिरण आत्राम*

वरोरा.

# सूची


अंक पहिला : जानेवारी-मार्च ....................१९८० - जबरन जोत जंगल जमीन

अंक दुसरा : एप्रिल-जून ....................१९८० - आदिवासी व शिक्षण

अंक तिसरा : जुलै-सप्टेंबर ....................१९८० - आदिवासी व वनसंवर्धन

अंक चौथा : ऑक्टोबर-डिसेंबर ....................१९८१ - आदिवासी साहित्य व कला

अंक पाचवा : जानेवारी-मार्च ....................१९८१ - दलितांना सवलती व राखीव जागा माहिती

अंक सहावा : एप्रिल-जून ....................१९८१ - आदिवासी व आरोग्य

अंक सातवा : जुलै-सप्टेंबर ....................१९८१ - वनशेती व संवर्धन

अंक आठवा : ऑक्टोबर-डिसेंबर ....................१९८१ - रोजगार हमी योजना

अंक नववा : जानेवारी-मार्च ....................१९८२ - उत्तरा खंड अभ्यास मोहीम

अंक दहावा : एप्रिल-जून ....................१९८२ - धरणे व विकास

अंक अकरा-बारा : जुलै-डिसेंबर ....................१९८२ - जंगल व्यवस्थापन

अंक तेरावा : जानेवारी-मार्च ....................१९८३ - आदिवासी व दारू

अंक चौदावा : एप्रिल-जून ....................१९८३ - आदिवासींच्या सामाजिक / राजकीय चळवळी

अंक पंधरावा : जुलै-सप्टेंबर ....................१९८३ - प्रा. सरदार गौरव अंक / आदिवासी साहित्य

अंक सोळावा : ऑक्टोबर-डिसेंबर ....................१९८३ - आदिवासी साहित्य व सामाजिक प्रश्न

अंक सतरा-अठरा : जानेवारी-जून ....................१९८४ - आदिवासीमधील स्वयंसेवी कार्य

अंक एकोणिसावा : जुलै-सप्टेंबर ....................१९८४ - आदिवासी स्त्री

अंक विसावा : ऑक्टोबर-डिसेंबर ....................१९८४ - आदिवासींचे आरोग्य व शिक्षण

अंक एकविसावा : जानेवारी-मार्च ....................१९८५ - आदिवासी संघटन

अंक बाविसावा : एप्रिल-जून ....................१९८५ - जमीन हस्तांतर

अंक तेविसावा : जुलै-सप्टेंबर ....................१९८५ - आदिवासी महिला

अंक चोविसावा : ऑक्टोबर-डिसेंबर....................१९८५ - आदिवासी व सरकार

अंक पंचविसावा : जानेवारी-मार्च ....................१९८६ - जंगल व धरण

अंक सव्विसावा : एप्रिल-जून ....................१९८६ - आदिवासी कला

अंक सत्ताविसावा : जुलै-सप्टेंबर ....................१९८६ - आदिवासी व वेठबिगारी

अंक अठ्ठाविसावा : ऑक्टोबर-डिसेंबर....................१९८६ - आदिवासीविषयक ग्रंथ मानवशास्त्र परिचय

अंक एकोणतिसावा : जानेवारी-मार्च....................१९८७ - भटक्याविमुक्त जमातींचे प्रश्न

अंक तिसावा : एप्रिल-जून ....................१९८७ - आदिवासी आणि सांस्कृतिक बदल

अंक एकतीस-बत्तीस : जुलै-डिसेंबर ....................१९८७ - राष्ट्रीय वननीतीचा प्रश्न

अंक तेहतीस : जानेवारी-मार्च....................१९८८ - सवलती अपहरणाची समस्या

अंक चौतीस : एप्रिल-जून ....................१९८८ - आदिवासी साहित्य

अंक पस्तीस-छत्तीस : जुलै-डिसेंबर ....................१९८८ - आदिवासी समाज व संस्कृती

अंक सदतीस-अडतीस : जानेवारी-जून ....................१९८९ - डॉ. वेरीर एलवीन विशेषांक

अंक एकोणचाळीस-चाळीस : जुलै-डिसेंबर....................१९८९ - व्यवसाय मार्गदर्शन

अंक एकेचाळीस-बेचाळीस : जानेवारी-जून ....................१९९० - महाराष्ट्रातील आदिवासींची परिस्थिती

अंक त्रेचाळीस : जुलै-सप्टेंबर....................१९९० - जागतिक आदिवासी

अंक चव्वेचाळीस : आक्टोबर-डिसेंबर ....................१९९० - गं.बा. सरदार स्मृति विशेषांक

अंक पंचेचाळीस-सेहचाळीस : जानेवारी-जून ....................१९९१ - आदिवासी साहित्य संमेलन विशेषांक

अंक सत्तेचाळीस : जुलै-सप्टेंबर ....................१९९१ - आदिवासी जीवन व विकास

अंक अठ्ठेचाळीस : ऑक्टोबर-डिसेंबर ....................१९९१ - आदिवासी स्त्री (चर्चा विशेषांक)

Registered with the Registrar of News Papers of India Under No. 35835/80

**महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद**

आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत संशोधन, चर्चा व प्रकाशन कार्यकर्त्यांचे शिबिराव्दारे प्रशिक्षण.

शासकीय, राजकीय व रचनात्मक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना एकत्र व्यासपीठावर आणून त्यांच्यात आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत आणि विकासाबाबत सुसंवाद घडवून आणणे.

मानव विज्ञान व सामाजिक शास्त्रे यांच्या शिक्षकांना व विचारवंतांना, मुख्यत: आदिवासीबाबत अभ्यासकांना एकत्र आणणे.

मानव विज्ञानाच्या सर्व शाखांत अध्ययन, संशोधन प्रकाशन.

या उद्देशाने 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' स्थापन करण्यात आली आहे. याच उद्देशाचे मूर्त स्वरूप म्हणून 'हाकारा' सुरू करण्यात आला आहे. परिषदेचे सदस्यत्व स्वीकारून आपणही या कार्यात सहभागी व्हावे.

मानव विज्ञान परिषदेचे सदस्यत्व

आजीव सभासद ३०० रुपये

परिषद वार्षिक सभासद ३० रुपये

परिषदेच्या सभासदांना 'हाकारा' विनामूल्य पाठविला जातो. आपले सदस्यत्व आणि वार्षिक वर्गणी कृपया खालील पत्त्यावर 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' (दि महाराष्ट्र असोसिएशन ऑफ ॲन्थ्रॉपॉलॉजिकल सायन्सेस) यांचे नावे डिमांड ड्राफ्ट अथवा मनीऑर्डर करताना फॉर्ममागे कृपया आपले पूर्ण नाव व पूर्ण पत्ता लिहिण्यास विसरू नये.

**पत्रव्यवहाराचा पत्ता :–**

रा. के. मुटाटकर, सचिव

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

६४, आनंद पार्क, औंध,

पुणे - ४११ ००७.

**आपल्या क्रियाशील सहकार्याची अपेक्षा आहे.**

हाकारा त्रैमासिकास महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ व भारतीय सामाजिकशास्त्र अनुसंधान परिषद, पश्चिम विभागीय केंद्र यांचेकडून अर्थसहाय्य मिळाले आहे.